# सहजयोग

## प्रचार-प्रसाराचा आनंद



प.पू.श्रीमाताजी निर्मला देवी
यांच्या प्रवचनांमधून संकलित

# सहजयोग
# प्रचार-प्रसाराचा आनंद

'The Joy of Spreading Sahajyoga' पुस्तकाचा मराठी अनुवाद

# प्रस्तावना

मला आशा आहे तुम्ही सर्व लोक समजून घ्याल, की सहजयोग प्रचाराचं महत्त्व काय आहे. जर तुम्ही तसे कार्य केले नाही तर तुम्ही पूर्णत: निरुपयोगी आहात. माझ्यासाठी महान गोष्ट ही आहे, की तुम्ही इथे पुष्कळ दिवे आहात. अजून आपल्याला पुष्कळसे सहजयोगी हवे आहेत. जर तुम्हाला हे विश्व बदलायचं असेल, जर तुम्हाला सर्व दिव्य परीक्षा, निरुपयोगी जीवनातील आपत्ती टाळायच्या असतील जे जीवन सर्वजण जगत आहेत, तर तुम्हाला त्यांना वाचवलेच पाहिजे. तुम्ही त्यांना मुक्ती दिलीच पाहिजे. ते तुमचे कार्य आहे. सहजयोगाला तुम्ही अशा रीतीने योगदान दिले पाहिजे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रचार-प्रसाराची मूलतत्त्वे | ५ |
| २ | प्रचार-प्रसाराची आनंददायी कला | १४ |
| ३ | प्रचार-प्रसाराची इच्छा | १९ |
| ४ | प्रचार-प्रसाराचा वेग | २५ |
| ५ | प्रचार-प्रसाराचा धर्म | ३९ |
| ६ | प्रचार-प्रसाराची अंत:स्थिती | ५७ |
| ७ | सामूदायिक प्रचार-प्रसार | ७५ |
| ८ | निर्विचार जागृतीमध्ये प्रचार-प्रसार | ९९ |
| ९ | नवीन आयाम | १०६ |
| १० | प्रश्न आणि उत्तरे | १२२ |

# प्रकरण एक

# प्रचार-प्रसाराची मूलतत्त्वे

''सहजयोगानेच फक्त
तुम्ही जग वाचवू शकता.''

## निर्मलता

जेव्हा आपण म्हणतो, की आध्यात्मिक उन्नती फार सोपी आहे, पण तुम्हाला वाटते तेवढी ती सोपी नाही कारण युगानुयुगे गहनतेच्या मार्गाने ती घटित करण्यात आली आहे. इतकेच काय तुमच्या माताजींनीसुद्धा ती प्राप्त करण्यासाठी पुष्कळ परिश्रम घेतले आहेत. म्हणजे कोणीतरी ते कार्य केलेलेच आहे. म्हणून जर ते सोपे आहे, तर तुम्ही तुमच्या ग्रहांना धन्यवाद दिले पाहिजे कारण तुमच्यासाठी आता ते कठीण राहिलेले नाही. ते इतके सोपे का आहे, याविषयी शंका घेण्यापेक्षा तुम्ही त्यासाठी आपले योगदान दिले पाहिजे. ठीक आहे, तुम्ही तसे करू शकता, पण सर्वप्रथम जे काही उपलब्ध आहे त्याचा फायदा घ्या, नंतर त्यासाठी काही अधिक योगदान देऊ शकता. पहिल्या प्रथम हे जाणून घ्या, की जे काही आपण प्राप्त केले आहे ते म्हणजे आत्मसाक्षात्कार आहे आणि श्री गणेशांची स्वच्छ करण्याची शक्ती आहे. तुमच्यामध्ये श्री गणेशांना प्रस्थापित करा. सर्वप्रथम त्यांना तुम्ही प्रस्थापित केलेच पाहिजे आणि नंतर तुम्ही त्याचा वापर दुसऱ्यांसाठी, स्वत:साठी आणि सहजयोगाच्या ज्या पद्धती तुम्ही शिकला आहात त्या अधिकाधिक चांगल्या करण्यासाठी केला पाहिजे.

आता मला अहंकाराबद्दल सांगितले पाहिजे. पाश्चिमात्य देशात लोकांना अधिक अहंकार का असतो? त्यापैकी एक गोष्ट अशी की उजवी बाजू ही ॲक्सिलरेटर सारखी (वेग वाढवणारी) आणि डावी बाजू ब्रेकसारखी (गतीरोधक) आहे. जर तुमचा ब्रेक बरोबर नसेल तर स्वाभाविकपणे ॲक्सिलरेटर नियंत्रण ठेऊ शकत नाही. म्हणून तार्किकदृष्ट्या आपले मूलाधार ठिकाणावर आणले पाहिजे आणि यथायोग्य ठेवले पाहिजे आणि त्यासाठी आपण फार मेहनत घेतली पाहिजे. जर तुमचा ब्रेक प्रस्थापित झाला तर जे काही सहजयोगाचे कार्य तुम्ही करता आहात त्यावेळी तुम्ही अहंकाराच्या समस्येत अडकून पडणार नाही आणि अहंकारही कोणत्याही पद्धतीने तुमचा ताबा घेणार नाही. म्हणून ते फार महत्त्वाचे आहे. मुख्यत्वे करून पाश्चिमात्य देशात, जिथे पावित्र्याची आणि

मांगल्याची कल्पनाच पुष्कळशा प्रमाणात नाश पावलेली आहे, तिथे त्यासाठी कोणत्याही देवदूताची शक्ती आपल्यामध्ये पूर्णतः प्रस्थापित केली पाहिजे. नंतरच त्या शक्तीच्या आधारे आपण ते घटित करू शकतो. त्यामुळे तुम्हाला विवेकबुद्धी, अहंकारशून्यता प्राप्त होईल.

आपल्याला अशा लोकांची गरज आहे जे पूर्णतः प्रेमाच्या पावित्र्यात न्हाऊन निघाले आहेत. म्हणजे प्रेमशक्तीपासून आपण दुसऱ्या बिंदूकडे, पावित्र्याकडे जातो. पवित्रता हा असा विषय आहे ज्यावर बऱ्याच लोकांनी सांगितले आहे. जसे तुम्ही निर्मळ असले पाहिजे. तुम्ही पूर्णतः मोकळ्या मनाचे असले पाहिजे आणि लोकांना तुमच्याविषयी सर्व काही माहीत असले पाहिजे. पण मला वाटत नाही की ती पवित्रता आहे, निर्मलता अशी आहे, की जी दुसऱ्यांना पवित्र बनवते. जर तुम्ही पवित्र व्यक्ती असाल तर दुसरेही पवित्र होतील आणि ते निर्मल असलेच पाहिजे.

आता समजा तुमच्या स्वतःबद्दल काही अशा कल्पना आहेत, की तुम्ही असा विचार करता की तुम्ही सहजयोगी म्हणून एका उच्च पातळीवर आहात आणि तुम्ही प्रेमाने ओतप्रोत भरलेले आहात. कदाचित ते सर्व काल्पनिक असू शकते. तुमची निर्मलता दुसऱ्यांना निर्मल बनवते का? ती निर्मलता दुसऱ्यांना जागृती देऊ शकते का? ते आत्मसाक्षात्कारी होऊ शकतात का? आणि नंतर तुम्ही पावित्र्याला, पावित्र्याच्या शक्तीला किती महत्त्व देता? किती लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार दिला आहे? की ती शक्ती तुमच्याजवळच ठेवली आहे? किती ठिकाणी ते पावित्र्य तुम्ही प्रसारित केले आहे? पावित्र्य, पावित्र्याचा प्रचार-प्रसार केलाच पाहिजे. कोणतीही शंका न घेता तुमच्या स्वतःच्या निर्मलतेमध्ये ते कार्य तुम्ही केले पाहिजे कारण ती गोष्ट फार फार शक्तीदायक आहे.

निर्मलता फार शक्तिशाली आहे. ती एखाददुसऱ्या व्यक्तीवर कार्यान्वित होणार नाही, हरकत नाही. काही लोक अतिशय घृणास्पद, भयंकर असतील, काही हरकत नाही. परंतु अशा पुष्कळशा संवेदनशील व्यक्तींवर

त्याचा परिणाम होईल ज्यांना सहजयोगी बनावेसे वाटते. तुम्ही लोकांना कसे आवडता आणि तुमच्याद्वारे ते कसे प्रभावित होतात याची तुम्ही परीक्षाच घ्या. परम चैतन्य, परमेश्वरी प्रेमाची सर्वत्र पसरलेली शक्ती तुमच्यामधून वाहत असते कारण तुम्ही पवित्र आहात. जर तुम्ही अपवित्र असलात तर ती निरनिराळ्या चक्रांवर थांबते, ती कार्य करीत नाही. तुमच्या स्वभावाची निर्मलता, तुमच्या प्रेमाची पवित्रता याचा अर्थ काय? तुम्ही एखाद्यावर प्रेम करता कारण त्या माणसाकडे आध्यात्मिक शक्ती असते. त्या व्यक्तीवर तुम्ही प्रेम करता कारण तिथे निर्मलता असते आणि तुम्ही लोकांमध्ये निर्मल प्रेम पसरवण्यासाठी ठिकठिकाणी जाता. निर्मल व्यक्ती कधीही समस्या निर्माण करणार नाही. अपवित्र व्यक्ती दररोज असल्या समस्येने किंवा असल्या अनेक समस्यांनी सुरुवात करेल.

## उगम स्थान

आता सहजयोगाच्या संबंधात मूलभूत गोष्ट कुंडलिनी आहे आणि कुंडलिनी, जसं मी तुम्हाला सांगितले आहे, ती शुद्ध इच्छा आहे. पुन्हा तुम्ही लक्षपूर्वक ऐका. 'शुद्ध इच्छा'. याचा अर्थ इतर सर्व इच्छा या अशुद्ध आहेत. इथे फक्त एकच शुद्ध इच्छा आहे आणि ती म्हणजे परमेश्वराशी एकरूप होणे, ब्रह्माशी एकरूप होणे. तीच फक्त एक शुद्ध इच्छा आहे. इतर सर्व इच्छा अशुद्ध आहेत म्हणून हळूहळू तुमच्या मनाला मुख्य बाब म्हणून ती शुद्ध इच्छा प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण द्या. जर तुम्ही तुमच्या मनाला तशा पद्धतीचं वळण लावलंत तर तुमची शुद्ध इच्छा विकसित होईल. सर्व इतर इच्छांचा जोर हळूहळू कमी होईल. ठीक आहे. ही इच्छा परमेश्वराशी एकरूप होण्याची, सर्वात उच्च आणि शुद्ध इच्छा आहे आणि ती प्राप्त करण्यासाठी आपल्याला काय करायला हवे?

ते प्राप्त करण्यासाठी तुमच्या माताजींना तुम्ही प्रसन्न ठेवले पाहिजे. अगदी सोपे....तर माताजींना प्रसन्न कसे करायचे? त्यासाठी तुम्ही स्वत:ला पाहण्याचा प्रयत्न करा. कोणत्या प्रकारची गोष्ट मला चांगल्याप्रकारे प्रसन्न

करू शकेल........मला कोणतीही गोष्ट नको, पण करुणा....त्यामुळे तुम्ही तुमच्या माताजींना प्रसन्न ठेवू शकता.

तुमच्या दैवी शक्तीचं प्रगटीकरण ही माझी सिद्धी आहे. ते फार सोपं आहे आणि सोपं केलेलं आहे. मला फक्त जे लोक साधे-भोळे, निरागस आहेत, जे कावेबाज नाहीत, जे प्रेमळ आहेत, ज्यांना एकमेकांविषयी माया आहे तेच लोक आवडतात. मला प्रसन्न करणं फार सोपं आहे. जेव्हा मी तुम्हाला प्रेम करतांना पाहते, एकमेकांशी चांगले बोलतांना पाहते, एकमेकांना मदत करतांना पाहते, एकमेकांचा आदर करतांना पाहते, एकमेकांबरोबर मोठा हास्यकल्लोळ करतांना पाहते, एकमेकांच्या सहवासातून आनंद घेतांना पाहते, तेव्हा मला परमेश्वराचा पहिला आशीर्वाद, पहिला आनंद प्राप्त होतो.

## विश्वाची स्थिती

जेव्हा मी माझ्या जीवनाची सुरुवात केली तेव्हा मी गुंतागुंतीची सहस्रार चक्रे पाहिली. जेव्हा ती गुंतागुंत माझ्या स्वत:च्या जाणिवेत सोडवण्याचा प्रयत्न केला तर ती अधिक कठीण होऊन बसली कारण जर तुम्ही माझे वय पाहिले, तर या ५० वर्षात तुम्ही पाहू शकता, मानवजात किती गुंतागुंतीची बनली आहे. सहस्रार उघडल्यानंतर जेव्हा मी पाश्चिमात्य देशात आले तर या १६ वर्षात मला असे आढळून आले, की ते लोक आता सुधारणे अशक्य आहे. आता तुमच्यासाठी उच्चस्थिती प्राप्त करण्यासाठी उच्चासन तयार केले आहे. तुम्ही पाहू शकता की जर तुमच्याकडे कार्यक्रम असेल तर कार्यक्रमासाठी ५०० लोक येतात आणि दोन आठवड्यात सर्वच्या सर्व नाहीसे होतात कारण जेव्हा आत्मोन्नती घटित होते तेव्हा कुंडलिनी अहंकाराला बाहेर ढकलते आणि त्या व्यक्तीला सत्याच्या जवळ आणते. परंतु पुन्हा तो अहंकार त्याच्या वेगाने गतिमान होऊन तो पुन्हा त्या जागी येतो आणि कुंडलिनीच्या गतीला चीत करतो आणि मस्तिष्काला व्यापून टाकतो, नंतर असं सूचित होतं, की तुम्हाला परमेश्वरी जीवन कसे प्राप्त होईल?

तुम्हाला तुमचे मद्यपान, सर्व मूर्खपणा, जीवनातील सर्व मौजमजा मिळणार नाही. त्यांना असे वाटते, की ते सर्व स्वातंत्र्य गमावून बसतील आणि वेडे होतील.

याची दुसरी बाजू म्हणजे 'आसुरी विद्या' म्हणजे काळी विद्या, जिनं सर्व व्यापलं आहे. श्रीकृष्णांनी पंधराव्या अध्यायात इशारा दिला आहे, की जेव्हा आसुरी शक्ती, विद्या व्यापून टाकते तेव्हा शुद्ध विद्या ही आसुरी विद्येच्या गतीशी स्पर्धा करू शकत नाही. या स्थितीमध्ये जेव्हा आपण सर्व सहजयोगी आहोत ते आपल्या परमेश्वरी जीवनाबद्दल बुजरे होतात. मला असं म्हणायचं आहे की सहजयोग्यांना सहजयोगाच्या परमेश्वरी शक्तीबद्दल खात्री पटवली, तरी ते अद्याप धीट नाहीत. आणि तुम्ही जाणता, की तुमच्या माताजी तुमच्याकडून कसल्याही प्रकारे पैसा घेत नाहीत, उलटपक्षी त्या स्वतः खर्च करीत असतात आणि त्यामुळे तुम्हाला सर्व काही प्राप्त झाले आहे. परंतु जेव्हा देण्याची वेळ येते तेव्हा प्रत्येकजण संकोचतो. या पार्श्वभूमीवर तुम्ही परमेश्वरी कृपेच्या प्रकाशात येत आहात पण त्यावर तुम्ही झडप टाकत नाही. त्यासाठी तुम्ही वेळ घेता, हळूहळू, क्रमाक्रमाने तुम्ही तुमची संधी हरवून बसाल. म्हणून सहजयोग्यांच्या जाणीवेत या स्थितीत तुम्ही तुमच्या चक्रांबद्दल जाणता, तुम्ही तुमच्या चैतन्य लहरींबद्दल जाणता, तुम्ही इतरांशी कसे संबंधित आहात हे जाणता, अद्याप हे सर्व ज्ञान तुमच्या व्यक्तीगत फायद्यासाठी आहे. तुम्हाला ही नवीन जाणीव मिळूनसुद्धा, भूतकाळातील सावलींचे अस्तित्व आहे.

आज जेव्हा तुम्ही बघता संपूर्ण विश्व संघर्ष करण्यामध्ये गुंतले आहे आणि युद्धापासून लोकांचे रक्षण करण्यासाठी मोठमोठी, रक्षण करणारी प्रचंड उपकरणे निर्माण होत आहेत. संपूर्ण विश्व एकमेकांना मारण्याच्या मूर्खपणाच्या स्पर्धेमध्ये आहे आणि स्पर्धा करून एकमेकांचा नाश करीत आहेत. एकमेकांना मारत आहे. संघर्षासाठी पुढे येत आहे. सरतेशेवटी महायुद्धासाठी पुढे येत आहे. एखाद्या जमिनीच्या तुकड्यासाठी संघर्ष करीत आहेत. ते किती अज्ञानी आहेत! जेव्हा तुम्ही मरता तेव्हा या जमिनीचा

चिमूटभर भाग बरोबर घेऊन जाऊ शकता का? जेव्हा तुम्ही जन्मता तेव्हा बंद मूठ घेऊन येता आणि जेव्हा तुम्ही मरण पावता तेव्हा हात मोकळे करून जाता. तुम्ही तुमच्याबरोबर काय घेऊन जाता? ठीक आहे. तुम्हाला काही बरोबर घेऊन जायला आवडत नसले तरीसुद्धा जे तुम्हाला फार वाटते, ज्यासाठी तुम्ही संघर्ष करता त्याचा आनंद घेता का? तर या सर्व मूर्ख लोकांमध्ये हा संघर्ष कशासाठी चालू आहे? हे आश्चर्य आहे, की लोक त्यांची शांती, त्यांचा समजूतदारपणा एका छोट्या जमिनीच्या तुकड्यासाठी का टाकून देतात? सर्वच गोष्टी अगदी चुकीच्या मार्गाने जात आहेत आणि पूर्ण विध्वंसाकडे त्यांची वाटचाल चालू आहे.

नि:संशय मला दूरदृष्टी आहे. जे मी पुष्कळ वेळा सांगत आले आहे. परंतु त्याचा शेवट पूजेबरोबर होतो, ही चांगली गोष्ट नाही. मला माहीत आहे काही देश फार अवघड आहेत. तर समस्या काय आहे? ते शोधण्याचा प्रयत्न करा आणि ते अवघड का आहे, ते शोधून काढा. याकडे आपले चित्त दिले पाहिजे. स्वत:चा नाश करण्यासाठी मानव काय काय करीत आहे. जणू काही त्या खेळाचा, ज्याला आपण 'अंतिम निवाडा' म्हणतो त्याचा जणू काही आंशीक भाग आहे. परंतु आपल्या करुणेने आणि प्रेमाने जेवढे शक्य आहे तेवढे त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करू या.

## श्री आदिशक्तींचे कार्य

हे कार्य श्री आदिशक्तींचे आहे. ते कुणा एका संताचे किंवा कोणत्याही अवताराचे कार्य नाही. नि:संशय ते सर्व काही आहेत. हे सर्वजण आपल्याबरोबरच आहेत. सदासर्वदा ते आपल्याला मदत करतात, परंतु तुम्हां लोकांजवळ आदिशक्तींची शक्ती आहे. ती शक्ती फार महान आहे, ती अगदी सूक्ष्म दृष्टी असलेली आहे. शिवाय अलौकिक आहे. ती शक्ती पुष्कळ परिणामकारक आहे. परंतु तुम्ही तुमच्या शक्त्या जोपर्यंत जाणत नाही तोपर्यंत तुम्ही त्या कशा घटित करू शकता? ते बंद असलेल्या मशीनप्रमाणे असते. यंत्राला सर्व काही गोष्टी असतात. पण ते कोणी चालवू शकत नाही.

सदासर्वदा मला पुष्कळ जोखमीच्या काळामधून जावे लागते आणि कधीकाळी मला असे वाटते की, मला दुसरा जन्म घ्यावा लागेल. माझ्याकरिता अशा पद्धतीने या गोष्टी फार कठीण असतात. परंतु आता तुमच्याकरिता फार सोपे झालेले आहे. जसे एखादा रस्ता बनविण्यासाठी पुष्कळ मेहनत घेतो. परंतु त्यावर जे चालतात, त्यांना हे कळत नाही की हे सर्व अगदी सहजपणे कसे प्राप्त झाले आहे. आणि एकदा का त्यांना हे कळले तर त्यांना याची जाणीव होते 'या रस्त्यावर पुष्कळ लोकांनी चालत रहावे कारण हा रस्ता अशा सबुरीने, समजूतदारपणे आणि प्रेमाने बनविलेला आहे.'

मी खरोखरच हे पाहत आहे तुम्ही सर्व सहजयोगी हे जग बदलण्यासाठी अगदी आटोकाटपणे कार्य करत आहात. हे जग बदलायला हवे. म्हणजे मानवता तुमच्या माध्यमातून वाचलीच पाहिजे आणि इतर कुणाकडून नव्हे. राष्ट्राध्यक्ष नाही, पंतप्रधान नाही, मंत्री पण नाही, या लोकांपैकी कोणीही हे जग बदलू शकणार नाही. हे सर्व पाहता फक्त तुम्हीच यासाठी पात्र आहात आणि ही शक्ती तुम्हाला प्राप्त झालेली आहे. तुम्ही तुमचा स्वत:चे दर्जा जाणला आहे कां? त्याचप्रमाणे तुमचे स्वत:चे अस्तित्व जे उच्च स्थितीत उत्कर्ष पावलेले आहे याची तुम्हाला जाणीव आहे कां? जर याची जाणीव असेल तर तुम्ही तुमचे प्रेम आणि करुणा इतर लोकांकरिता व्यक्त करण्यासाठी तुम्ही सर्वांनी बाहेर पडले पाहिजे आणि ते लोक काय आहेत याची त्यांना जाणीव द्यायला हवी.

फक्त सहजयोगाच्या सहाय्याने तुम्ही हे विश्‍व वाचवू शकता. याकरिता दुसरा कुठलाही मार्ग नाही. तुम्ही काही म्हणा, काही प्रयत्न करा, जसे गरिबांना मदत करणे किंवा असे तसे सहाय्य करणे किंवा अशाप्रकारचे कार्य हे सर्व अत्यंत वरवरचे ठरते. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आत्मसाक्षात्कार देणे. आपण लहान मुलांना पाहिले आहे की, ती बालमंडळी आता कशी पुढे येत आहेत. ते महान सहजयोगी होणार आहेत. ते मला दिसते आहे, पण त्यांच्यासमोर तुम्हाला तुम्ही जे काही केलेले आहे

त्याबद्दल स्वत:चे चांगले गुण दाखविले पाहिजेत. हे स्थितीजन्य कार्य नाही. ती एक फार मोठी चळवळ आहे. जी चळवळ वस्तुत: स्फोटक असली पाहिजे आणि जोपर्यंत मोठे पाऊल आपण उचलत नाही तोपर्यंत मला कळत नाही की, उद्याच्या न्यायनिवाड्याच्या दिवसासाठी कोणाला दोषी ठरवले जाईल.

तुम्ही असे काही लोक आहात की तुम्हाला मानव जातीचे प्रारब्ध घडवायचे आहे. हे कार्य तुम्ही पुढे ढकलू नका. यामध्ये काही राम नाही असे समजून ते पुढे पाठवू नका. तुम्ही तुमचा आत्मसाक्षात्कार कधीही मिळवू शकला नसता. तुम्ही कधीही माझ्याकडे आले नसता. पुष्कळ जणांपैकी तुम्ही फक्त माझ्याकडे आलात आणि आत्मसाक्षात्कार मागितला व तो तुम्हाला प्राप्त झाला. तुम्ही हे जाणता की आत्मसाक्षात्काराची बळजबरी केली जात नाही. ती बळजबरी करण्याची गोष्ट नाही. ही जागृती जबरदस्तीने देता येत नाही. तसेच ह्या जाणिवेची वाढ बळजबरीने करता येत नाही.

तुम्ही तुमच्यामध्ये अगदी खोलवर चित्त विकसित करावयाचे आहे आणि बघा तुम्ही काय केले आहे, काय केले आहे? जर तुम्ही अद्याप पैशाच्या समस्येमध्ये किंवा सत्तेची अभिलाषा ह्या किंवा अशा समस्येमध्ये गुंतलेले असाल तर तुम्ही स्वत:च एक समस्या असाल. तुम्ही सहजयोगी असू शकत नाही.

सहजयोगी प्रत्येक गोष्टींच्या पलीकडे आहे आणि तो फार शक्तीमान आहे. सहजयोगी प्रेम आणि करुणा यांची शक्ती प्राप्त करतील. ही शक्ती म्हणजे शब्दमात्र प्रेम नव्हे किंवा केवळ दुसऱ्यावर प्रेम करावयाची कृती नव्हे. ते म्हणजे एक शक्तिशाली व्यक्तिमत्त्व असते. ते तुमच्याकडे असू शकते. ते व्यक्तिमत्त्व महापरमेश्वरी प्रकाश प्रकट करत असते व लोकांना जिंकत असते म्हणून सर्वांनी अत्यंत साहसी व्यक्तिमत्त्व स्वीकारले पाहिजे.

# प्रकरण दोन

# प्रचार-प्रसाराची आनंददायी कला

‘‘प्रचार-प्रसाराची गरज
तुम्ही निर्माण करायची आहे.’’

## परमेश्वराची निर्मिती

परमेश्वराने हे विश्व सहा दिवसात निर्माण केले आणि सातव्या दिवशी त्याने विश्रांती घेतली. परंतु आठव्या दिवशी त्याने काय केले? त्यांनी आत्मसाक्षात्कार देण्यास सुरुवात केली. अगदी अविश्रांत. **अतिशय परिश्रम करून..... सहजयोगाची सूक्ष्म बाजू** अत्यंत साधी आहे. **ती आहे करुणा, क्षमाशीलता, प्रेम. परंतु सर्वात महान आहे ती म्हणजे परमेश्वराची सेवा.** आपण परमेश्वराचे कार्य करीत आहोत, तर आपण कसे काय दमून जाऊ? आपल्यामधून चैतन्यशक्ती वहात आहे आणि करुणा इतकी महत्त्वपूर्ण आहे, परिपूर्ण आहे आणि प्रेम इतकं सौंदर्य फुलवणारं आहे तरं ते कार्य आपण कसे करणार नाही?

## कलाकार

मी कलाकार आहे आणि मीच कला आहे परंतु तुमच्याबद्दल काय? तुम्ही कोण आहात? तुम्ही असे आहात, की ज्यांची तुम्हाला निर्मिती करायची आहे आणि तुम्ही निर्माण करू शकता व तुम्ही कलाकार बनू शकता. हेच मला सांगायचे आहे. तुम्ही केवळ प्रकाश नाहीत तर असा प्रकाश की जो दुसऱ्यांनाही द्याल. शिवाय तुम्ही तो प्रकाश संवर्धित करू शकाल, जो प्रकाश तुम्ही दिलेला आहे! हाच फरक तुमच्यात आणि इतर लोकांत आहे. तुम्ही फक्त कलाकारच असणार नाही, तर तुम्ही कलाकाराच्या कलेचा आनंद घेऊ शकाल. जे काही तुम्हाला मिळाले आहे ते हे आहे. तुम्हाला माहीत नाही, तुम्हाला तुमच्या शक्तीची जाणीव नाही. जी शक्ती तुम्हाला प्राप्त झाली आहे ती अत्यंत क्रियाशील आहे आणि तीच तुम्हाला स्वीकारायची आहे, पण आमचं लक्ष तिथे आहे जिथून ही घाण येत आहे. हा ओंगळपणा कुठून येत आहे. तुम्ही जाणता कुरूपता कुठे आहे ती.

तुम्हाला आत्मसाक्षात्कार देण्याची कला प्राप्त झाली आहे. तुम्हाला तुमच्या कुंडलिनीचे ज्ञान आहे. सर्व काही तुम्ही ते जाणता. आता पुढे जा आणि लोकांशी बोला.

## ज्ञान

मला साधने हवी आहेत आणि ही साधने जे त्यांचे कार्य जाणतात, ते स्वत:लाही जाणतात आणि ते करण्यासाठी ते पुरेसे सक्षम आहेत. आपण नि:संशय विशेष माणसे आहात. नाही तर तुम्ही इथे कसे आला असता? आणि ती विशेष गोष्ट म्हणजे तुम्ही या परमेश्वरी शक्तीचे चांगले ऊर्जावाहक आहात. तुम्ही आश्चर्यकारक ऊर्जा वाहक आहात. तुम्ही त्यात निष्णात आहात. ती ऊर्जा कार्य करते ती स्वयंचलितपणे कार्य करते. परंतु तुमचा परमेश्वरी शक्तीशी संयोग परिपूर्ण असला पाहिजे. अबाधित मूल्यांबद्दल बोलणं हे योग्य आहे, पण ती अबाधित मूल्ये आपल्यामध्ये आहेत का किंवा नाहीत? जर ती असतील तर ती दुसऱ्यांमध्ये आपण का ठसवू शकत नाही? ते फार कठीण नाही. ते बिलकूल कठीण नाही. मी तुम्हाला ते सांगते. मी एक साधीसुधी गृहिणी आहे समजलं! परंतु केवळ माझं प्रेम, मी म्हणते माझा स्वभाव यामुळे ते सर्व काही घटित झालं. मी माझ्याबद्दल खात्री देते जरी मी बाह्यांतरी साध्या, नम्र गृहिणीसारखी दिसते. लोकांना असं वाटत की मी जास्त बोलू शकत नाही कारण मला इंग्रजी येत नाही-अशी स्थिती होती. तो काही मुद्दा नाही. मी काय होते ते मी जाणत होते. मी काय होते, आहे ते मला पक्के माहीत होते. परंतु एवढे पुरे! हाच फक्त फरक आहे. जर तुम्ही हे ज्ञान तुमच्यात विकसित केले तर तुम्ही क्रियाशील होऊ शकता. तुम्हाला काही महत्त्वाकांक्षा नसेल, तुम्हाला इच्छा नसेल, तुम्हाला क्रोध नसेल, तुम्हाला लोभ नसेल या सर्व गोष्टी अशाच गळून पडतील.

## निर्मिती

तुम्हाला अशा प्रकारचे पुष्कळ लोक निर्माण करणे फारसे कठीण नाही. हे सर्व विश्व बदलून टाकणे फार कठीण नाही. आता ती वेळ आली आहे. अगदी योग्य वेळ आली आहे. या प्रमाणे योग्य वेळ येते, तेव्हा वसंत ऋतूचा काळ येतो, तेव्हा फुलांचे रूपांतर आपोआप फळात होते. त्याचप्रमाणे तुम्ही सर्वजण असे बनलेले आहात.

सहजयोगाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी बीज निर्माण करणे हे कार्य तुम्ही करायचे आहे. आता जाणिवेच्या अशा स्तरावर आहात जिथे आता तुमच्याबरोबर परमचैतन्य आहे. जे तुमचा आंशीक भाग आहे. अगदी ते तुमच्याबरोबर तुम्हाला आवश्यक मदत, आवश्यक प्रतिष्ठा आणि व्यक्तीमत्त्व देण्यासाठी आहे.

मी तुम्हाला पूर्वी सांगितल्याप्रमाणे की आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही अतिशय सृजनशील होता आणि प्रत्येक गोष्टीत सृजनशील असता विशेषकरून दुसऱ्यांना आत्मासाक्षात्काराची जागृती देण्यामध्ये. आणि तुमच्या जीवनामध्ये कला, संगीत, काव्य, नाट्य आणि लेखन या सर्वप्रकारच्या गोष्टी करण्यात तुम्ही क्रियाशील असता.

या वास्तवाच्या राज्यामध्ये तुम्ही काय केले आहे? तुम्ही कधी वास्तवतेचा आनंद घेतला आहे? परमेश्वराच्या या वास्तविक प्रेमाचा आनंद तुम्हाला कधी जाणवला आहे का? त्यामध्ये तुम्ही कधी विरघळून गेले आहात का? किंवा तुम्ही अद्याप किनाऱ्यावरच उभे आहात आणि निरीक्षण करीत आहात. तुम्ही निर्माण करू शकता. तुम्ही भरपूर आनंद, प्रचंड सुख-शांती निर्माण करण्यास अगदी सक्षम आहात. आजचे जग पाहा काय परिस्थिती होऊन बसली आहे? पूर्ण गोंधळ, घोटाळा आणि सर्व प्रकारचा भ्रष्टाचार आणि विध्वंसक गोष्टी चालू आहेत. म्हणून किती हे विद्रूप विश्व बनले आहे. ते तुम्ही सुंदर करू शकता का? ते तुम्ही करू शकता कारण तुम्ही लोकांमध्ये बदल घडवून आणू शकता, पण जर तुम्ही स्वतःच सुंदर सहजयोगी नाही तर तुम्ही ते कसे करू शकाल? म्हणून तेव्हा ते घटित करतांना आपले लक्ष आपल्यावर असले पाहिजे आणि मग या परमेश्वराच्या राज्यात इतरांना आणले पाहिजे.

या परमेश्वराच्या विश्वविद्यालयात आपल्याकडे पदवी नाही. आपण तुम्हाला दाखले देत नाही. तुम्हाला जागृती मिळाली असेल तर तुम्ही सहजयोगी आहात. जर तुमची कुंडलिनी येथे छेदन करून बाहेर आली असेल (प.पू.श्रीमाताजी त्यांचा हात त्यांच्या सहस्रारावर ठेवतात.) तर ते

ठीक आहे. तुम्ही सहजयोगी आहात परंतु तुम्ही खरे सहजयोगी कदाचित असू शकणार नाही. हे सर्व तुम्ही किती आनंदी आहात आणि इतरांना आत्मसाक्षात्कार देण्यासाठी किती उत्सुक आहात त्यावर अवलंबून आहे. तुमचा आत्मसाक्षात्कार तुम्ही वाटलाच पाहिजे. तो तुमच्याजवळ ठेवू नका. जर तशी तुमची स्थिती नसेल तर तुम्ही अद्याप परिपूर्ण सहजयोगी नाही. तुम्ही किती लोकांना आत्मक्षात्कार दिला आहे ते आधी शोधू काढा. ते फार महत्त्वाचे आहे. कारण पुढच्या वर्षी जसे मी तुम्हाला सांगितले, की ते फार महत्त्वाचे आहे. फार फार महत्त्वाचे वर्ष आहे. त्यावर्षी मला बघायचे आहे तुम्ही सर्वजण आजूबाजूला जाऊन जागृती देत आहात.

तुम्हाला तुम्ही खाजगी जीवनात काय करावे हे सांगण्यासाठी मी इथे आलेली नाही. पण तुम्ही स्वत:ला निर्मळ, स्वच्छ व सुंदर ठेवले पाहिजे आणि त्यासाठी तुम्ही काय करायला हवे ते जाणून घेतले पाहिजे. काही लोक इतके उथळ आहेत, की हे सर्व काही त्यांच्या डोक्यात शिरत नाही. सहजयोग त्यांच्या मेंदूत शिरत नाही. अगदी पूर्णपणे उथळ लोक. म्हणून त्यांना विसरून जा. मला अस वाटत नाही की ते वाचू शकतील. म्हणून त्यांना विसरून जा. ते आनंद घेऊ शकणार नाहीत. त्यांना नेहमीच अर्थहीन गोष्टींबद्दल चिंता असते. म्हणून अशा लोकांबरोबर काही करण्याची गरज नाही. पण अजून पुष्कळसे लोक आहेत. अजून ८०% लोक जे सत्याच्या शोधात आहेत त्यांना आपण मदत केली पाहिजे.

आणखी एक गोष्ट जी तुमच्या आईची इच्छा आहे, की तुम्ही सहजयोगाची जबाबदारी तुमच्यावर घ्यावी व जो कोणी येईल त्याला त्याबद्दल सांगत राहावे याचा अर्थ मला स्वस्त अशी लोकप्रियता नको, पण मला प्रत्येक ठिकाणी सहजयोगी बनलेले हवे आहेत.

# प्रकरण तीन

# प्रचार-प्रसाराची इच्छा

''सदासर्वकाळ आग्रही इच्छा असली पाहिजे,
की आपण सहजयोग कोणत्या पद्धतीने
प्रसारित करणार आहोत.
ती पद्धत आपण शोधली पाहिजे.''

## शुद्ध इच्छा

आपण आपल्यामध्ये आपली शुद्ध इच्छा प्रस्थापित केली पाहिजे, की आम्ही सत्याचे शोधक आहोत आणि आपल्याला आपली पूर्ण वाढ आणि परिपक्वता प्राप्त करायची आहे म्हणून आजची पूजा सर्व विश्वासाठी आहे. सारे विश्व या इच्छेने प्रकाशित करायचे आहे. तुमची इच्छा इतकी तळमळीची असली पाहिजे, की तुम्हाला आपल्या महाकाली शक्तीचे शुद्ध परमचैतन्य जाणवले पाहिजे. महाकाली शक्ती म्हणजे आत्मा प्राप्त करण्याची शुद्ध इच्छा, हीच खरी शुद्ध इच्छा आहे. इतर सर्व इच्छा ह्या मृगजळाप्रमाणे आहेत.

तुम्हीच ते सर्व लोक आहात ज्यांना खास करून परमेश्वराने निवडलेले आहे. प्रथम तुम्ही इच्छा व्यक्त करा आणि नंतर निर्मळतेची तीव्र इच्छा प्राप्त करा. तुम्हाला सारे विश्व शुद्ध करायचे आहे, केवळ सत्यशोधकांना नाही, तर जे कोणी सत्याचे शोधक नाहीत त्यांनासुद्धा. अंतिम ध्येय म्हणजे आत्मा प्राप्त करण्यासाठी तुम्हाला इच्छेच्या विश्वाभोवती तेजोवलय निर्माण करायचे आहे.

या इच्छेशिवाय हे विश्व अस्तित्वात आलेच नसते. परमेश्वराची इच्छा म्हणजेच होली घोस्ट आहे. सर्वत्र पसरवलेली शक्ती. आपल्यामध्ये ती कुंडलिनी स्वरूपात आहे. कुंडलिनीला एकच इच्छा असते, ती म्हणजे आत्मा बनण्याची. जर इतर काही तुम्ही इच्छा केली तर कुंडलिनीचे उत्थापन होत नाही. जेव्हा ती जाणते, की ही इच्छा कोणा अशा व्यक्तीकडून परिपूर्ण होणार आहे जो साधकांच्या समोर आहे, तेव्हा ती जागृत होते. जर तुम्हाला इच्छा नसेल तर कोणीही तिचे उत्थापन करू शकणार नाही. सहजयोग्यांनी इतर लोकांवर त्यांच्या इच्छेचा दबाव आणण्याचा प्रयत्न करू नये.

सदासर्वदा आपली आग्रही इच्छा असली पाहिजे. आपल्याला कोणत्या पद्धतीने सहजयोगाचा प्रचार करायचा आहे, ती पद्धत शोधून काढली पाहिजे. अन्यथा ते असे होईल जसे श्री येशूंनी वर्णन केले आहे, की

काही बीज दलदलीच्या जमिनीवर पडली आणि त्यांना अंकूर फुटले पण त्यांची कधीच वाढ झाली नाही. तुम्ही मात्र विशेष आहात म्हणून खऱ्या अर्थाने वाढणार आहात-तुम्ही काय करू शकता हे जाणल्यामुळेच!

तुम्ही परमचैतन्य आहात. जर तुम्ही जाणलेत, की तुम्ही परम चैतन्य आहात तर ते तुमचा मानसन्मान ठेवेल, तुमच्या प्रतिष्ठेची काळजी घेईल, तुमचा शब्द पाळेल आणि तुमची काळजी घेईल आणि जे काही तुम्ही बोलता किंवा इच्छा करता ते तुम्हाला मिळतेच. तुमच्या इच्छा बदलतात आणि तुमच्या इच्छा मूर्खपणाच्या गोष्टींसाठी असत नाहीत पण असे काही जे फार थोर आहेत त्याची इच्छा करतात जसे म्हणजे साऱ्या लोकांना बदलायचे आहे, तुम्हाला सहजयोगाचे कार्य करायचे आहे आणि या सर्व इच्छा पूर्णपणे पूर्ण होतात. जेव्हा तुम्हाला ते करावेसे वाटते किंवा ते आवडते किंवा त्याचा विचार करता ते काही विशेष आहे. अगदी पाहणंसुद्धा. जेव्हा तुम्ही काही बघता त्यामुळे तुमची बुद्धी गुंग होते आणि ताबडतोब परम चैतन्य त्याचा ताबा घेते आणि समस्या नसते. बिलकूल समस्या नसते कारण या मार्गाने आपण सर्व अडचणींवर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतो. आपल्या अडचणींना आणि तथाकथित जीवनात त्या फुटकळ गोष्टीविरूद्ध प्रतिक्रिया व्यक्त करतात, त्या गोष्टी एक नाटक बनते. जणू काही देखावाच. तुम्हाला आश्चर्य वाटते, तुम्ही ते बघता आणि ते सर्व काही संपून जाते. त्याकडे पाहिले आणि ते नष्ट झाले. याप्रमाणे हा प्रकाश आहे. जर तो अंधारात शिरला तर तो अंधारच नष्ट होतो. अंधकाराचा नाश होतो तशा आपल्या समस्यासुद्धा नष्ट होतात.

ही जी आपली चैतन्याची जाणीव आहे ती घटित करायची आहे. चैतन्याच्या जाणिवेला परम चैतन्य बनायचे आहे. तर तुम्हाला परमेश्वरी अंत:संवेदना (अंत:प्रेरणा) प्राप्त होतील. प्रत्येक गोष्ट ही परमेश्वरी आहे, परंतु हे एवढेच नव्हे तर परमेश्वराची मदतसुद्धा मिळेल आणि परमेश्वराकडून सर्व समस्यांचे निरसन होईल हे सर्व काही आश्चर्यकारक आहे. प्रत्येक गोष्ट शांत होते आणि मिटून जाते. तुम्हाला आश्चर्य वाटेल हे

सर्व साक्षीभावाने पहाता, की तुम्ही सर्व गोष्टी करतांना मधोमध आहात. तुम्ही करीत आहात याची जाणीव तुम्हाला नसते आणि तुम्ही ते करीत असता म्हणजे अहंकाराचा विचार तिथे नसतो. परंतु तुम्ही तुमच्या आजूबाजूला काय होत आहे ते पाहता नंतर आश्चर्य वाटते, की हे कसे घडत आहे? पूर्ण जीवनशैलीच बदलून जाते, समज बदलून जातो आणि तुम्ही दुसऱ्यांसाठी सुखाचा, आनंदाचा आणि ज्ञानाचा निर्झर बनता. तुम्हाला काही अभ्यास करावा लागत नाही. तुम्हाला पुष्कळ जाणून घेण्याची गरज नसते, तरी पण तुम्ही प्रत्येक गोष्ट कोणती चांगली आहे व चुकीची आहे ते जाणता आणि नंतर तुम्ही ती गोष्ट पूर्ण अधिकाराने सांगता, की हे बरोबर नाही.

सहजयोगात आल्यानंतर तुमच्या आवश्यकता नष्ट होतात आणि त्याचे रूपांतर एका इच्छेत होते. जसे 'अरे देवा, ती जी व्यक्ती चालली आहे ना, तिला बोलवू, तिला आत्मसाक्षात्कार देऊ?' रस्त्यावर तुम्ही कोणाला पाहिले तर म्हणता, 'इकडे या, इकडे या. मला तुम्हाला काही तरी द्यायचे आहे.' त्याला तुम्ही बसवाल आणि आत्मसाक्षात्कार द्याल. ती तुमची पद्धत आहे. वेड्याप्रमाणे असाल तर तुम्ही म्हणाल, 'बापरे! नाही नाही ह्याच्याकडे पहा ती व्यक्ती आत्मसाक्षात्काराशिवाय आहे. त्याला आत्मसाक्षात्कार देऊ या. तुम्हाला चर्चमध्ये जायचे आहे, तुम्हाला विद्यापीठात जायचे आहे, तुम्हाला सर्व अशा लोकसमूहामध्ये जायचे आहे जिथे त्यांना कसलीही कल्पना नाही, की ते काय प्राप्त करू शकतात आणि त्यांना निर्भयपणे आणि कोणताही आकस न ठेवता सांगा, त्यांच्याशी तुम्ही बोला, त्यांना मदत करण्यासाठी, त्यांच्या भल्यासाठी तुम्ही इथे आलेले आहात, आता आम्हाला ऐकून घ्या अगदी खात्रीने, अगदी निश्चयाने, की तुमच्यातील कुंडलिनी अति आनंदी होईल. हे पहा ती आता आनंदी नाही आहे. जे लोक तिचा वापर पूर्णपणे करीत नाहीत त्यामुळे ती आनंदी नाही. तुम्हाला मदत केल्यामुळे ती आनंदी होईल आणि साऱ्या विश्वाच्या मुक्तीच्या कार्यामुळे जे आवश्यक आहे ते केल्याने ती आनंदित होईल.

## मनोनिग्रह

मनोनिग्रह म्हणजे 'इच्छा' नाही. मनोनिग्रह याचा अर्थ कृतीमध्ये घटित केलेली इच्छा. म्हणजे तुम्ही काय करायचे की प्रथम तुम्ही इच्छा करायची नंतर ती कृतीत आणायची. हे तुम्ही करू शकता. सर्वप्रथम तुमच्याकडे इच्छा असली पाहिजे. हे तुम्ही जाणून घ्या. नि:संशय ती तर आहेच आणि तुम्ही प्रकाश देणारे आहात आणि तुमच्या मनोनिग्रहातून ते घटित होणार आहे. म्हणजे आपला मनोनिग्रह इतका शक्तिमान असला पाहिजे आणि आपल्या मनोनिग्रहाबद्दल आपण किती समर्पित असले पाहिजे ते प्रत्येकाने जाणून घेतले पाहिजे, की तुमच्यातील मनोनिग्रह किती अथांग आहे. एकदा का तुम्ही सहजयोग करायला सुरुवात केली, की तुम्हाला समजेल सहजयोग किती महत्त्वाचा आहे. जो सहजयोग तुमच्या सर्व निर्मितीला परमेश्वराच्या दृष्टीने आणि परमेश्वरी शक्तीच्या दृष्टीने खरा अर्थ देतो, ते आपण घटित केले पाहिजे. तो आहे आपल्या जीवनाचा हेतू आणि आश्चर्य म्हणजे तुमच्या मनोनिग्रहाने ते होणार आहे. माझ्या मनोनिग्रहाने नाही. मला इच्छा नाही, मला कर्म नाही. तुमचा मनोनिग्रह हे सर्व घटित करणार आहे. म्हणून तुम्ही तुम्हाला समर्पित झाले पाहिजे आणि आता तुम्ही तुमचं वजन (आध्यात्मिक) वाढवलं पाहिजे. मी किती मनोनिग्रह केला आहे. शिबिरे तुम्हाला मदत करतील, की सहजयोग यशस्वी झाला पाहिजे, याचा मनोनिग्रह किती करावा हे पाहण्यासाठी. ही दुसरी गोष्ट आहे. ते यशस्वी करण्यासाठी आपण काय करायला हवे तर आपण सहजयोगाची मूलतत्त्वे समजून घेतली पाहिजेत. आपणाला ती मूलतत्त्वे समजलीत का? ती त्याची गुणवत्ता ज्यामुळे या तत्त्वाची धारणा करू, ती आपल्याकडे आहे का? आणि पहिलं मूलतत्त्व सहजयोगाचं असं आहे, की तुम्ही तुमचा आत्मा बनायचं आहे, ज्यामुळे तुमचे शरीर फक्त आत्म्याची शक्ती बाहेर टाकेल. हे सहजयोगाचे पहिले तत्त्व आहे.

मनोनिग्रहाबरोबर तुम्ही कसे वागाल? सर्वप्रथम तुम्ही तीव्र इच्छा करा आणि नंतर कृती करा. मी कोठे चाललो आहे? मी काय करीत आहे? मी

सत्यशोधक म्हणून ही गोष्ट मान्य करायची आहे का? ताबडतोब संतुलन येईल. हे संतुलन आले पाहिजे. सर्वप्रथम गोष्ट ही आहे, तुम्हाला संतुलन करावे लागेल. कोणतीही अतिरेकी वर्तणूक संतुलित केलीच पाहिजे. जीवनाबद्दलची अतिरेकी प्रवृत्ती थोडी खाली आणली पाहिजे. आता आपल्याला येथे आढळते, की मनोनिग्रह विरोधासाठी कार्यान्वित आहे आणि तो विरुद्ध दिशेने चालला आहे. उदा.लोक दुराग्रही बनतात. आपल्याला संतुलन हवे ही गोष्ट त्यांना स्वीकारायची नसते आणि ते म्हणतात, मी एकदम बरोबर आहे आणि ते, ते दाखविण्यासाठी सर्वप्रकारची स्पष्टीकरणे देतात आणि ते सांगतात ते यथायोग्य आहे. तुम्ही कोणासाठी स्पष्टीकरणे देता? तुम्ही स्वत:बरोबर संघर्ष करत आहात का? कारण तुम्ही अद्याप तुमच्यामध्ये पूर्णत्वाला आलेले नाही.

म्हणून दुसरा मुद्दा असा आहे, पूर्णत्व म्हणजे तुमच्या चित्ताचे पूर्णत्व (एकत्रीकरण). जेव्हा तुम्ही काही करू इच्छिता आणि त्याचीच इच्छा करता तेव्हा पूर्णत्व येतं. तुम्ही त्याच गोष्टीची इच्छा करता त्याच गोष्टीचा आनंद घेता, जर तुम्हाला दुसरच काही पाहिजे असेल तर तुम्हाला आढळून येईल तुमच्या चित्तात हे पूर्णत्व भरकटलेले आहे, पण जर तुम्हाला तुमचा आत्मा बनायचं असेल तर आनंदी राहण्यासाठी तुमचा आत्मा तुम्ही प्राप्त केला पाहिजे.

# प्रकरण चार

# प्रचार–प्रसाराचा वेग

''तुमच्यापैकी प्रत्येकाने रोज विचार केला पाहिजे की मी आज सहजयोगासाठी काय केले?''

## कार्य

तुम्ही अहंकारी असता कामा नये, पण स्वाभिमानी असले पाहिजे. स्वाभिमान असा, की तुम्ही सहजयोगी आहात आणि स्वाभिमान असा आहे, की तुम्ही अशा काळात जन्म घेतला आहे, की जेव्हा परमेश्वराचे कार्य तुम्हाला कर्तव्य म्हणून पुढे न्यायचे आहे आणि म्हणून तुम्हाला परमेश्वराने निवडले आहे. सर्वप्रथम तुम्ही स्थितीच्या पातळीवर आलेच पाहिजे. काही लोक एकाकी दुर्मुखलेले बनतात आणि एकांतात जातात असे मला आढळलेले आहे. त्यांना कधीच क्षमा केली जाणार नाही कारण परमेश्वराने त्यांना भरपूर दिले आहे. कल्पना करा एखाद्याने तुम्हाला हिरा दिला तर तुमचा स्वाभिमान जागृत होतो आणि तो धारण करून सर्वत्र मिरवता. परंतु जेव्हा तुम्हाला तुमचा आत्मा दिला (आत्मदर्शन) तर तुम्ही स्वाभिमानी असले पाहिजे आणि एकांतवासात जाता कामा नये. काही लोकांना वाटते 'मी आता कोणतेही कार्य करणार नाही, मी आता बाहेर जाणार नाही, मी घरी बसेन आणि ध्यान करेन' अशा लोकांना सहजयोगात स्थान नाही. 'मी हे करू शकत नाही.' 'करू शकत नाही' हा शब्द जे लोक सहजयोगी आहेत त्यांच्या शब्दकोशात असूच शकत नाही. हा शब्द काढूनच टाका.

मी चोवीस तास कार्यरत आहे, केवळ एक मिनिटसुद्धा मी फुकट घालवत नाही आणि त्याच पद्धतीने मी आशा करते, की तुम्ही सुद्धा चोवीस तास तुमच्या मुक्तीसाठी आणि साऱ्या विश्वाच्या मुक्तीसाठी समर्पित असले पाहिजे.

या जगामध्ये प्रत्येकाला काहीतरी करायचे आहे, परंतु सहजयोग्यांबद्दल काय? अशी दुर्मिळ गोष्ट जी तुम्हाला प्राप्त झाली आहे ती म्हणजे तुमचा आत्मसाक्षात्कार म्हणून तुमचे चित्त कुठेतरी का खर्ची करावे? आणि आपल्या ध्यानाकडे आपण का दुर्लक्ष करावे? आपल्याला प्रगती करायची आहे. आपल्याला वेगळे लोक म्हणून जगायचे आहे. या जगामध्ये आपण एक वेगळा वंश आहोत. आपण आत्मसाक्षात्कारी आत्मे आहोत. श्री येशूंच्या काळामध्ये क्वचितच असे लोक होते. मला असं म्हणायचं आहे वस्तुत: आणि त्यापूर्वी मला आश्चर्य वाटलं, की चीनमध्ये आणि इतर

ठिकाणी एका युगामध्ये एकच गुरू असायचा. तथापि आज तुम्ही पुष्कळ गुरू आहात. परंतु गुरू म्हणून तुम्हाला तुमची शक्ती वापरावीशी वाटत नाही.

ती शक्ती स्त्रियांनीसुद्धा का वापरू नये? माझ्या लक्षात आले स्त्रिया पुरुषांपेक्षा सहजयोगामध्ये अधिक सुस्त आहेत. हे लक्षात आले पाहिजे की मी सुद्धा एक स्त्री आहे. एकटी असूनसुद्धा मी हे सर्व कार्य केलेले आहे, तर तुम्ही ते का करू शकत नाही? या सर्व जगातील लोकांचा आंतरिक बदल करणे हे प्रचंड कार्य आहे, परंतु ते तुमच्यासाठी फार सोपे आहे. ते मी करू शकते तर ते तुम्ही का करू शकत नाही? त्यासाठी तुमचे पूर्ण चित्त त्यावर ठेवा. जसे 'आम्ही आमच्यासाठी सहजयोग घटित करणार नाही, परंतु सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी करणार आहोत.' आपल्याला त्याची फार फार गरज आहे. तुमची करुणा, तुमचे प्रेम उगाचच वाया जात आहे, जर तुम्ही फक्त तुमच्या फॅमिलीचा व तुमचाच विचार केला तर त्याचा उपयोग काय? तर आत्मसाक्षात्कारापूर्वी लोक तसे करतात. तुम्ही तुमच्या कुटूंबाशी पूर्णपणे आणि तुमच्या सर्व वस्तूंविषयी आसक्त राहून काय फायदा आहे? तुम्हाला साऱ्या विश्वाची आसक्ती असली पाहिजे. तुम्ही आता पूर्ण विश्वाचे आहात. तुम्ही यापुढे व्यक्ती म्हणून नसणार. यापुढे कधीही नाही. मी सांगते, आता जसा एका थेंबाने सागर बनतो तसे तुम्ही स्वत:ला सागर म्हणून ओळखलं पाहिजे. समुद्राची पातळी एकदम खालची मानली जाते. तुम्हाला माहीत आहे, की इतकी खालची की समुद्रापासून ०$^{\circ}$ सुरू होतो. म्हणजे सागर अत्यंत नम्र आहे, तो अत्यंत सखल बिंदूवर आहे. सर्व नद्या त्यामध्ये वाहून येतात. सागर आकाशामध्ये ढग निर्माण करण्याचे कार्य करतो. ते ढग फुटतात आणि त्याचा पाऊस बनून सागरामध्ये पडतो म्हणजे ते पुन्हा त्याच सागराकडे परत येतात. जे लोक नम्र आहेत ते पुकळ सहजयोग्यांना आकर्षित करतील. जे लोक दयाळू आहेत ते लोक पुष्कळ सहजयोग्यांना आकर्षित करतील.

## क्रियाशील बनणे

तुम्ही तुमच्या हृदयापासून पूर्णपणे समर्पित झाले पाहिजे. मी जे काही

आहे ती आहेच, मी तशी होते आणि मी तशीच राहीन. यापुढे वाढणार नाही किंवा कमीही होणार नाही कारण ते व्यक्तीमत्त्व अनंत आहे. जे जे शक्य आहे ते आता माझ्याकडून प्राप्त करून घ्या आणि या आधुनिक काळात तुमच्या जीवनाचे सार्थक करा. तुम्ही स्वतः पूर्ण परिपक्वतेपर्यंत मोठे व्हा. परमेश्वराचा परिपूर्ण हेतू तुमच्यातूनच होणार आहे. समर्पणाला ज्या क्षणी सुरुवात होईल तेव्हा तुम्ही क्रियाशील व्हाल आणि त्याच तत्त्वासाठी चिकटून रहाल. मला असे सांगायचे आहे की यासाठी फक्त एकच मार्ग आणि तो म्हणजे ध्यान. अर्थातच बौद्धिक पातळीवर तुम्ही पुष्कळ गोष्टी करू शकता. बौद्धिक पातळीवर तुम्ही मला स्वीकारू शकता.

तुमच्या हृदयामध्ये भावनिक पातळीवर तुम्हाला मी अधिक जवळची वाटेन. परंतु ध्यानाद्वारे, समर्पण करा! ध्यान काही नसून फक्त समर्पण आहे. जे परिपूर्ण समर्पण आहे. आता तुम्ही म्हणाल, 'आम्ही काय करायचे?' प्रत्येक दिवशी तुम्ही स्वतःला सामोरे जा. वास्तविक हे पहा, तुम्ही तुमचा किती वेळ या भौतिक चिंता करण्यावर खर्च करता आणि तुमच्या आत्मोन्नतीसाठी किती वेळ खर्च करता. तुम्ही तुमच्या चिंता, तुमच्या काळज्या सर्व काही त्या परमेश्वरावर सोडल्या आहेत का? तुम्ही तुमच्या पार्श्वभूमीमधून पूर्णतः बाहेर आलेले आहात का? जे काही निरर्थक आहे ते सोडून, त्या सर्व मार्गांना सोडून बाहेर आलात का? माझा इतरांशी कशाप्रकारे संबंध आहे? मी इतरांशी कशा प्रकारे संवाद साधतो आहे, जे सहजयोगी आहेत?

आता आपल्याला आळस करण्यासाठी वेळ नाही. आता तुम्ही आलेच पाहिजे आणि जागृत झालेच पाहिजे. आजचा हा दिवस असा आहे की मला अशी आशा आहे की तुम्ही निर्विकल्प स्थितीत उडी घ्यायची आहे. फक्त तुमच्या प्रयत्नानेच तुम्ही तिथे राहणार आहात अन्यथा तुम्ही परत खाली घसराल. म्हणून पुन्हा पुन्हा या प्रवचनाचे अवलोकन करा आणि त्याचा विचार करू नका. हे दुसऱ्या कोणासाठी आहे असा विचार करू नका, हे तुमच्यासाठी आहे. तुम्हा सर्वांसाठी, तुम्हा प्रत्येकासाठी. तुम्ही

प्रत्येकाने स्वत:ला जाणले पाहिजे. प्रत्येकदिवशी तुम्ही किती प्रगती करता? हा प्रेमाचा संदेश तुम्ही लोकांपर्यंत कसा पसरवणार आहात? दोन प्रकाराने तुम्ही त्यावर मेहनत करू शकता. व्यक्तिगतरित्या तुम्ही हे कसे करू शकता आणि सामुदायिकपणे ते कसे करू शकता? म्हणून मला केंद्रप्रमुखांना एक सुचना द्यावयाची आहे की जी काही सूचना लोकांकडून येईल ती तुम्ही स्वीकारावीच. तुम्ही केवळ केंद्रप्रमुख आहात. तुम्हाला एकमेकांना विदित करावयाचे आहे. कोणावरही तुम्ही वर्चस्व करायचे नाही. कोणतीही गोष्ट कोणावरही लादायची नाही. तुम्ही फक्त माझ्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये संदेशवाहक आहात. म्हणून आता तुम्ही हे पहायचे, की हे लोक तुम्हाला नवीन कल्पना कशा देतात? त्यांना नाराज करू नका. असे समजू नका तुम्ही फक्त एक असे आहात, की तुमच्याजवळच कल्पना आहे. त्यांच्याकडून नवीन नवीन कल्पना ह्या कदाचित त्यांनासुद्धा ब्रह्मांडाकडून प्राप्त होत असतील. ते सांगतील ते केले पाहिजे. त्यांची नोंद ठेवली पाहिजे व त्याचा अभिलेख (नोंद) ठेवला पाहिजे. 'होय असे सांगितले गेले आणि हे केले गेले.' आणि नंतर जे काही शक्य आहे ते अनुसरण्याचा प्रयत्न करा. जर तुम्हाला शंका असेल तर तुम्ही मला दूरध्वनी करा. ते शोधा. कसेही करून या क्रियाशीलतेमध्ये त्यांना समाविष्ट करा. प्रत्येकजण यात सहभागी झाला पाहिजे.

## गती

ज्या शक्ती आपल्याकडे आहेत त्या सहजयोगासाठी आहेत. जशा परमपूज्य श्री माताजींजवळ सहजयोगासाठी शक्त्या आहेत, तशाच आपल्याकडेसुद्धा सहजयोगाचे कार्य करण्यासाठी शक्त्या आहेत. तसचे ज्याप्रमाणे प.पू.श्रीमाताजी काम करतात त्याप्रमाणे आपल्यालासुद्धा काम केले पाहिजे.

परंतु तिथे एक आसक्ती आहे. प.पू.श्रीमाताजी प्रत्येक गोष्ट करू शकतात, आपण काय करू शकतो? असे नाही, तुम्हालासुद्धा ते कार्य करायचे आहे. ही फार महत्त्वाची निरासक्ती आहे. मी तुम्हाला सांगते आहे. तुम्हाला ते स्वत:च करायचे आहे. असे नाही, की प.पू.श्रीमाताजी करतील.

सरतेशेवटी त्या सर्व काही करीतच आहेत. ते एका दृष्टीने बरोबर आहे, परंतु तुम्ही साधन आहात. मुख्य स्रोत तो असतोच. परंतु यंत्रांनाही काम करायला पाहिजे. हनुमानाप्रमाणे तुम्ही माझे साधन आहात. म्हणून तुम्हाला कार्य करावे लागेल. तुम्हाला कर्तव्य करावे लागेल. हनुमानाचा दुसरा गुण आहे तो कालातीत आहे. तो प्रत्येक गोष्ट अतिशय जलद गतीने करत असे. उदा.आपण सहजयोगावरील एक पुस्तक करीत आहोत. गेली सोळा वर्षे ते काम चालू आहे. ते घटित होत आहे. 'माताजी, ते काम सुरू आहे.' नंतर आपण आजारातून सहजयोगामुळे बरे झालेल्या लोकांची नोंद करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. ते होत आहे. फार चांगले आहे. होत आहे. अजून होत आहे. नंतर आपण सहजयोग रशियामध्ये पसरवण्यासाठी जात आहोत 'काम चालू आहे'. सर्व राक्षस अगोदरच तिथे पोहोचले आहेत, मात्र देवदूत अद्याप कार्य करीत आहेत. अगदी धीमेपणाने, अगदीच सबुरीने. म्हणून श्री हनुमानाच्या अनेक गुणांपैकी एक गुण, की ते जलद गतीचे व्यक्तिमत्त्व आहे. कोणी करण्यापूर्वी ते स्वतःच करतात. ट्रॅफरलगरला जाऊन नेपोलियनला हरवणे हे फार चांगले आहे. परंतु धर्माच्या क्षेत्रात मला वाटते लोक वेळेचे महत्त्व समजून घेत नाहीत. आपण विलंब लावणारे गुरू आहोत. आपल्याकडे उशीर करण्याच्या सवयी आहेत. 'मी फोन करतो, मी शोधून ठेवतो, मी करेन, ते होईल.' हाच सर्वात मोठ्या दुर्गुणांपैकी एक दुर्गुण आहे. जलदगतीने करणे ते चांगले. ताबडतोब आणि ते करण्याची आता वेळ आली आहे. परंतु 'पुढच्या वर्षी माताजी, आम्ही पाहू, माहीत आहे. गणपतीपुळ्याच्या कार्यक्रमानंतर आम्ही विचार करू. आमची चर्चा होईल. आमची वादावादी होईल.' हे आणि असेच काही तरी. गती श्री हनुमानाचा एक गुण आहे. तो आज प्रत्येकाने जाणून घेतलाच पाहिजे. जेव्हा आपण हनुमानाचे पूजन करतो तेव्हा आपल्यामध्ये चपळता आली पाहिजे. ते आताच केले पाहिजे. यापुढे ते आपण प्रलंबित करू शकत नाही. अगोदरच आपण फार उशीर केलेला आहे.

परिणाम बघण्यासाठी तुम्ही चपळ व्यक्तीप्रमाणे झाले पाहिजे. यापुढे

रेंगाळणे नाही आणि इतर गोष्टींविषयी समाधानी असले पाहिजे, परंतु त्या सकारात्मक गोष्टी हव्यात. आपण काय करत आहोत? इथे तर भरपूर कार्य आहे आणि ते कार्य आपल्याला करायला हवे, म्हणून आपले चित्त कार्यावर हवे आणि आपण तेच करीत आहोत. मला आनंद वाटतो की अमेरिकेकडून एक व्हिडीयो फिल्म बनवण्याची सूचना आलेली आहे, पण त्यामध्ये अडचणीही आहेत. पैसा कसा उभा करायचा? ते कसे घडून येईल? तुम्ही आता सुरुवात करा. तो तुम्हाला मिळेल कारण तुमच्याकडे शक्ती आहे. प्रत्येक गोष्ट योग्य पद्धतीने घटित होईल तुम्ही फक्त करायला सुरुवात करा.

जर आपण मानवासारखे वागलो तर सर्वप्रथम विचार करा, मग त्याचे नियोजन करा आणि पुन्हा ते रद्द करा. ते असे घटित होणार नाही. जरी हुनमान पिंगला नाडीवर सदा कार्यरत असले तरी ते काय करतात, आपले नियोजन बिघडवतात. हनुमानाच्या ऐवजी जर आपण पिंगला नाडीवर कार्यरत राहिलात तर ते योग्य होईल. जर तुम्ही ती नाडी चालवलीत तर ते मी योग्यरीतीने करेन. म्हणून सर्व काही आपले नियोजन श्री हनुमान बाजूला टाकतात आणि त्यामुळेच आपले नियोजन अपयशी ठरते. आपण वेळेबाबत अनियमित असतो आणि महत्त्व नसलेल्या गोष्टीबद्दल नियमीत असतो, पण आपण वेळेबाबत आणि सहजयोगातील आपल्या प्रगतीबद्दल नियमित नसतो. आपल्याकडे ध्येय (लक्ष्य) असलेच पाहिजे आणि आपल्याकडे निश्चित कालमर्यादा असली पाहिजे, ठीक आहे. यावेळेला आम्हाला ते प्राप्त करायचेच आहे, तर थोड्या वेगाने करा. ते अधिक चांगले होईल इतर सर्व काही गोष्टींचे व्यवस्थापन होऊ शकते. पण हे तुमचेच कार्य आहे ते कोणीही करणार नाही. ते कोणीही करू शकणार नाही. ते तुमचेच कार्य आहे. तुम्हालाच सहजयोग करायचा आहे. तुम्हालाच तो पसरवायचा आहे आणि तो एका पातळीवर जिथून लोक तो पाहू शकतील तिथे आणायचा आहे. अठरा वर्षे गेलीत, एकोणिसावे वर्ष आहे. हे पहा, आता तुम्हाला धाडस करायचे आहे. सामुदायिकरीत्या किंवा व्यक्तिगत. आणि अगदी निर्भयपणे काय होईल ते सर्व विसरून करायचे आहे. मला असं म्हणायचं

आहे, त्यासाठी तुम्ही तुरुंगात जाणार नाही, तुम्हाला कोणी फासावर चढविणार नाही याबद्दल खात्री बाळगा. मी म्हणते, जर तुमची नोकरी गेली तर तुम्हाला दुसरी मिळेल आणि जर तुम्हाला नोकरी मिळाली नाही तर तुम्हाला बैठे वेतन मिळेल. ठीक आहे. तर तुम्हाला निरर्थक गोष्टींची काळजी करण्याचे कारण नाही. मनुष्य बसून राहतो आणि सर्वसाधारण चिंता करतो. परंतु असे असतांनासुद्धा त्यांची (नोकरीतील) उद्दिष्टे गाठतात. त्यांची कामे करीत राहतात. तुम्हाला माहीत नाही, की तुम्ही देवदूत आहात. तुम्हाला फक्त हेच करायचे आहे. इतर काहीही महत्त्वाचे नाही.

मला आशा आहे की आजच्या पूजेमुळे तुमचा उत्साह, तुमचा धाडशी स्वभाव यामुळे तुमची पिंगला चैतन्यमय होईल आणि त्याबद्दल अहंकार न वाटता अत्यंत नम्र पद्धतीने जसे हनुमानाने केले तसे आपण आपले कार्य करू. हनुमान म्हणजे भरपूर कृतीशीलता, अतिशय नम्रपणा! किती सुंदर ऐक्य आहे! आणि ते तुम्हाला प्रकट करायचे आहे. जितके अधिक कार्य तेवढे तुम्ही स्वत:ला निश्चितपणे पुढे नेऊ शकता. तुम्हाला आढळून येईल, की नम्रता हीच एक गोष्ट आहे जी तुम्हाला मदत करते. आज्ञाधारकपणा ही अशी एक गोष्ट आहे जी तुम्हाला तुमचे कार्य पुढे नेण्यासाठी मदत करते आणि तुम्ही नम्र, अतिनम्र होता. पण जर तुम्ही असा विचार करीत असाल, की मी 'आधीपासूनच नम्र आहे' तर संपूनच गेले. पण जर तुम्ही जाणून घेतले, की हे कार्य परमेश्वरी शक्ती, परम चैतन्य करीत आहे, 'मी फक्त केवळ एक साधन आहे,' तर तिथे नम्रता असेल आणि तुम्ही परिणामकारक साधन बनाल.

तुम्ही खरोखरच या सर्व प्रसार माध्यमांकडे जायला हवे. मंत्र्यांकडे जाऊन भेटले पाहिजे. वेल्सच्या राजपुत्राला भेटले पाहिजे आणि आणखी दुसऱ्या व्यक्तींना भेटले पाहिजे. त्यांना भेटा, समित्या स्थापन करा आणि तुम्ही काय करू शकता ते बघा. जे आपण करीत आहोत त्याकडे आपले मन लावा. जर तुम्ही परमेश्वराचे कार्य करीत असाल तर तुमच्या चिंता काढून घेतल्या जातील. तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. फक्त ते कार्य स्वीकारा. पण तो स्व-प्रचार नाही. तसा तो नाही. तो सामुदायिकतेने

करण्याचा प्रचार प्रसार आहे.

मला आशा आहे, की तुमच्यातील सूक्ष्म बाजू तुम्हाला समजली आहे. तिथे काय आहे? आणि काय प्रदर्शित होत आहे. ते मी स्पष्टपणे बघू शकते आणि ते तुम्हीसुद्धा बघू शकता. तुम्ही सर्वजणसुद्धा. ध्यानामध्ये त्याची तुम्हाला जाणीव होईल, की ते तुमच्या आतमध्येच आहे. ही सर्वात महान गोष्ट आहे, की जी परमेश्वराला संतुष्ट करेल आणि परमेश्वर तुमची पूर्ण काळजी घेईल आणि याच आत्मविश्वासाने देवदूत हनुमानाप्रमाणे आपल्याला पुढे जायचे आहे आणि ते घटित करायचे आहे.

## आतील गती तंत्र

आता असे काही लोक आहेत, मी पाहिले आहेत, जे सवंग लोकप्रियतेची चिंता करतात. मी अशा लोकांना ओळखते जे दुसऱ्यांसाठी प्रत्येक गोष्ट करतात. हे कर, ते कर परंतु फक्त स्वस्तातील लोकप्रियता मिळवण्यासाठीच. त्यांना हे निश्चितपणे समजत नाही की तुम्ही जे काही करता ते अल्पमोल लोकप्रियता मिळवण्यासाठी! तुम्हाला सहजयोगामध्ये निवडणूक लढवायची नाही किंवा तुमचे मत कोणाला द्यायचे नाही. परंतु नेहमी काय घडते? जी व्यक्ती, जिच्याकडे सहजयोगाची कृतीशीलता आहे ती पटकन वर येते. हे प्रत्येकाला माहिती आहे. बोलणे नाही, कोणावर प्रभाव पाडणे नाही, देखावा करणे नाही आणि अल्पमोल प्रसिद्धीच्या मागे लागणे नाही. परंतु आतमध्ये प्रगती होत आहे. त्यासाठी मी तुम्हाला हे सांगू शकत नाही की काय करायचे आहे? एक वृक्ष कसा वाढतो? तर तो स्वतःहून वाढतो. तुम्ही तर सहजयोगाचे जिवंत उदाहरण आहात म्हणून तुम्ही स्वतः कसे काय प्रगती कराल? तुम्ही स्वतः आपोआप वाढणार आहात? ते परमेश्वराने तुम्हाला दिलेले वचन आहे. तेव्हा ते तत्त्व आत्मपरीक्षण आणि ध्यानाच्या माध्यमातून आपोआप वाढू दे. त्यालाच आपण पूर्ण समर्पण व भक्ती म्हणतो. यापूर्वी मी तुम्हाला श्रद्धा या शब्दाबद्दल सांगितले आहे ते म्हणजे केवळ प्रार्थना करणे नव्हे आणि ते केवळ विश्वास असणे नव्हे. परंतु श्रद्धा जी आहे ती तुमच्या हृदयात हवी. आनंद प्राप्त

करण्याचा आनंद, जो तुमच्या भक्ती आणि समर्पणातून मिळतो त्याला आपण श्रद्धा म्हणू शकतो आणि त्याच गोष्टीमुळे ते सर्व काही घटित होईल. परंतु त्यासाठी तुमचा स्वत:वर तसेच सहजयोगावर विश्‍वास हवा.

जेव्हा तुम्ही काही पाहता तेव्हा प्रतिक्रिया निर्माण होते. कोणत्याही वस्तूकडे माझ्या बघण्यामध्ये हा फरक आहे, की त्यातले तत्त्व प्रतिक्रिया करते. मी जेव्हा तुमच्याकडे पहाते तेव्हा तुमची कुंडलिनी प्रतिक्रिया देते. मी जेव्हा एखाद्या वस्तूकडे पहाते तेव्हा ती चैतन्यशील होते. फक्त कटाक्ष. प्रत्येक कटाक्षामुळे ती वस्तू प्रतिक्रिया देते आणि निरीक्षण म्हणजे काय आहे ते मी जाणते. केवळ एखाद्या व्यक्तीकडे पाहून मी ओळखते तो काय आहे. कोणत्याही वस्तूकडे पाहून मी जाणू शकते ते काय आहे. निरीक्षण आणि ती सर्व गोष्ट स्मरणात असते. जसं आम्ही जात होतो आणि ते म्हणाले, 'आमच्याकडे फक्त काळे दगड आहेत.' मी म्हणाले, 'नाही, तुमच्याकडे लाल दगडपण आहेत.' तर ती व्यक्ती म्हणाली, 'कुठे आहेत? तुम्हाला माहीत आहे?' मग मी त्यांना ती बरोबर जागा दाखवली. ते म्हणाले, 'श्रीमाताजी तुम्ही कसे ओळखलेत?' मी म्हणाले, 'कारण या मार्गाने आपण आठ वर्षापूर्वी गेलो होतो, तेव्हा मला माहीत आहे येथे लाल दगड आहेत.' म्हणजेच कोणतीही गोष्ट मी बघते ती चैतन्यमय होते आणि मी याचीसुद्धा नोंद घेते, की तिथे काय आहे आणि काय तयार आहे, जे योग्यवेळी वापरू शकतो.

पण मी काय करते? 'मी काहीही करत नाही.' मी काहीच करत नाही. मी विचार करत नाही. मी नियोजन करत नाही. प्रत्येक गोष्ट जी तुम्ही करता ती मी करत नाही. जेव्हा अशा पद्धतीचा तुमचा स्वभाव होईल तेव्हा तुम्हाला आश्‍चर्य वाटेल पुष्कळ प्रमाणात गतीतंत्र ते घटित करेल. तुम्हाला जोशिला व्यक्ती (डायनॅमो) बनण्याची आवश्यकता नाही, ते तुमच्यामधेच आहे. ते आतमध्ये आपोआप घटित होऊ द्या.

## चला सर्वजण बाहेर जाऊ या

तुम्हाला वचन द्यायचे आहे की, 'श्रीमाताजी, तुम्ही ज्या उत्साहाने

आणि ज्या कळकळीने कार्य करीत आहात, तसेच चित्त लावून आणि कळकळीने आम्ही ते कार्य करू आणि आम्ही सर्वजण प्रस्थापित होण्याचा प्रयत्न करू.' तुम्ही स्वत:ला शांत करा, मौन ठेवा. आपण फार अधिक बोलतो, अतिशय बडबडतो आणि काम काहीच करत नाही. तुम्ही तुमची ऊर्जा शांत स्थितीत राखून ठेवा. 'तुम्ही कोण आहात?' याची तुम्हाला पूर्ण कल्पना असलीच पाहिजे आणि तुम्ही समजून घेतले पाहिजे, की तुम्ही काय करत होता आणि त्यासाठी तुम्ही काय केले आहे? फक्त बोलणे, बडबड आणि बोलत राहणे. हा काही मार्ग नाही, की ज्यामुळे हे घटित होणार आहे. वातावरण चांगले आहे. प्रत्येक गोष्ट उत्तम आहे. भविष्यकाळ आनंददायी आहे. प्रत्येक गोष्ट उत्तम आहे. यापेक्षा पराकोटीची गोष्ट म्हणजे तुमच्या आईची आशा की तुम्ही पूर्ण विश्वाचा उद्धार करणार आहात. त्याकडेच आपले चित्त द्या. त्याचाच विचार करा जे तुम्ही घटित करणार आहात. त्यासाठी तुम्ही चालणारी, बोलणारी, पुढे जाणारी परमेश्वरी प्रेमाची अरण्ये बनले पाहिजे. परमेश्वरी प्रेम म्हणजेच ऋतंभरा प्रज्ञा.

तुम्ही आता चक्रीवादळात आहात. आता ते केवळ थंड वाऱ्याची झुळूक नाही. ते आता चक्रीवादळ आहे, तर आपल्याला काय करायला हवे? त्याबरोबर चालत राहायला हवे आणि तेवढाच वेग आपल्याला हवा आणि त्यांच्यामधीलच आपण एक असले पाहिजे. ते आपल्यातच आहे. आपण ते पाहू शकतो आणि पाहू शकतही नाही, पण आपण हे पाहू की, आपण त्या गतीने पुढे जात आहोत, पण उरलेले जग मात्र जात नाही. त्यामुळे आता गोष्ट अशी आहे की आपण त्याच्याबरोबर कसे जावे व ते आपल्यामध्ये कसे स्वीकारावे? या सर्व गोष्टी तुमच्यासाठी बनलेल्या नाहीत कारण तुम्ही साक्षात्कारी आत्मे आहात. जे लोक आत्मसाक्षात्कारी नाहीत त्यांच्यासाठी हे बनवलेले असावे. तुम्हाला समजले असेल मला काय सांगायचे आहे ते. तरीपण मला असं जाणवतं आहे, की तुमच्यापैकी काही लोकांना असं वाटतं की, 'मी दुसऱ्यांबद्दल बोलत आहे आणि तुमच्याबद्दल नाही.' आता तुम्ही असा विचार करा की, 'जे श्रीमाताजी बोलत आहेत ते

सर्व माझ्याबद्दलच आहे, मग ठीक आहे.' मग मला ते सांगितलेच पाहिजे आणि मला त्याबाबत जबाबदार राहिलेच पाहिजे आणि ही जबाबदारीची जाणीव तुमच्यामध्ये आली पाहिजे. म्हणजे 'आम्ही आता चक्रीवादळात आहोत.' आणि हे चक्रीवादळ सर्व जगाभोवती घेऊन जायचे आहे आणि त्यासाठी मी काय करीत आहे? फक्त केंद्रात जाणे आणि भेट देणे.' 'ठीक आहे, आम्ही केंद्राला भेट दिली.' लोकांना असं वाटतं की जर त्यांनी केंद्राला भेट दिली तर त्यांना सर्व आशीर्वाद दिले जातील. फक्त केंद्रांना भेट दिल्याबद्दल त्यांना काय आशीर्वाद द्यावेत? कोणत्यातरी तिरस्करणीय ठिकाणी जाण्याऐवजी ते केंद्रावर जातात. केंद्र म्हणजे सुवर्णभूमी, पण त्यांना कशासाठी आशीर्वाद द्यायचे? त्यांना मी अगोदरच आशीर्वादित केलेले आहे असे त्यांना वाटते. अरेच्या! आम्ही सामुदायिकतेमध्ये होतो. आम्ही असे होतो, पण सहजयोगासाठी तुम्ही काय केले आहे? ते महत्त्वाचे आहे आणि तेवढेच फक्त बघायचे आहे. किती लोकांवर खरोखरचे प्रेम तुम्ही केले आहे? खरोखरच प्रेम केले आहे? प्रामाणिकपणे आपल्याला त्याची गणती करायची आहे. ते फार महत्त्वाचे आहे आणि सहजयोगासाठी तुम्ही काय रचनात्मक कार्य केले आहे? जोपर्यंत तुम्ही काही विशेष कार्य करीत नाही तोपर्यंत तुम्हाला आनंदी वाटणार नाही.

ही आहे आध्यात्मिकतेची विशेष शक्ती. फार विशेष शक्ती! इतर लोकांपैकी कोणीही तुम्हाला हे बोलू किंवा सांगू शकत नाही की कुंडलिनी कशी जागृत करावी. आता तुम्हा सर्वांजवळ ती शक्ती आहे आणि ती अत्यंत दुर्मिळ आहे. तुमच्यापैकी सर्वांनी ती प्राप्त केली आहे. मला असे कोणी दिसत नाही, की ज्यांच्याकडे कुंडलिनी जागृत करण्याची शक्ती नाही. तुम्ही तुमच्याबाबत समाधानी असाल, कदाचित नसालही, पण ही फार चांगली गोष्ट नाही. जर तुमचे सहस्रार उघडले गेले आणि तुम्ही कुंडलिनी जागृती जाणत असाल तर आत्मसाक्षात्कार देण्यासाठी सर्वत्र गेले पाहिजे. आत्मसाक्षात्कारापेक्षा जास्त लोकांचा कशातही फायदा नाही. इतर काही धर्मादायी संस्था निर्माण करण्याचा, पैसे देण्याचा किंवा इतर काही देण्याचा

बिलकुल उपयोग नाही. सर्वात चांगली गोष्ट ही आहे. सर्वात चांगली गोष्ट ही आहे की सर्वत्र बाहेर जाऊन लोकांना भेटावे आणि ज्यांना आत्मसाक्षात्कार हवा त्यांना तो द्यावा. या आजच्या दिवशी मी म्हणते, की आता किती वर्ष संपलेली आहेत. मी खूप कठीण परिश्रम घेतले आहे. अगदी रात्रंदिवस आणि माझी फक्त एकच इच्छा आहे. तुम्ही लोकांनी ती गंभीरपणे घ्यावी व घटित करावी. तुमचा आत्मसाक्षात्कार फक्त तुमच्यापुरता ठेवू नका. जास्तीत जास्त लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार देऊ शकता. ते माझ्यावर फार मोठे उपकार होईल व परमेश्वरावरही. फक्त एकच गोष्ट, तुम्ही इतर सर्वांना आत्मसाक्षात्कार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही कधीही चूक करणार नाही. तुमच्याकडून कोणतीही चूक घडणार नाही कारण कुंडलिनी सर्व काही जाणते. ती तुम्हाला जाणते. ती हे ही जाणते तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात. ती तुम्हाला मान देईल. जरी तुम्ही काही चूक केलीत तरी ती बरोबर करेल. ती तुम्हाला कोणत्याही मार्गाने मदत करेल. मी तुम्हाला फक्त इतकेच सांगते, की मी फक्त एक गृहिणी आहे आणि मला कोणाचाही आधार नव्हता, पण मी याबाबत निश्चिंत होते, की माझे एवढेच कार्य आहे की सहस्राराचे छेदन कसे करायचे ते शोधणे. तो मार्ग काय होता? तो बाह्यांतरी. तरी हरकत नाही. फक्त माझे कार्य होते सहस्रार उघडण्याचा मार्ग शोधणे आणि ते मी केले आणि आता तुम्ही पण ते जाणता. आता ते तुमचे काम आहे आणि आता शास्त्रज्ञ तुमच्याकडे येतील आणि तुम्हाला प्रश्न विचारतील कारण त्यांना हे माहीत नाही की ते ज्या गोष्टीबद्दल बोलत आहेत ती तर आपण आधीपासूनच करीत आहोत. म्हणून तुम्ही सर्वजण अधिक शक्तीमान आहात, पण तुमच्यापैकी किती लोक खरोखरच हे कार्य करतात! हा मुद्दा आहे. आज फार महत्त्वाचा दिवस आहे. मला तुम्हाला आज सांगायचे आहे, की तुम्ही माझे हात मजबूत करा. असं म्हणतात, की देवीला हजार हात असतात. परंतु हजार हात आता सांगत आहेत की ‘तुम्ही तुमच्या दोन्ही हातासह या आणि ते घटित करा’ आणि हे फार महत्त्वाचे आहे आणि ते आपल्याला करायचे आहे. या जगातील सर्वप्रकारच्या समस्या ज्या येतात त्याचे कारण अज्ञान, राजकारण घ्या किंवा कोणतीही समस्या घ्या, ती

कशी सोडवली जाईल, तर परमेश्वराबरोबर असलेली तुमची शक्ती.

मी तुमचा आदर्श असली पाहिजे. जर तुम्ही संतांसारखे वागलात तर तुम्हाला फार मानसन्मान मिळेल. संतांनी आत आणि बाहेर संतवृत्तीनेच वागले पाहिजे. एखादी व्यक्ती त्यांच्याप्रमाणे वागते, प्रकाशित होते आणि प्रत्येकजण तसे जाणतो. 'अरे, हे पहा महान संत आलेले आहेत.' त्यासाठी तुम्ही अत्यंत धनवान असलेच पाहिजे असे नाही. तुम्ही फार मोठे राजकारणी असले पाहिजे असे नाही किंवा मोठे मंत्रीसाहेब यापैकी काहीही नाही, तर अगदी सामान्य व्यक्ती हे सर्व दर्शवू शकते.

म्हणून मला वाटते ह्या सर्व गोष्टींना सुधारण्याचा एकच मार्ग आहे, की तुम्ही सर्वांनी ती जबाबदारी घेतली पाहिजे. सर्वत्र प्रवास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आता काही लोकांनी सर्वत्र फिरलं पाहिजे. जा, निघा आणि केंद्र स्थापित करा. त्याची देखभाल करा. आणखी दुसऱ्या ठिकाणी जा. तिथे केंद्र प्रस्थापित करा आणि त्याची काळजी घ्या. आता जंगपूरा येथे केंद्र स्थापन करा किंवा इतर कुठेतरी. एकत्र येण्याचा प्रयत्न करा. काही पत्रके मंडईच्या जागी वाटा. काही लोकांना मिळवा. त्यांना प्रस्थापित करा. अगदी क्वचितच थोडेसे लोक हे सर्व घटित करीत आहेत. हा काही मार्ग नव्हे. तर तुमच्यातील प्रत्येकजण या पूर्णत्वाचा आंशीक भाग आहे. तुम्ही विभागाविभागातून जायला हवे. जिथे तुम्ही अद्यापपर्यंत गेलेला नाही. अजून आपल्याला काळ्या वंशाचे लोक पुष्कळ प्रमाणात मिळालेले नाहीत. मला असं वाटतं हे अफ्रिकेबाबत आहे. म्हणून मला असं वाटतं ते घटित करण्यासाठी अफ्रिकेला जावे लागेल. शिवाय आपल्याकडे इतरही भाग आहेत जिथे आपण हे घटित केले पाहिजे. जर तुमच्यामध्ये करुणा असेल तर ती करुणा हे करण्यास तुम्हाला भाग पाडेल की तुम्ही काम करा जेणे करून जे लोक सत्याच्या शोधात नाहीत त्यांना पण शांती मिळेल.

# प्रकरण पाच

# प्रचार-प्रसाराचा धर्म

''आम्ही या महान सत्याच्या धर्माचे आहोत.
या महा महा योगासाठी तुम्ही आता
जबाबदार असायला हवे.''

## स्वामित्वाची कल्पित गोष्ट

सहजयोगामध्ये कंजुषपणाला स्थान नाही. बिलकुल जागा नाही. कंजुषपणा हे अत्यंत क्षुद्र मनाचे लक्षण आहे. मी तुम्हाला असं सांगत नाही, की धन, पैसा मला द्या, पण ज्या मार्गाने आपण पैशाकडे पाहतो, ज्याप्रकारे तुम्ही त्याला चिकटून बसता. भौतिक गोष्टीला चिकटून बसता. भौतिक संपत्ती, भौतिक वस्तू, मालमत्तेवर तुमचे स्वामित्व असते. सर्वात महान स्वामित्व जे तुमच्याकडे आहे ते म्हणजे तुमच्या माताजी. त्यांच्या माध्यमातून तुम्हाला तुमचे बंधू आणि भगिनी आहेत. तुम्ही समजून घ्या ही स्वामित्वाची कपोलकल्पित गोष्ट. जसे काही लोक इतर लोकांवर आपल्या शक्ती लादतात, ते पण एक कल्पित आहे. काही लोक सहजयोगातून पैसे कमवण्याचा प्रयत्न करतात किंवा सहजयोगावर काही एक प्रकारचा हक्क दाखवतात. तो अगदी सूक्ष्म असू शकतो, पण तो दूरवर जाऊ शकतो. ही सूक्ष्मता इतक्या प्रमाणात वाढीस लागते, की काही लोकांना मी पाहिले आहे ते सहजयोगासाठी पैशाची बचत करतात. ते सुद्धा तुमचे पैशावरच चित्त आहे. पैसे मिळवणे व साठवणे आणि सहजयोग माध्यमातून धंदा करणे हे सर्व मूर्खपणाचे आहे. पण जर तुम्ही तसे म्हणालात तर मी सांगते, 'ठीक आहे. थोडा काळ चालू ठेवा आणि प्रयत्न करा आणि बघा.' तुम्हाला असे आढळून येईल, की सहजयोग धंदा नाही. अर्थातच! पण सहजयोगी एकत्र येऊन काम करू शकतात. काही एक धंदा करू शकतात, पण सहजयोग हा धंदा नाही. तो परमेश्वराचा व्यवसाय आहे. जे तुमच्याकडे आहे ती प्रत्येक गोष्ट तुम्हीच इथे द्यायची आहे. तुम्हाला कोणत्याही गोष्टीविषयी आसक्ती असता कामा नये. आसक्ती असता कामा नये. तुम्हाला पैसा म्हणून काही द्यायचे नाही, पण तुमचे ओतप्रोत भरलेले हृदय त्यासाठी द्या. जर तुम्ही तुमचे हृदय यात ओतणार नसाल तर सहजयोग प्राप्त होणार नाही. सत्तेबद्दलही अगदी तसेच आहे. काही लोक सहजयोगी लोकांवर आपली सत्ता ठेवू पाहतात. त्यांच्यावर आपला प्रभाव पाडतात आणि त्यांना आपल्या अंमलाखाली ठेवतात असे लोक सहजयोगाबाहेर फेकले जातात.

अगदी पूर्णपणे. तुम्ही लोकांनी प्रेमाच्या शक्तीचा आनंद घ्यायचा आहे जेणेकरून लोक तुमच्याकडे सत्ता गाजवणाऱ्या इतर कोणाही व्यक्तीपेक्षा त्यांचे रक्षणकर्ते, त्यांची मदत, मित्र, आधार म्हणून पाहतील.

## औदार्य

तुम्हा सर्वांसाठी हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे, की जो पैसा शिबिरांसाठी देतात, तो निखालसपणे मानवजातीच्या उत्कर्षासाठी वापरला जातो. तो सहजयोगासाठी येत नसेल पण सहजयोग्यांच्या माध्यमातून त्याचा फायदा होत असतो, म्हणून मी तुम्हाला विनंती करते, की तुम्ही कंजूष असता कामा नये कारण कोणत्याही फायद्याशिवाय पैसा राखून ठेवून काय उपयोग आहे? म्हणून तुम्ही सर्वांनी दान कसे करावे ते शिकून घ्या. दान मला नको पण जर तुमच्याकडे काही कल्पना असेल, जर त्यांना काही प्रतिष्ठान (न्यास) करायचे असेल, ठीक आहे, जर त्यांना योग्य असे लोक ते चालवण्यासाठी आढळले तर प्रतिष्ठान बनवण्यासाठी माझी हरकत नाही पण आपण उरलेसुरले मूर्ख लोक जसे करतात तसे करायचे नाही. म्हणून मी तुम्हाला विनंती करते सर्वांनी थोडेसे उदार व्हा. औदार्य आपल्या कार्याच्या सामाजिक गोष्टींना असावे. हे फार महत्त्वाचे आहे व त्याकडे आपल लक्ष असलं पाहिजे. काही लोक पैशाचाच विचार करणारे असतात. ते अत्यंत कंजूष असतात. ते सर्व पैसा त्यांच्यावरच खर्च करतात, पण दुसऱ्यांवर अजिबात नाही. ते फक्त बचत करण्याचा प्रयत्न करतात. एखाद्याला चांगले कार्य करायचे असेल तर ते लोक त्यांचा पैसा लपवून ठेवतात. परंतु त्यांच्यासाठी मात्र सर्वोत्कृष्ट दारू विकत घेतात. त्यांच्यासाठी उत्तम वस्तू विकत घेतात, पण दुसऱ्यांसाठी मात्र त्यांच्याजवळ पैसा नसतो. त्यांचे काही देणे द्यायचे असले तरी ते पैसे वाचवण्याचा प्रयत्न करतात व त्यांच्या देण्याचे पैसे भरणार नाहीत. त्यांना सर्व काही मोफत, काही वेळा पुस्तके, इतर वेळी काही असे मोफत हवे, ज्यासाठी लोक पैसे भरतात. कल्पना करा. तुमच्या आत्मसाक्षात्कारासाठी मला पैसे भरावे लागतात. माझ्या स्वतःच्या पैशाने मी प्रवास करते. माझ्या स्वतःच्या गोष्टी स्वतः करते. मी जे काही

केले आहे ते स्वत:च्या पैशातून. मला असं म्हणायचे आहे याची गरज आहे. की जे लोक हा कार्यक्रम आयोजित करतात त्यांनी मंडप घातला पाहिजे. मी फक्त तुम्हाला आत्मसाक्षात्कार विनामूल्य देण्यासाठी आहे. परंतु तुमच्या मंडपाचे पैसे देण्यासाठी नाही.

उद्या तुम्ही असं म्हणाल, 'आम्ही इथे कार्यक्रमासाठी आलो आहोत आणि जाणार आहोत. त्याचे भाडे द्या.' मला आश्चर्य वाटणार नाही. असे लोक अत्यंत कंजूष असतात. जेव्हा ते एखादा पै-पैसा देतात, तेव्हा ते विचार करतात तो पैसा त्यांना परत मिळाला पाहिजे आणि त्यांच्यासाठी काही अधिक केलेले असेल तर त्याची मात्र ते दखल घेत नाहीत. जे काही त्यांना मिळवायचे ते त्यांना मिळालेच पाहिजे, परंतु जेव्हा देण्याचा प्रश्न येतो तेव्हा ते शून्य असतात. हे पैसा पैसा करणारे लोक आश्चर्य म्हणजे श्रीमंत असतात. कोणाला काही समजूच शकत नाही की ते श्रीमंत कसे आहेत? कारण त्यांच्यामध्ये औदार्यासारखी गोष्टच नसते. प्राधान्य नावाची गोष्ट नसते. जसे पैसा कुठे खर्च करावा? हे जाणतच नाहीत. त्याबद्दल त्यांना आत्मसन्मानही नसतो आणि आत्मसन्मान नाही हे फार आश्चर्यकारक आहे.

हे सर्व अहंकारातून येते. त्या अहंकारामुळे वस्तूंची गुणवत्ता ते पाहू शकत नाहीत हे फार आश्चर्यकारक आहे. ते त्यांच्यावर पैसा खर्च करतात, ते हे खरेदी करतात, ते खरेदी करतात, पण योग्य अशा गोष्टींसाठी त्यांच्याकडे पैसा नसतो, ही सर्वात आश्चर्याची गोष्ट आहे. आपण ही गोष्ट पुष्कळ लोकांमध्ये पहातो, सहजयोगातही ही आढळते. त्यांना काही देणे असते. ते फार महत्त्वाचे असते, पण ते त्याचे पैसे देत नाहीत. तुम्ही पैसे वाचवू शकत नाहीत कारण इथे आत्मसाक्षात्काराचा संबंध आहे. हे फार आश्चर्यकारक आहे की जेव्हा हे लोक. असे वागतात तेव्हा एकामागोमाग हे सर्व देश एक गरीब होत जातात. जितकी अधिक तुम्ही पैशाची चिंता करता तितके ते अधिक बिघडते. अर्थातच मला पैशाची गरज नाही हे तुम्हाला माहीतच आहे. मला माहिती पण नाही, की कित्येक हजार रुपये माझ्या स्वत:च्या खिशातून खर्च केले आहेत. पण समस्या ही आहे, की हे अजून

कोणी समजूनच घेत नाही. ही शरमेची गोष्ट आहे, की गुरू तुमच्यासाठी खर्च करीत आहे. जे लोक मधोमध आहेत त्याच्यासाठी सुषुम्नेचा मध्यमार्ग आहे. ज्या लोकांना योग्य समज आहे, ज्यांना सुज्ञता आहे तेच लोक फक्त अधिक प्रमाणात उदार आहेत. तुम्ही कोणताही गुरू घ्या, सद्‌गुरू घ्या, कोणताही घ्या, नानक पहा, कबीर घ्या, तुकाराम घ्या. तुकारामाच्या मुलांनी त्यांना सांगितले, 'आमच्यासाठी ऊस घेऊन या.' ते घरी येत होते. रस्त्यात इतर सर्व मुलांनी ऊस मागितला म्हणून त्यांनी सर्व ऊस देऊन टाकला. घरी आल्यावर त्यांच्याकडे एकही ऊसाचे कांड नव्हते. ह्या सर्व संतांना अतिउदारपणामुळे त्रास झाला. ते इतके उदार होते, की तुम्ही कल्पना करू शकणार नाही. तुम्ही याबाबत मला ओळखणाऱ्या लोकांना विचारू शकता.

औदार्य हा एकमेव मार्ग आहे ज्यामुळे तुम्ही दुसऱ्यांकरता आपले प्रेम व्यक्त करू शकता. यापूर्वी मी हे सांगितले आहे. तुमचे भौतिक सुख, संपत्ती याला जोपर्यंत तुम्ही औदार्य जाणत नाही तोपर्यंत अर्थ नाही, पण ते औदार्य अत्यंत गुपचूप व शांतपणे झाले पाहिजे.

## आध्यात्मिक ऋण

प्रत्येकाने समजून घेतलेच पाहिजे आणि सर्वांनी ते शोधले पाहिजे, की तुम्ही सहजयोगात येण्यासाठी किती जबाबदार आहात आणि अर्थातच तत्क्षणी तुम्ही सर्वजण सुरक्षित होता, तुम्ही आशीर्वादित होतात आणि ज्याला जे हवे ते मिळते. त्या सर्वांपैकी किती जण आत्मसाक्षात्कार देण्यासाठी काम करतात? ते सुद्धा तुम्हावर ऋण आहे. जर तुमचे चित्त सहज असेल आणि तुमचे चित्त स्वच्छ नसेल, ते सर्वसाधारण नसेल तर तुम्ही ऑक्टोपसच्या सोंडेसारखे सर्वकाही गोष्टींमध्ये गुंतून राहता आणि तुम्ही ऑक्टोपसप्रमाणे बनता. कधी तुम्ही या गोष्टीवर आसक्त होता. कधी त्या गोष्टीशी निगडीत होता किंवा एखाद्या गोष्टीत अडकून बसता. तुम्हाला मुक्त पक्ष्यासारखे असायला हवे. ही सर्व आसक्ती, जी तुम्हाला कोठेही घेऊन जाणार नाही, तर तुम्ही सहजयोगाशीच आसक्त राहिले पाहिजे आणि याबद्दल सतर्क

असले पाहिजे. तुम्ही स्वत:ला जाणले पाहिजे. तुम्ही तुमची मूल्ये, तुमची पातळी समजून घ्या म्हणून मी तुम्हाला सांगते तरच तुम्ही सारं विश्‍व बदलवू शकता.

सर्वप्रथम तुम्हाला हे कळलेच पाहिजे, तुमची स्वत:ची व्यक्तिगत जबाबदारी काय आहे ती. कारण तुम्हालाच जो सर्व सहजयोग मिळाला आहे, तो पूर्णत: मोफत, परंतु तुमच्यावर निश्‍चित असं ऋण आहे आणि ते ऋण म्हणजे तुम्ही दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे आणि जर तो तुम्ही तुमच्याजवळच ठेवला आणि तुमचा केंद्रप्रमुख तो घटित करेल म्हणून सोडून दिलेत तर ते कधीच कार्यरत होणार नाही. तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे? त्याची तुम्ही गणती केली पाहिजे. तुम्हाला जे मिळाले आहे त्याची एक ठराविक स्थिती प्राप्त झाल्यावर तुम्ही अत्यंत क्रियाशील, अत्यंत सृजनशील बनता. या वयातसुद्धा मी काम करीत आहे, पण मला काय वाटतं, की एकदा का तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला तर त्यात स्थिरस्थावर झालात तर तुम्ही भिख्खूप्रमाणे बनता, पण आपल्याला भिख्खू आणि पुजारी नकोत तर आपल्याला काय हवे? तर ते सहजयोगी. जे लोक लोकांना सहजयोग सांगतील, जे सहजयोग वाढवतील आणि पुष्कळ सहजयोगी निर्माण करतील. तर तुम्ही आता गणती करा, की तुम्ही किती सहजयोगी निर्माण केले? फक्त आपल्याकडे आशीर्वाद आहेत, पण कर्तव्ये नाहीत. 'सहजयोगासाठी किती पैसा खर्च केला आहे?' सर्वप्रथम तुम्ही सर्वांनी हा प्रश्‍न विचारलाच पाहिजे, 'मी सहजयोगासाठी किती वेळ दिला आहे? मी किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे. मी किती सदाचारी आणि गुणवान आहे? सहजयोगाला चांगले नाव प्राप्त करण्यासाठी मी काय केले आहे? माझ्या व्यक्तिगत वर्तणुकीबद्दल काय? मी कसा जगलो आहे?' तुम्ही वेळ, पैसा सर्व काही, तुमची नोकरी सर्व काही गोष्टींचा त्याग केला पाहिजे.

## चित्त

जोपर्यंत तुमच्या चित्ताची सूक्ष्मता तुम्ही वाढवत नाही तोपर्यंत काही

योग्य होणार नाही . जे सर्व काही स्थूलस्वरूपात आहे त्यापासून तुमचं चित्त मागे घेतलं तर ते वाढीस लागेल. चित्त जेव्हा जेव्हा एखाद्या विचारात अतिशय जातं तेव्हा तेव्हा ते पुन्हा मागे घ्या. याप्रमाणे जसे 'अरे जाऊ द्या, सोडून द्या,' परंतु चैतन्य लहरीकडे तुम्ही पूर्णपणे चित्त द्या. परम चैतन्य पाहत पाहत तुम्ही तुमचे लक्ष पूर्णपणे द्या. तुमचे स्वत:चे परम चैतन्य शोधतांना तुम्ही पूर्ण चित्त द्या. इतर सर्व गोष्टींबद्दल तुम्ही चिंता करण्याची गरज नाही. त्या सर्वांची काळजी घेतली जाईल.

तुमचे चित्त माझ्याकडेच असायला हवे. त्यासाठी तुमच्या आज्ञेवर खालील बंधने तुम्ही बनवावी. आपण किती भाग्यवान आहोत, की आपण आता आत्मसाक्षात्कारी झालेले आहोत. आपण सहजयोगी आहोत. परमेश्वराने मला निवडलेले आहे. जर आम्ही दुर्बल राहू तर कसे काम करू शकतो? आदिशक्तीने आम्हाला साऱ्या मानवजातीला मुक्त करण्याची शक्ती दिली आहे. आम्ही ते करू शकतो व आम्ही ते करणारच.

आज आपल्याकडे जी करुणा आहे ती मानवाचे रूपांतर सहजीमध्ये आणि त्यापासून पुढे चांगल्या लोकांमध्ये करण्यासाठी आहे, तेच आदिशक्तीचे प्रेम आहे. पण जे जन्माला आलेले आहेत त्यांना कोणत्याही परिस्थितीत एक दिवस मरायचे आहे. आपण निर्दय असता कामा नये. अर्थातच आपले चित्त किती लोकांना आत्मसाक्षात्कार देत आहोत याकडे हवे.

तुम्ही स्वत:ला योग्य रीतीने मार्गस्थ करा. योग्य रीतीने स्वच्छ करा आणि स्वत: समर्पित व्हा. समर्पित होण्यासाठी तुम्हाला काही करण्याची गरज नाही, पण तुमचा अहंकार आणि प्रतिअहंकार सोडून द्या. हा सर्व भार काढून टाका आणि थोडी मोकळीक निर्माण करा. तेव्हा तुमचे हृदय ते सर्व काही घटित करेल. सर्व राक्षसांना मारणे फार सोपे आहे, पण आपल्या हरवलेल्या आत्म्याचं काय? एका वर्षामध्ये सर्व काही घटित होईल किंवा दोन वर्षात, परंतु त्यानंतर मी त्यांची परीक्षा घेणार आहे. त्यासाठी तुम्ही तयार असलं पाहिजे. एकदा का मी त्यांची परीक्षा घेतली तर ते लोक पुन्हा तुमच्याकडेच येतील, म्हणून तुम्ही इतक्या उच्च प्रतीचे लोक असले पाहिजे.

त्यासाठी तुम्ही संपून जाता कामा नये. त्या सर्वांची परीक्षा घेणे माझ्यासाठी अत्यंत सोपे आहे. परंतु प्रथम ते अंतर्मनात जातात आणि पुन्हा तुमच्यावर हल्ला करतात मग ते अर्धांगवायु किंवा मधुमेह किंवा अशा काही तरी गोष्टी घेऊन जगतात. ते जगतील परंतु ते मृत पावणार नाही, पण ते फार जोखमीचं आहे. मी चोवीस तास काम करते. मला झोप नाही, विश्रांती नाही. हे सर्व तुम्हाला माहीत आहे. मला सर्व काही दृश्य दिसत आहे. अगदी स्पष्टपणे त्या सुंदर दिवसांचे दृश्य. ज्यावेळी आपण एकमेकांबरोबर आनंद आणि परमेश्वरी आनंद एकत्र घेत असू. तुम्ही पुष्कळ लोकांना जे दुष्ट शक्तीच्या पंजामध्ये अडकले आहे त्यांना बाहेर काढले पाहिजे आणि त्यासाठी आपण स्वत:ला समर्पित केले पाहिजे. आपले चित्त पुष्कळ अशा निरूपयोगी वस्तूंवर, भौतिक गोष्टींवर आहे. त्याला बिलकूल अंत नाही. जे काही अल्प आहे त्याबरोबर समाधानी रहा. तुमची भौतिक दृष्ट्यासुद्धा काळजी घेतली जाईल.

तुम्हाला पुष्कळ अशा समस्या असणार नाहीत. म्हणून तुम्ही सगळ्याच गोष्टींमागे पळत सुटू नका. त्यामध्ये तुम्ही आस्था दाखवू नका. त्या सर्व निरुपयोगी वस्तू आहेत. तुम्ही प्रेमळ आणि जिव्हाळ्याचे असले पाहिजे. जर तुम्ही सत्यच टाकून देण्यास सुरुवात केली, तर तुम्ही कठोर हृदयाचे लोक व्हाल. मला कशातही रस नाही, तर तुमच्यासारख्या पाषाणासाठी कुणाकडे वेळ आहे? तुम्ही तर पाया आहात. तुमची मुले तुमच्याबद्दल बोलतील, पण या भयानक लोकांबद्दल बोलणार नाही. तुम्ही प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आदर्श असले पाहिजे, दडपशाहीचे किंवा तशा मूर्खपणाचे आदर्श असता कामा नये. तुम्ही सर्वजण सर्वप्रथम सहजयोगी असले पाहिजे. तुम्ही असे लोक आहात, की जे जीवनाची पूर्ण संकल्पना बदलणार आहात. नवनवीन कल्पना आपल्याला बांधायच्या आहेत. तुम्हा लोकांना खरचं तुमच्या जबाबदारीची जाणीव आहे का?

## शांती

आपल्या उत्क्रांतीच्या पद्धतीचा सहस्त्रार खुले करणे हा सर्वात महत्त्वाचा भाग होता. सर्व इतर उत्क्रांतीच्या पद्धतीने मानवजातीला कोणत्या

पातळीवर आणले आहे? आपल्याकडे युद्ध झालीत, सर्वप्रकारचे अगदी मूर्खपणाचे जे कार्यक्रम होते, त्यामुळे पुष्कळसे देश आणि असंख्य लोक नाश पावले. आता जेव्हा तुम्ही सर्वत्र पसरलेल्या चैतन्य शक्तीशी एकरूप आहात, ती शक्ती पूर्णतः शुद्ध आहे. ती निर्मळ शक्ती आहे, ती तुम्हाला पूर्ण जाणीव देते आणि पूर्ण समजूतदार बनवते की तुम्ही कशाप्रकारे गतिमान व्हायचे आहे? तुम्ही कसे असायला हवे? तुमच्यात काय हवे आहे? हे सर्व म्हणजे आत्मसाक्षात्कार असं म्हटलं जातं, परंतु मी म्हणते आत्मसाक्षात्कार त्यापेक्षा फार पुढची शक्ती आहे. जरी तुमचा मेंदू या ज्ञानाने, सत्याने समृद्ध झाला तरीसुद्धा इतर पुष्कळ गोष्टी आहेत, ज्या तुम्ही प्राप्त केल्या पाहिजेत आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे, तुम्ही पूर्णपणे जाणिवेत असले पाहिजे. मी जेव्हा 'अवेअर' (जाणीव) हा शब्द वापरते तेव्हा तुम्ही 'वैश्विक परिवर्तनाच्या' योजनेमध्ये उभे आहात. तुमची स्थिती काय आहे? तुम्ही स्वतः कुठे उभे आहात? तुम्हाला कोणते काम करायचे आहे? तर यासाठी आता हे आवश्यक बंधन झालेले आहे. ते म्हणजे 'मला काही तरी काम केलेच पाहिजे.' जेव्हा ह्या बंधनास सुरुवात होते तेव्हा ते तुमच्यावर कार्यरत होत आहे. ते भीतीदायक नाही आणि ते त्रासदायकसुद्धा नाही, परंतु ते फार शांतिपूर्ण आणि आनंददायी आहे आणि ते बंधन म्हणते, 'मला बघायचं आहे, की इतरसुद्धा त्यांना स्वतःला जाणत आहेत.' त्या लोकांनी त्यांना जाणण्यासाठी सर्वांनी तुमची स्वतःची चक्रे जाणली पाहिजेत.

आता पुष्कळ लोक आहेत, ज्यांनी आत्मसाक्षात्कार घेतला आहे. मी ते पटकन जाणते, परंतु ते लोक अद्याप त्यांच्या चक्रांबरोबर स्थिर झालेले नाहीत. त्यांनी त्यांची चक्रे जाणून घेतली पाहिजे आणि तुमच्या चक्रांच्या समस्या का आहेत ते जाणून घेतले पाहिजे. त्यांना समस्या आहेत ते जाणून घेतील, परंतु त्याकडे लक्ष न देता किंवा त्याची विशेष काळजी न घेता ते पुढे निघून जातील. त्यांच्यासाठी ते केवळ 'जाता जाता' प्रकारचे असेल. तुम्ही म्हणू शकता या समस्या माझ्याकडे पण आहेत. काही हरकत नाही. परंतु मी सहजयोगावर मेहनत घेत आहे, तर तुम्ही घ्यायला काय हरकत आहे? ते

केवळ इतरांसाठी नाही, तर ते तुमच्यासाठीसुद्धा आहे. हे फार महत्त्वाचे आहे, की तुमची चक्रे सुधारली पाहिजे. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे आणि तरच तुम्हाला तुमच्या आत्म्याची ओळख होईल. याचा अर्थ तुम्हाला कळून येईल, की तुमच्यात काय दोष आहे? मी काय चुकीचे करीत आहे? आणि मी काय करीत आहे? जेव्हा तुम्ही हे सुधाराल तेव्हा तुमची चक्रे सुधारतील तेव्हा तुमची जाणीव ही पूर्णपणे सर्व बाबतीत प्रकाशित होईल आणि ही फार प्रचंड गोष्ट आहे. ही अतिशय महान गोष्ट आहे. जर तुम्हाला हे मूर्ख जग सूज्ञ बनवायचे असेल तर आणि जर तुम्हाला सर्वांना आत्मसाक्षात्कार द्यायचा असेल तर कल्पना करा हे कार्य किती मोठे आणि प्रचंड आहे. ते करण्यासाठी किती लोकांची गरज आहे, परंतु जर तुमची इच्छाशक्ती त्याबद्दल बलवान असेल तर ते तुम्हाला जाणीवपूर्वक करावेसे वाटेल. परंतु सर्वसाधारणपणे ते आपल्याला करणे भाग पडते कारण आपल्याला आपले घर चालवायचे असते. आपल्याला हे आणि अशी अनेक कामे करायची असतात. ते आपण करू शकतो, पण तुमच्या जीवनाचे मुख्य ध्येय हे आहे, की सर्व लोकांना बदलणे आणि ते घटित करणे हे आहे. स्वरूपरूपांतर केवळ जागतिक शांतीसाठी.

मला हे माहीत नाही की असं भविष्यात सांगितले आहे की नाही, की पूर्ण बदल हा घटित होईल की नाही, पण या बदलाबदल सांगितलं गेलं आहे. त्या भागाबद्दल मला काही माहीत नाही आणि मी त्याबद्दल तसदीही घेत नाही, आणि पर्वाही करीत नाही, की किती लोक हा बदल स्वीकारणार आहेत? परंतु त्या बदलानंतर तुम्ही त्यात प्रस्थापित झाले पाहिजे. सर्वप्रथम तुम्ही हे पाहिले पाहिजे, की तुम्ही किती शांत व्यक्ती आहात? तुमच्या हृदयात शांती हवी. जर तुमच्या हृदयात शांती नसेल तर तुम्ही सहजयोगी नाही. जर तुम्ही रागवत असाल, लोकांवर ओरडत असाल तर तुम्ही सहजयोगी नाही. याचा अर्थ तुमचा स्वभाव पराकोटीचा शांत हवा. ते फार महत्त्वाचे आहे आणि त्याच शांतीबरोबर शुद्ध करुणा हवी. जे काही असं तुम्ही करता ते तुमच्या फायद्याचे नसेल, परंतु दुसऱ्यांना बदलण्यासाठी,

दुसऱ्यांसाठी चांगल्या गोष्टी करण्यासाठी तुम्हाला या शक्तीने भाग पाडले आहे. ही सर्वात चांगली गोष्ट आहे जी तुम्ही दुसऱ्यांसाठी करू शकता. त्यांचे मेंदू ताळ्यावर आणू शकता. त्यांना रोगांपासून मुक्ती मिळेल. त्यांच्या समस्या दूर होतील आणि प्रथम फार महत्त्वाची गोष्ट जी घटित होते ती म्हणजे त्यांना दुसऱ्यांना बदलण्याची शक्ती प्राप्त होते. जर तुम्हाला इतरांना बदलण्याची शक्ती प्राप्त झाली आहे, तर ती वाया घालवू नका. ती फक्त तुमच्यासाठीच वापरू नका. याचा अर्थ अजून उन्नती पूर्ण झालेली नाही. तुम्ही याबद्दल बोललं पाहिजे. त्याबद्दल लोकांना सांगितलं पाहिजे. घटित केले पाहिजे. जे काही शक्य आहे ते कार्यान्वित केले पाहिजे. हा असा मार्ग आहे ज्या मार्गाने आपण जागतिक पातळीवर लोकांपर्यंत जाऊ शकतो आणि पूर्ण परिवर्तन घडवू शकतो.

आपल्या ज्या काही समस्या आहेत, भारतात असो, की इतर, त्या मानवामुळे आहेत कारण ते अजून प्रकाशित झालेले नाहीत. हे पाहा, जर तुम्ही प्रकाशित झालात तर तुम्हाला भांडण करण्यासाठी किंवा संघर्ष करण्यासाठी किंवा असं काही करण्यासाठी समस्या नसेल. तुम्ही प्रकाशित झालात तर तुम्ही इतरांचा विचार करू लागाल व इतरांना तुमचे स्वतःचे आहेत असे समजून तुम्ही दुसऱ्यासाठी तसदी घ्याल. यापुढे तुम्ही स्वतःचा विचार करणार नाही. जेव्हा तुम्ही प्रकाशित होता तेव्हा कोणत्याही हिंसेचा विचार राहत नाही. अलीकडे धर्माच्या किंवा व्यक्तीच्या नावावर हिंसा घडून येतात. जर तुम्ही सहजयोगी झालात तर हिंसाचारासारखी चूक सहज दुरुस्त होईल. आता विचार करा, जर सर्व लोक सहजयोगी झाले तर ते लोक कसे भांडतील? आणि कशासाठी? सर्व धर्मांच्यावर सहजयोगाचा धर्म आहे. जिथे तुम्ही एक बनता, तर धर्माधर्मातले संघर्ष नष्ट होतात.

सहजयोगी म्हणून सर्व आपले कार्य मला कधीच समजले नाही, की इतके महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी इतका वेळ द्यावा लागतो. मूर्खपणाच्या क्षुल्लक गोष्टीबद्दल त्रास करून घ्यायचा नाही, पण जे आपल्या आतमध्ये आणि बाहेर गंभीर स्वरूपाचे आहे ते आपण आता स्वीकारले पाहिजे. मी

तुम्हाला विचारते, 'तुम्ही किती लोकांचा द्वेष करता?' तुम्ही कदाचित म्हणाल वीस लोक आणि (दीर्घ स्तब्धता) हे बघा हे सर्व वातावरण माझ्या मते एवढा पश्चात्ताप निर्माण करते, की मला कळत नाही, की आपण अशा सहजयोग्यांचे काय करायचे? त्यांच्या योजना काय आहेत? कृपया तुम्ही तुमच्या आतमध्ये डोकावून पाहाल का? आणि विचार करा की आपण सर्व किती विधायक कार्य करीत आहोत? आणि कोणते विध्वंसक कार्य करीत आहोत? हे सर्व समजण्यासाठी एक मोठा धक्का देण्याची गरज नाही.

मला आपण जे कार्यक्रम आणि पूजा वगैरे करतो ती पद्धत मला आवडते. जर तुम्ही माझ्या अंतर्मनाला विचारलत तर मला माहीत आहे ते फार फार दु:ख देणारं आणि उबग आणणारं आहे. यावेळी तुम्ही सहजयोगी म्हणून असं केलं पाहिजे....(थोडी स्तब्धता) अगदी अल्प स्थितीतले सहजयोगी म्हणून तुम्ही पूर्ण चित्त घातलं पाहिजे आणि तुम्ही प्रत्येकाला सांगितलं पाहिजे (अल्प स्तब्धता) हे पहा. सहजयोगाबद्दलचा त्रास हा आहे, की तुम्ही सर्व आनंदामध्ये असता आणि आजूबाजूला बघत नाही.

आज तुम्हाला मी सांगितलच पाहिजे. याक्षणी मी कल्पित गोष्टींमधील युद्धा मधे आहे. (थोडी स्तब्धता) हे एक क्षेत्र आहे. मला समजत नाही काय म्हणावे ते! आपल्यामध्ये काही प्रकारची दुर्बलता अजून रेंगाळत आहे आणि त्या दुर्बलतेच्या विरोधात आपण संघर्ष करण्याचा प्रयत्न करत नाही. (अल्प स्तब्धता) म्हणून मी आता तुम्हा सर्वांना विनंती करते, तुम्ही ध्यान करा आणि बघा तुमच्यामध्ये काय कमी आहे ते! (अल्प स्तब्धता) हा मोठा धक्का आहे आणि हा धक्का कमी करण्यासाठी सहजयोगी काय करणार आहेत? या मानवी जीवनाच्या भयंकर पद्धती नष्ट करण्यासाठी ते काय करणार आहेत? ते फक्त प्रेमशक्तीनेच शक्य आहे. तुम्ही त्याची व्यवस्था करू शकता. परंतु आपली शक्ती आपल्या हृदयात वाढवली पाहिजे. याचा विचार करा. आपल्यासाठी हा फार मोठा धडा आहे. हे पाहिले पाहिजे आपण खरोखर ठीक आहोत का? किंवा अजून आपण इतरांचा द्वेष करतो. आपल्या मनाचे काय कार्य चालू आहे? ते प्रेम करतंय की द्वेष करतंय? जर

हे प्रेम तुम्हाला प्रकाशित करीत असेल तर तुम्ही माझ्यासाठी एक महान शक्ती असाल. मी एकटी या सगळ्याविरूद्ध लढू शकत नाही. तुम्ही असे लोक असले पाहिजे ज्यांनी ज्यांचे प्रेम वृद्धिंगत केले आहे आणि इतर काही नको. तर आपल्या सर्वांना अनेक आव्हानांपैकी एक आव्हान आहे. हा संघर्ष विश्वास ठेवणारे आणि विश्वास न ठेवणारे यामधील आहे, म्हणजे सहजयोगी आणि असहजयोगी यातला संघर्ष नव्हे. हा एक असा संघर्ष आहे, जिथे आपण सर्व एक आहोत आणि आपण त्यासाठी संघर्ष करणार आहोत. त्यासाठी प्रत्येक स्थितीवर आपण अधिकाधिक सूक्ष्म असले पाहिजे. हे बघणे फार गरजेचे आहे की त्या दुष्ट शक्तीचे, जे सर्व घटित करीत आहे त्याचे आपण भाग आहोत का? जर आपण त्यापासून मुक्त आहोत तर आपण संघर्षासाठी तयार आहोत का? ही फार मोठी लढाई आहे आणि मला आशा वाटते ते सर्व निर्णायक आहे. यापुढे मानवजातीमध्ये फार मोठी क्रूरता असणार नाही, फार मोठा संघर्ष असणार नाही कारण ही लढाई राक्षस आणि आपल्यात आहे. ती फार साधी समजू नका आणि तिचं स्पष्टीकरणं जे कोणी दुष्ट शक्तींना पाठिंबा देतात त्यांच्याशी केलं पाहिजे. फक्त एकच गोष्ट तुम्ही म्हणून शकता की, 'आम्ही कसे जाणायचे की कोण विरोधात आहे आणि कोण विरोधात नाही.' हे तुम्हाला समजण्यासारखे आहे. तुम्ही सहजयोगी आहात. चुकीच्या बाजूला कोण आहे? हे तुम्हाला माहिती आहे आणि मी जाणते सहजयोगी वाचवू शकतील आणि त्यांना योग्य त्या ज्ञानाच्या आणि प्रेमाच्या मार्गावर आणू शकतील पण सध्या दुष्ट शक्तीचा जो प्रचार चालला आहे त्याबद्दल फार सावध राहा. तुमच्या हृदयातल्या अत्यंत खोलवरच्या भागाकडे मला स्पर्श करायचा आहे. जे शुद्ध झाले पाहिजे. (अल्प स्तब्धता) मला खात्री आहे संकटाची किती मोठे आहे, हे तुम्ही सर्वजण समजून घ्या, जे संकट वाट बघत आहे. त्यावेळी कोणताही एक मानव तिथे उरणार नाही किंवा एखादे लहान मूल सुद्धा तिथे राहणार नाही कारण अशा प्रकारची गोष्ट घटित झाली तर ते फार कठिण आहे. ते अत्यंत कठिण आहे. (दीर्घ स्तब्धता) माझ्या पूर्ण अस्तित्वालाच धक्का बसत आहे. ते अत्यंत कठिण आहे. (दीर्घ स्तब्धता) माझ्या पूर्ण अस्तित्वालाच धक्का बसत आहे

आणि ते गदागदा हलत आहे. तुम्ही जीवनाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पाहिले पाहिजे. हे संभाषण कुठे चाललं आहे? क्रूरतेबद्दल लोक कोठे बोलत आहेत? काय घडते आहे? (दीर्घ स्तब्धता) जे काही मला वाटते (अल्प स्तब्धता) एकासाठी नाही, हे दोघांसाठी नाही ते आपल्या सर्वांचे आहे. जो संघर्ष माझ्याकडे आहे तो फार गंभीर स्वरूपाचा आहे. शंकाच नाही, पण जर तुम्ही सर्वजण सामुदायिकरीत्या त्याच्या विरोधात संघर्ष केलात तर किती तरी प्रमाणात आपण ते घटित करू शकू. (दीर्घ स्तब्धता) माझे सर्व प्रयत्न, समजुतदारपणा, शक्ती, सर्व काही आता तुमच्या हातात आहे आणि म्हणून तुम्ही सर्वांनी त्यासाठी तयारीत असले पाहिजे. फक्त केवळ काहीतरी वाचून, कशाबद्दल तरी बोलून असे न करता तुमच्यामध्ये प्रेमाची शक्ती बांधली पाहिजे. मला खात्री आहे की मी सहस्रार उघडल्यावर तुम्हीसुद्धा ते कराल. पण तुम्ही प्रेमशक्तीने काहीतरी वाचण्याचा, समजण्याचा प्रयत्न करा. हा फार गहन विषय आहे. जेव्हा तुम्ही त्याबद्दल बोलता तेव्हा मी अर्धी आतमध्ये असते आणि अर्धी बाहेर असते, पण मला हे सांगायचे आहे, की तुम्ही हे सर्व वाढवा आणि ही प्रेमाची शक्ती या सर्व दुष्ट कार्य करणाऱ्या विरोधात अगदी सबल असेल (अल्प स्तब्धता). माझे संपूर्ण आशीर्वाद तुमच्याबरोबर आहेत. तसेच मला असे वाटते की, तुम्ही ते वैयक्तिकरीत्या कार्यान्वित करा. तुम्ही किती लोकांवर प्रेम करता याविषयी शोध घ्या. मला आशा आहे, की तुम्ही काय करावे असे जे मला वाटते, ते तुम्ही कराल. (अल्प स्तब्धता) एक नवी पिढी वर येत आहे (दीर्घ स्तब्धता) तुम्ही सर्वजण अगदी सर्वजण माझ्या हृदयात आहात आणि मी तुमच्यावर प्रेम करते आणि मला असे वाटते, तुम्ही सर्व लोकांनी माझ्याबरोबर सैनिक म्हणून संघर्ष करण्यासाठी यावे आणि मला असेही सांगण्यात आले, की असे काही लोक आहेत जे आपापसात गट निर्माण करतात. अत्यंत नकारात्मक प्रवृत्ती! या क्षणी आपल्याला गरज आहे ती पूर्ण दृढ ऐक्याची. म्हणून असे सर्व लोक जर तुम्हाला आढळले तर त्यांना सांगा स्वतःहून चांगले वागा. त्यांना सहजयोगी बनवण्यात काहीच अर्थ नाही. मला खात्री आहे. माझी अत्यंत प्रामाणिक इच्छा आहे, की तुम्ही खरोखरचे प्रेम आणि

शांतीचे सैनिक बनणे. कारण हेच कारण आहे, की तुम्ही इथे आलात आणि त्यासाठीच तुमचा जन्म आहे, त्याचा आनंद घ्या.

## धर्म

तुम्ही जे काही सुंदर आहे त्याचा आदर करता, जे काही चांगले आहे त्याचा आदर करता, परंतु कशाचेही तुमच्यावर वर्चस्व असता कामा नये. कोणत्याही पकडीमध्ये असता कामा नये. जर मला हवे असेल तर मी सोनसाखळी घालू शकते किंवा काहीही नाही. त्याचा मला त्रास नाही. मी त्याची काळजी करीत नाही. आणि ती आपली मनोवृत्ती असली पाहिजे. जर माझ्याकडे असेल तर मी ते करेन. माझ्यावर कोणीही वर्चस्व गाजवू शकत नाही. कोणी मला दर्जा देऊ शकत नाही. मी माझ्या स्वतःच्या दर्जावर आहे आणि मी माझ्या स्वतःच्या स्थितीमध्ये आहे आणि मी माझ्या स्वतःच्या अधिकारात आहे कारण मी ती शुद्ध चेतनाशक्ती आहे. मला कोणीही बिघडवू शकणार नाही. मला कोणीही वाकवू शकणार नाही. मी कोणावरही वर्चस्व गाजवणार नाही किंवा माझ्यावर कोणी वर्चस्व गाजवणार नाही. अशाप्रकारे आपण महान गुरु होणार आहोत. साऱ्या विश्वाला बदलायला एक गुरु पुरेसा आहे. आता ६२० गुरु आहेत, तर परमेश्वर जगाचे रक्षण करो.

तुम्हाला सर्वांना तुमचा आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. तुमच्याकडे जे आवश्यक आहे ते सर्व ज्ञान दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देण्यासाठी आहे. तुम्ही कोण आहात ते तुम्ही जाणलेच पाहिजे. ते फार महत्त्वाचे आहे. जर तुम्ही तसा प्रयत्न केला नाही, ते तुमच्या हातात ठेवले नाही, जर दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार दिला नसेल तर तुमच्यावर तुमचा विश्वास नाही आणि तुमच्यात आत्मविश्वास नाही. याचा दुसरा भाग म्हणजे तुम्ही दुसऱ्या व्यक्तींना परम चैतन्य देण्याचा प्रयत्न केलात, परंतु त्या व्यक्तीमध्ये अडकून बसू नका. मी असे काही लोक पाहिलेत ते फार अडकून बसतात. जर कोणत्याही व्यक्तीला आत्मसाक्षात्कार दिला तर त्यांना वाटते त्यांनी फार मोठे कार्य केले आहे आणि ते दुसऱ्यांवर, त्यांच्या नातेवाईकांवर प्रयत्न करू लागतात. अद्यापपर्यंत तुम्हाला हे समजले असेल, की एखादी व्यक्ती

संबंधित असेल, एखाद्या व्यक्तीशी तो जवळचा असेल पण निश्चितपणे आत्मसाक्षात्कार मिळण्याची संधी त्याला मिळेलच असे नाही. जर तुम्हाला वर्धित व्हायचे असेल तर एकच मार्ग आहे, तो म्हणजे सामुदायिकतेत असणे. दुसरा कोणताही मार्ग नाही.

जर तुम्हाला तुमच्या मुलांना वाचवायचे असेल, तर तुम्हाला तुमचा आदर्श गुरु व्हावे लागेल. जर तुम्हाला सहजयोगाबद्दल बोलायचं असेल आणि तुम्ही सहजयोगी आहात अशी धारणा तुम्हाला करायची असेल आणि या सर्व शक्ती तुमच्यात जागृत न करता तुम्ही सहजयोगाचा प्रचार-प्रसार करीत असाल तर ते मोठे अपयश असू शकते. तर या सर्व शक्ती तुमच्यामध्ये कशा वाढवायच्या? ते आपण पाहू.

या गुरुपूजेच्या दिवशी मला हे सांगायचे आहे की प्रत्येकाने फार परिश्रमपूर्वक कार्य केले पाहिजे. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, की तुम्ही तुमचे जीवन, तुमचा वेळ सहजयोगाला किती समर्पित केला आहे? तेंव्हा तुम्हाला गुरूची स्थिती प्राप्त करता येईल. माझ्याकडे बघा, मी केवळ गृहिणी आहे. माझ्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि समस्या मला आहेत, तरीसुद्धा सदासर्वकाळ मी सहजयोग्यांचा, सहजयोगाचा आणि सर्व मानवजातीच्या मुक्तीचा विचार करते. मी इथलं-तिथलं बघत नाही. मी विश्वाचा विचार करते, म्हणून तुमचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला पाहिजे. तो फक्त तुमची शाळा, प्रशाला आणि विद्यापीठ यापुरता नको. तो विचार प्रत्येकाजवळ असावा. प्रत्येक परिस्थिती, समस्या जी तुमच्याकडे आहे, त्या माध्यमातून ते तुम्हाला वाढवायचे आहे. एकदा का तुम्ही तशा प्रकारचं व्यक्तिमत्व वाढवलं की तुम्हाला आश्चर्य वाटेल की तुम्ही कित्येक लोकांना कशी मदत केली आहे. ते मला माहीत आहे. इतके सहजयोगी आहेत जे स्तुतीपात्र आहेत आणि खरोखरंच मी त्यांच्यावर फार प्रेम करते आणि ते सुद्धा माझ्यावर प्रेम करतात. नेहमीच हे पाहिले पाहिजे, की आता तुम्ही गुरुपदावर जाणार आहात. तुम्हाला तुम्ही गुरु आहात असा विचार करतांना फार काळजी घेतली पाहिजे. तुम्ही प्रथमपासूनच गुरु आहात असा

विचार केला, की अहंकार वर येतो. म्हणून तुम्ही निश्चित करा, 'मी कोणीही नाही. माझ्या माताजींच्या हृदयातील अल्पशी लहर आहे.' एकदा तुम्ही अशी नम्र भावना मिळवलीत तर तुमच्या सर्व काही समस्या सुटतील आणि सर्व काही घटित होईल. तुमचे चित्त आणि वर्तणूक इतरांवर प्रभाव पाडणार आहे आणि दुसरं काही नाही. तुम्ही काही प्रयत्न करा फक्त तुम्हालाच यापुढे सहजयोग मिळणार आहे.

मी असे लोक पाहिले आहेत जे इतके धर्मांध (कट्टर) आहेत, की ते जे लोक सहजयोगी आहेत त्यांनासुद्धा भेटत नाहीत. जे लोक सहजयोगी नाहीत त्यांच्याशीपण ते बोलत नाही आणि कधीही ते लोक जे सहजयोग करीत नाहीत त्यांना भेटण्यासाठी घाबरतात. अर्थात जे लोक दुष्ट आहेत, सहजयोगाच्या विरोधात आहेत व बोलतात त्यांना तुम्ही भेटण्याची गरज नाही, पण जे लोक सत्याच्या शोधात आहेत त्यांच्याकडे आपण गेलेच पाहिजे. ते आपले कर्तव्य आहे. पुष्कळसे लोक त्या स्थितीपर्यंत पोहचलेत. तो त्यांच्या मेंदूमध्ये प्रस्थापित झाला. अशावेळी आपण धर्माच्या पलीकडे जातो, धर्मातीत होतो म्हणजे आपण धर्माच्या पलीकडील बनतो याचा अर्थ धर्म आपल्या अस्तित्वाचा सारसर्वस्व बनतो. आपण तो आता सोडू शकत नाही. सहजयोग आपल्या आतमधील सारसर्वस्व बनते. ती फार मोठी सिद्धी आहे कारण त्यानंतर तुम्हाला कोणतेही कर्मकांड करण्याची गरज नाही. तुम्हाला इतर लोकांना भेटण्याबद्दल चिंता करण्याची गरज नाही. तुम्हाला तुमच्या चैतन्य लहरींची हानी होईल याची चिंता करण्याचे कारण नाही. तुम्हाला कोणतीही बाधा कोणाकडूनही पकडत नाही. इतर दुष्ट शक्तीसुद्धा तुम्हाला पकडत नाहीत. कोणीही तुमचे नुकसान करू शकत नाही. त्याला मी तुमच्या श्रद्धेचं पूर्णत्व म्हणते. अशावेळी सहस्रार पूर्णपणे प्रकाशित झालेले असते, की त्यावेळी तुम्ही स्वत: धर्म बनता. ते तत्त्व सहस्रारामध्ये प्रस्थापित झाल्यावर तुमच्यामध्ये असे घटित होते, की तुम्ही सत्यावर उभे राहता.

इतक्या पुष्कळ संत मंडळींबरोबर असल्यावर मला सहजयोग पसरवण्याची चिंता का असावी? असे काही लोक आहेत जे तुम्हाला खाली

खेचतात. असे काही पाषाणासारखे कठोर लोक आहेत आणि असेही काही लोक आहेत जे अद्याप बाधित आहेत आणि असे काही लोक आहेत जे पुटपुटणारे आत्मे आहेत. त्यांच्याकडे तुम्ही अजिबात लक्ष देऊ नका. ते आपोआप निघून जातील. काही हरकत नाही. आपल्याला असा एक महान दिवस निर्माण करायचा आहे, ज्याचा आपल्याला स्वाभिमान असेल की आम्ही सत्याच्या महान धर्माचे लोक आहोत. अद्यापपर्यंत असा कोणताही धर्म नाही, जो सत्याचा धर्म म्हणून आहे. इतर आचरण वेगळं करतात आणि वेगळं शिकवतात आणि त्यांचा अवताराशी काही संबंध नसतो. तुम्हाला आता विशेष काही करायचे आहे, की ज्यामुळे लोक म्हणतील, 'आम्ही आमच्या माताजी या व्यक्तीत पहात आहोत.' फक्त तुमच्या मनात विचार करा, 'आजपर्यंत मी काय त्याग केला आहे?' केवळ त्याग पुरेसा नाही, तर आपण काही गोष्टींचा त्याग केला आहे का? मग तुम्हाला आता समजेल, की तुमच्या माताजींनी तुम्हाला दुसरा जन्म कोणत्याही अडचणीशिवाय दिलेला आहे. सर्व काही प्रसूतीच्या वेदना त्यांनी स्वत:वर घेतल्या आहेत. आता तुम्ही मोठे झालेले आहात. तुम्हाला समजलंच पाहिजे. आता तुम्ही वाढ झालेले लोक आहात आणि तुम्ही लहान मुलांसारखे वागता कामा नये. तो काळ संपला आहे. आता तुम्ही मोठे झालेले आहात म्हणून तुम्ही या महायोगासाठी जबाबदार झाले पाहिजे आणि हा महान धर्म जो आपण स्थापन केला आहे असा धर्म की ज्यात सर्व धर्म येतात. असा एक धर्म, की त्याच्याजवळ येताच तो प्रत्येकाला शुद्ध करतो. तो सर्व नद्यांचा महासागर आहे. या विश्वधर्माच्या महान महासागरात सर्व नद्या येऊन मिळतात. म्हणून आपण या नवीन पद्धतीत बसण्यासाठी स्वत:ला तसा आकार दिला पाहिजे. एक नवीन तालबद्धता, परमेश्वराच्या बासरीतून निघालेले संगीत जोपर्यंत असे घडत नाही, तोपर्यंत मला असे वाटत नाही. पाश्चिमात्य लोकांना फार मोठी संधी आहे.

# प्रकरण सहा

# प्रचार-प्रसाराची अंत:स्थिती

‘‘मी एक सहजयोगी आहे.’’

## अंतर-परीक्षण

मी काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, की तुमच्यावर तुमची पूर्ण श्रद्धा हवी, ते फार महत्त्वाचे आहे. 'मी सहजयोगी आहे.' ही श्रद्धा असू द्या. मी अद्याप काय केलेले आहे? एवढे तुम्ही तुम्हाला विचारा. मला काय करायचे आहे? म्हणजे सर्व तुमची वर्तणूक, तुमचं माधुर्य, तुमची दयावृत्ती हे सर्व काही प्रभाव पाडेल. फक्त एवढेच नव्हे तर सर्व दुष्ट शक्ती तुमच्यावर काही करू शकणार नाही. तुमच्यावर त्यांचा काही परिणाम होणार नाही. तुम्हाला पूर्ण संरक्षण मिळेल. तुम्हाला पूर्ण आश्रय मिळेल आणि तुमची काळजी घेतली जाईल. म्हणून मला अगदी पूर्णपणे प्रामाणिक विनंती तुमची आई म्हणून करायची आहे, की तुम्ही सर्वांनी माझी मुले म्हणून त्यास पात्र असले पाहिजे. हे पहा मी आता ७८ वर्षांची होणार आहे. तरी अद्याप मी फार कठोर परिश्रम करीत आहे. लॉस एंजलिस येथे आल्यापासून मी थोडी त्रस्त आहे, तर काय कारण आहे? मी कधीही त्रस्त नसते. मला थोडासा थकवा वाटतो. मला चालावेसे वाटत नाही. का बरे? काय घडले असेल? कारण तुम्ही लोक दुर्बल आहात आणि तुम्ही माझी मुलं आहात आणि माझ्या शरीराचे तुम्ही आंशीक भाग आहात. केवळ तेच फक्त नाही तर तुम्ही माझ्या शरीराच्या पेशी आहात. जर तुम्ही दुर्बल असाल तर मीसुद्धा थकून जाते.

मी पुन्हा पुन्हा तुम्हाला विनंती करते, की तुम्हाला एवढे महान आशीर्वाद मिळालेत जे सर्वसाधारण लोकांना मिळत नाही. काही लोक पुष्कळ वर्ष हिमालयात घालवतात. तेव्हा त्यांना आशीर्वाद मिळतात. परंतु तुम्हाला ते आता सहजपणे मिळाले आहे, म्हणून तुम्ही तुमची ताकद वाढवा आणि स्वत:ला सांगा आणि आत्मविश्वास ठेवा की, 'हे सर्व कार्य मला करायचे आहे.'

आता तुम्ही म्हणाल, आम्ही काय करायचे? रोजच्या रोज तुम्ही स्वत:ला सामोरे जा. वास्तवात किती वेळ तुम्ही भौतिक चिंतेमध्ये खर्च केलात आणि तुमच्या आत्मोन्नतीसाठी किती वेळा खर्च केलात? तुम्ही सर्व

काही चिंता त्या परमेश्वरावर सोडल्यात का? तुम्ही पूर्णपणे तुमच्या पूर्वस्थितीच्या बाहेर उडी घेतली का? जे अर्थहीन आहे, मूर्खपणाचे आहे ते सर्व काही सोडून अगदी पूर्णत: सोडून तुम्ही बाहेर आलात का? तर मी इतरांशी कसा संबंध जोडू? इतरांशी मी कसे बोलू? तर सहजयोगी कोण आहे?

आपण आपल्या जाणिवेमध्ये हे जाणून घेतले पाहिजे, की आपण आता चेतनेत असले पाहिजे. तर एकमेकांशी आपलं नातं जोडण्यासाठी ती चेतना कितपत मिळवली आहे? ती आपल्या विराटाची, मेंदूची म्हणजे सहस्राराची सामूहिक चेतना आहे. म्हणजे तत्त्वत: सहस्रार हे विष्णुतत्त्व आहे, परंतु त्याची देवता 'श्री माताजी निर्मला देवी' आहेत. तर आता तुम्ही हे पाहू शकता. किती सुंदर ऐक्य घटित झाले आहे.

विष्णूची सर्व शक्ती त्या देवतेप्रमाणे कार्य करणार आहे. अगदी त्या देवतेच्या चरणकमलांवर समर्पित होऊन, म्हणजे श्री विष्णूंची चेतन शक्ती ही पूर्णपणे त्या देवतेच्या हातात आहे. मला या प्रचंड देवतेबद्दल काही बोलायचे नाही. ते फार विशाल आहे कारण तुम्हाला त्याचा दरारा वाटेल म्हणून जे काही घटित होत आहे ते घटित होऊ द्या. असं सांगितलं जातं, की तुमचं सहस्रार या देवतेपुढे समर्पित करा आणि जर ते तसं असेल तर ते फार सोपे आहे कारण तुमच्याकडे ती देवता आहे. तुम्हाला तुमचे स्वत:चे सहस्रार आहे आणि हे फक्त तुमच्यासाठी आहे, की जे लोक या आधुनिक काळात सहजयोगी झालेले आहे आणि त्यांनी ती देवता पाहिली.

असं म्हटलं जातं की तुम्ही तीन गोष्टी मागायच्या आहेत, 'सालोक्य, सामीप्य, सान्निध्य-याचा अर्थ परमेश्वराला पाहणे म्हणजे सालोक्य, सामीप्य म्हणजे परमेश्वराच्या जवळ जाणे, सानिध्य म्हणजे परमेश्वराशी मैत्री.' परंतु तुम्हाला आता तादात्म्य म्हणजे परमेश्वराशी एकरूप होणे, ही स्थिती मिळालेली आहे. ही स्थिती कोणत्याही योग्याच्या कल्पनेतसुद्धा येणार नाही आणि संत किंवा द्रष्टे जे पूर्वी होऊन गेले त्यांच्या विचारामध्ये

पण नाही. हे तादात्म्य तुमच्याजवळ असते. जेव्हा तुम्ही माझ्या शरीराबाहेर असता आणि हे तादात्म्य त्यांच्याजवळ असते. जेव्हा ते माझ्या शरीरात असतात, तेव्हा ते कोणीच नसतात. म्हणून तुम्ही काळाची मर्यादा ओळखून घ्या. तुम्ही तुमचा मोठेपणा समजून घेतलाच पाहिजे आणि तुम्हाला हे समजलेच पाहिजे, की तुम्हा लोकांना या निर्मितीचे मोठे कार्य करण्यासाठी निवडले आहे. म्हणून आता आळशीपणाची वेळ नाही. आता तुम्हाला उठले पाहिजे आणि जागृत झाले पाहिजे. आज असा दिवस आहे, मी आशा करते तुम्ही निर्विकल्प स्थितीत उडी घ्याल. परंतु तुमच्या प्रयत्नांनी तुम्हाला इथे राहायचे आहे. नाही तर तुम्ही पुन्हा घसरून पडाल. म्हणूनच या माझ्या प्रवचनाचे पुन्हा पुन्हा अवलोकन करा आणि त्याचा विचार करू नका आणि असा विचार करू नका, की ते दुसऱ्यांसाठी आहे. हे तुमच्यासाठीसुद्धा आहे आणि सर्वांसाठी आहे. प्रत्येकासाठी आहे. तुम्ही स्वत:ला जाणून घेतलेच पाहिजे की रोज तुम्ही किती प्रगती केली आहे.

आता मी तुम्हाला सांगते आहे, की सहजयोगाला कसे जाणले पाहिजे. तुम्ही अत्यंत समाधानी असले पाहिजे. प्रथम आणि सर्वप्रथम तुम्ही समाधानी बनले पाहिजे. तुम्ही तुमच्यामध्ये फक्त बघा, की तुम्ही समाधानी आहात की नाही? सर्वात उच्चतम जे तुम्हाला पाहिजे ते मिळालेले आहे, म्हणजे तुम्हाला शांती, आनंद, परमेश्वराचे आशीर्वाद मिळालेले आहेत असे असूनसुद्धा तुम्ही असमाधानी असाल आणि तुम्हाला असे काही करावेसे वाटते, की जे त्रास देणारे आहे. नेहमीच काही लोकांना माझ्यापुढे छाप पाडाविशी वाटते आणि पुढे पुढे यावेसे वाटते किंवा सहजयोग टाळावासा वाटतो.

प्रथम म्हणजे तुम्ही सहजयोगाचा प्रचार-प्रसार केलाच पाहिजे. तुम्ही किती लोकांना सहजयोगामध्ये आणले आहे? फक्त तुम्ही याचा विचार करा. तुम्ही सहजयोगी आहात. तुम्ही संत आहात. या जगामध्ये जे सर्व संत ज्यांना संतपद प्राप्त झाले ते फार मोठ्या अडचणीतून आणि पुष्कळसा छळ

करणाऱ्या परिस्थितीतून मिळाले, पण त्यांनी पुष्कळसे महान कार्य केले. फक्त कोणताही एक संत घ्या. ज्याच्याकडे पुष्कळसे लोक आकर्षित झाले. अर्थात ते संत कोणालाही आत्मसाक्षात्कार देऊ शकले नाहीत. ते कसे करावे हे मी तुम्हाला शिकविले आहे. तरीसुद्धा तुम्ही सहजयोगाबद्दल काय करत आहात ते शोधून काढा. फक्त ध्यान हाच एकमेव मुद्दा नाही तर ते ध्यान कशासाठी? इतरांना मदत करण्यासाठी, तुम्ही सबळ व्हावे म्हणून. त्या ध्यानाची या कलियुगात आपल्याला पुष्कळच गरज आहे. म्हणून इतरांना मदत करण्यासाठी आपण लोकांनी बाहेर गेलं पाहिजे.

जर तुम्ही लोकांना आत्मसाक्षात्कार दिला तर ते सर्व काही टाळता येईल. अर्थात मी म्हणेन की ही आदिशक्तीची एक लहर आहे. आदिशक्तींनी हे जग निर्माण करण्याच्या कार्याचा प्रारंभ केला आणि तुम्हाला निर्माण केले. तुम्हाला सहजयोगी केले आणि तुमची जबाबदारी फार महत्त्वाची आहे.

तुम्ही कदाचित जबाबदार असाल किंवा कदाचित नसाल पण मला वाटते ही माझी जबाबदारी आहे, परंतु त्यात फरक आहे. मला कधीही वाटले नाही, की ती माझी जबाबदारी आहे. मला कधीच वाटले नाही, की ते माझे कार्य आहे. मला कधीही जाणवले नाही. ते मला करायचे आहे. मी जे केले ते एक कार्य आहे. अशाप्रकारचे व्यक्तिमत्त्व तुमच्याजवळ असायला हवे. ते तुम्ही अत्यंत नम्र पद्धतीने करायचे. अगदी सुंदर पद्धतीने ते करायचे आहे आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, की तुमचे रक्षण कसे झाले आहे ते? अणि तुम्हाला एक आधार मिळाला आहे आणि प्रत्येक गोष्ट घटित झाली आहे.

फार मोठा बदल असा आहे, की तुम्ही स्वतः ते सर्व काही जाणता आणि त्या ज्ञानात तुम्ही दुसऱ्यांना बदलता. तुम्ही स्वतःपुरतेच मर्यादेत राहू नका. ते तुम्हाला पसरवायचे आहे. ती शक्ती तुम्हाला तुम्ही स्वतःला जाणण्यासाठी तुमच्याप्रत दिलेली आहे. तुम्ही आत्मविश्वासू बना आणि नम्र, कृपाळू, शांत असे बना आणि त्याच पद्धतीने लोकांशी बोला तर त्यांना

कळेल तुमचं हृदय म्हणजे सहजयोग. ते तुम्हाला फक्त एवढचं म्हणण्यासाठी दिलेले नाही, की तुम्ही सहजयोगी आहात. म्हणून तुम्ही स्वतःला जाणून घ्या. तुम्ही तुमचा स्वतःचा खजिना सांभाळा आणि ते ज्ञान तुम्ही तुमच्या खजिन्यामध्ये ठेवा आणि तुमच्या समजुतदारपणात ठेवा.

आता मला म्हणावेच लागेल, या जगामध्ये पुष्कळसे लोक आहेत, अगदी अब्जावधी, अशावेळी तुम्ही फक्त असे लोक आहात जे सहजयोगामध्ये आलेत. मी तुम्हाला निवडलेले नाही, तर तुम्ही तुमच्या आतमध्ये जाणले पाहिजे, 'माझ्यामध्ये काही तरी विशेष असलेच पाहिजे, की ज्यामुळे मला सहजयोगामध्ये येण्यास भाग पडले आणि ही सूक्ष्म पद्धती समजून घ्यावी लागली. ही अत्यंत सूक्ष्म पद्धती आहे आणि ती थोड्या सूक्ष्म लोकांनाच समजू शकते आणि ढोबळ लोकांना नाही. जर तुम्ही तुम्हाला आणि आत्म्याला शोधून काढलत तर तुम्ही पुढे प्रगती कराल आणि तुम्हाला कोणत्याही प्रकारचा अहंकार नसेल कारण तुम्ही स्वतः अहंकारी नाही.

जे लोक, ज्यांना अहंकार आहे, जसे मी तुम्हाला सांगितले, तर ते लोक सहजयोगाच्या माध्यमातून पैसा बनवतात. त्यांना स्वतःला सहाय्यभूत होण्यासाठी ते काही तरी संघटित करण्याचा प्रयत्न करतात. ते अगदी वेगळ्या पातळीवरचे लोक असतात, पण तुम्ही मात्र त्या पद्धतीचे लोक नाहीत. तुम्ही नुसते स्थिर असून चालणार नाही, तर प्रत्येकाने शोधून काढलं पाहिजे, 'मी कोण आहे? मी काय आहे?' श्री येशू म्हणाले, 'तुम्ही स्वतःस जाणा.' महंमद पैगंबर साहेब म्हणाले, 'तुम्ही स्वतःस जाणून घ्या.' म्हणजे त्यांच्यापैकी सर्व म्हणाले, 'स्वतःस जाणून घ्या' याचा अर्थ तुम्ही काही तरी विशेष आहात. तुमच्यात लपलेले गुण आहेत, जे तुम्ही जाणता. एकदा का तुम्ही स्वतःला जाणले, तर प्रथम तुम्हाला आत्मसन्मान प्राप्त होईल. तुम्ही कोणतीही चुकीची गोष्ट करणार नाही. तुम्हाला क्रोध असणार नाही. तुम्ही प्रेमाचे महासागर असाल आणि ते असलेच पाहिजे. यालाच सहजयोग म्हणतात.

मला माहीत आहे, की हे अत्यंत खराब दिवस आहेत. 'हे अत्यंत घोर कलियुग आहे' असे लोकही म्हणतात. ठीक आहे, पण अशा काळामध्ये तुम्ही कशासाठी आहात तर लोकांना प्रकाशित करण्यासाठी त्यांना योग्य कल्पना देण्यासाठी पण त्या कशा ? जोपर्यंत तुम्ही स्वत:ला पूर्णपणे जाणत नाही की तुम्ही या सर्व गोष्टींसाठी कार्यक्षम आहात.

## प्रेम

प्रेम मर्यादित नाही. प्रेम अमर्यादित असलंच पाहिजे. अमर्यादित प्रेम जे सर्व प्रेमाला बांधून ठेवते. ही एक प्रेरणाशक्ती आहे आणि ही प्रेरणाशक्ती पूर्वीपासूनच कार्य करीत आहे. एकच गोष्ट आहे, की तुम्हाला फक्त त्याचा प्रतिनिधी बनायचे आहे. तुम्हाला असे लोक बनायचे आहे, की जे प्रेम विदित करतात. तुम्हाला तुमच्याकडे असलेल्या महान प्रेमसंपत्तीचा प्रत्येक अधिकार आहे आणि तुम्ही ते सर्वत्र पसरवू शकता. जगातल्या सर्व सत्यशोधकांवर तुम्हाला प्रेम करायचे आहे. त्यांनी सर्व प्रकारच्या चुका केलेल्या आहेत. अहंकाराच्या सफरी केलेल्या आहेत. तरी तुमच्या आईंनी त्यांच्यावर प्रेम केले आहे आणि तुम्हालासुद्धा त्यांच्यावर प्रेम करायचे आहे. जर त्यांना सुधारायचं असेल तर ते मी करते. तुम्ही फक्त ते करू नका त्यामुळे ते दुखावले जातील. संकोचाचा वापर करा. एकमेकांशी बोलतांना स्वत:ला प्रशिक्षित करा की ज्यामुळे या गोष्टी मधुर आणि चांगल्या होतील. त्याच बोलल्या जातील आणि त्यामुळे दुसऱ्या व्यक्तीला वाटेल की ही व्यक्ती योग्यरीत्या सहजयोगाच्या परंपरेमध्ये वाढलेली आहे. जर आपल्याकडे सहजयोगाची परंपरा असेल ज्यामध्ये आपण एकमेकांशी बोलतांना श्रीरामांप्रमाणे संकोच बाळगला पाहिजे.

आज तुम्ही सर्वांनी तुमच्या हृदयात वचन द्यायचे आहे. म्हणून तुमचे हात तुमच्या हृदयावर ठेवा व म्हणा, 'श्रीमाताजी आम्ही सर्वजण प्रेम करू. तुमचे परमेश्वरी प्रेम सर्वत्र पसरो. पूर्ण विश्व आम्ही आच्छादून टाकू आणि सर्व लोकांना आत्मसाक्षात्कार देऊ. आम्ही ओरडणार नाही. आम्ही क्रोध

करणार नाही. आम्ही सर्वप्रकारचे कर्मकांड करणार नाही, परंतु आम्ही समर्पित राहू. आमचे अहंकार आपल्या चरणांशी समर्पित करू.' ते समर्पित करा. तुमचा अहंकार समर्पित करा. तुमचे सर्व प्रश्न सुटतील कारण जोपर्यंत तुमच्याकडे अहंकार आहे, तोपर्यंत ती परमेश्वरी शक्ती ते स्वीकारत नाही. तुम्ही काही कराल, पण जर तुम्ही जोडलेले नसाल किंवा तुमचे नाते हरवलेले असेल तर श्री येशू तिथे नसतील तर त्यांना तुम्ही स्थापित करा. सर्वप्रथम तुम्ही कसे प्रेम करता ते दाखवावे लागेल. याचा अर्थ असा नव्हे तुम्ही तुमच्या पत्नीवर प्रेम करता, तुम्ही तुमच्या मुलांवर प्रेम करता, ते तुम्हाला प्रत्येकावर करावे लागेल. प्रत्येकाला तुम्ही सुखी करण्याचा प्रयत्न करा कारण ते आवश्यक आहे. मला संगीत आवडते. संगीताद्वारे तुम्ही परम चैतन्य पसरवू शकता. परम चैतन्य, प्रेम पसरवण्याचे चांगले साधन आहे, पण जे गायन, वादन कुशल लोक आहेत, ते प्रेमळ लोक असले पाहिजेत. ते क्रोधी स्वरूपाचे असता कामा नये. देखावा करणारे असता कामा नये आणि स्वत:बद्दल अत्यंत विचार करणारे असता कामा नये.

मी तुम्हाला तुमच्या स्वत:च्या प्रगतीबाबत तुमच्या स्वत:च्या सुधारण्याबाबत आणि सहजयोगामधील स्थितीबाबत ज्यामुळे तुम्ही कोण आहात ते स्पष्ट होते, त्याबद्दल तुम्हाला विशद करून सांगितलेले आहे. इतर लोक काहीही बोलोत हरकत नाही. तुम्ही स्वत:बद्दल काय सांगता अगदी सत्यपूर्वक प्रामाणिकपणे ती वास्तवता असते आणि नेहमी तुम्ही स्वत:च स्वत:स सामोरे जाता. मी म्हणेन विशेषकरून स्त्रियांसाठी की मी एक स्त्री आहे. मी इतके वर्ष फार परिश्रम घेतले आहेत आणि एक स्त्री म्हणून मला सांगितलेच पाहिजे की सर्व स्त्रियांनी तसा प्रयत्न केला पाहिजे.

कारण त्या नेहमीच म्हणता आम्ही शक्ती आहोत, परंतु त्यांच्या जीवनात मला तसे दिसत नाही. त्यांनी शक्ती म्हणून कार्य केले ते दिसत नाही. फक्त नेहमीच सहजयोगावर कशा एक पद्धतीनं त्या अवलंबून असतात. त्यांनी त्यांच्या स्वत:च्या स्वातंत्र्यात उभे राहिले पाहिजे. त्यांनी

स्वतंत्र असेलच पाहिजे. प्रत्येक गोष्टीच्या त्यांच्याकडे कल्पना असल्या पाहिजेत. मला खात्री आहे जर स्त्रिया अशा मार्गाने उभ्या राहिल्या तर सहजयोग पुष्कळ प्रमाणात पसरेल. स्त्रियांपेक्षा पुरुष मंडळी सहजयोगासाठी अधिक कार्य करतात. मला हे समजू शकते कारण स्त्रियांना कुटुंब असते, त्यांना मुलेबाळे असतात, परंतु फार महत्त्वाची गोष्ट ही आहे, की जर तुम्ही एकदा का उत्साहाने सहजयोग स्वीकारलात तर तुमची मुलेसुद्धा चांगल्यारीतीने प्रगती करतील आणि कुटुंबाची काळजी घेतली जाईल. सरतेशेवटी ही एक परमेश्वरी शक्ती आहे, ती तुमच्यापैकी सर्वांची काळजी घेते. फक्त तुमचा विश्वास असला पाहिजे. परमेश्वरी शक्ती विचार करते, समजून घेते, संघटित होते आणि ती तुमच्यावर प्रेम करते. या परमेश्वरी शक्तीला समजून घेतले पाहिजे. ती शक्ती आता तुमची आहे आणि तुम्ही या परमेश्वरी शक्तीच्या साम्राज्यात आहात आणि तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या असणार नाही.

आता नवीन शतक सुरू झालेले आहे आणि पुष्कळशा गोष्टी घडणार आहेत. म्हणून तुम्ही सर्वांनी निश्चय करा, की तुम्ही काही तरी काम करावे. तुमची सहजयोग पसरवण्यासाठी काही समजूत असेल त्याप्रमाणे तुम्ही सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे आणि तुमचं मत त्यासाठी जोडले पाहिजे. जर स्त्रिया बाहेर जाऊ शकत नसतील तर त्यांनी काही तरी लिहिले पाहिजे. त्या स्वत: त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीबद्दल त्यांच्या अनुभवाबद्दल लिहू शकतात किंवा सहजयोगात कार्य करण्यासाठी निरासक्त स्थितीबद्दल लिहू शकता. तुम्ही निर्लेप व्यक्ती असले पाहिजे. तो महालक्ष्मी तत्त्वाचा गुणधर्म आहे. जी व्यक्ती निरासक्त आहे, ती व्यक्ती कोणत्याही मूल्यहीन वस्तुविषयी आसक्त नसते. परंतु त्याचा अर्थ असा नाही, की तुम्ही संन्यास घ्यावा, कुटुंबापासून पळून जावे, तुमच्या कौटुंबिक जबाबदारीतून पलायन करावे व प्रत्येक गोष्टीपासून दूर जावे. त्याला निरासक्त म्हणता येणार नाही. हे झाले पलायन. परंतु निरासक्त म्हणजे तुमच्याकडे सर्व काही आहे तरीसुद्धा तुम्ही अलिप्त राहता. याचा अर्थ असा त्या वस्तूंपासून मिळणाऱ्या फायद्याशी

कसलाही संबंध तुम्हाला जाणवत नाही. अशा गोष्टी घडू शकतात. अगदी सहजपणे जर तुम्ही खरोखरच आत्मपरीक्षण केलं तर आणि आत्मपरीक्षण हा सर्वोत्तम ध्यानासाठी मार्ग आहे. प्रथम आत्मपरीक्षण आणि मग ध्यान करा तेव्हा तुम्ही वर्धित व्हाल आणि तुमच्या आत्म्याचा आनंद, स्वत:चा आनंद तुम्हाला अशी आनंदाची स्थिती देईल की तुम्ही मूर्खपणाच्या, महत्त्व नसलेल्या गोष्टीकडे जाणार नाही. तुम्ही सहजयोगामध्ये अर्थपूर्ण असे लोक बनाल आणि इतक आश्चर्यकारक काम कराल, की प्रत्येकाला आश्चर्य वाटेल, की या सर्वसाधारण मानवाने या गोष्टी कशा सिद्धीस नेल्या? त्या कशा घटित केल्या?

## धारिष्ट्य

मी स्वातंत्र्याचा लढा पाहिला आहे. जेव्हा ते आपल्याला मिळाले. जेव्हा या ध्वजाचे ध्वजारोपण केले तेव्हा इतर ध्वज खाली आणला गेला. मी आता तुम्हाला सांगू शकत नाही. माझ्यामध्ये त्यावेळी कोणती भावना दाटून आली होती! ती पण अशी भावना होती, की सत्याने कसं ही करून असत्यावर विजय मिळवला आहे. अन्यायावर न्यायाने मात केली होती. अद्याप ती भावना इतकी आहे, की ध्वजाकडे पाहू शकत नाही. जर मी ध्वजाला पाहिलं तर मला पूर्ण इतिहास आठवतो. ते सर्व म्हणजे किती तरी लोकांना फासावर चढवले गेले, किती हुतात्मे निर्माण झाले आणि किती लोकांनी संघर्ष केला आणि हा ध्वज उभा आहे, आणि या आदर्शासाठी तुम्ही उभे राहता या सर्व त्यागासाठी तुम्ही मनाने उभे राहता आणि मानवजातीच्या कल्याणासाठी जे काही आपण प्राप्त केले त्यासाठी तुम्ही उभे राहता. इतरांसाठी अजून पुष्कळ काही प्राप्त करायचे आहे. तुम्ही दुसऱ्यांसाठी काय करू शकता. ती तुमच्यामध्ये उत्तम तयारी करा. सर्वात उत्तम मार्ग म्हणजे तुमच्यामध्ये या सर्व गोष्टी ठसवा, की तुम्ही आता पूर्णपणे अपूर्व व्यक्तिमत्व झाला आहात.

मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे पुष्कळ मोठे नेते आहेत.

मोठ्या व्यक्ती आहेत. ज्यांचे पुष्कळसे लोक स्मरण ठेवतात. आता तुम्ही हे पाहिलं पाहिजे ते कशामुळे मोठे झालेत? इतक्या वर्षानंतरसुद्धा अद्याप त्यांचे स्मरण का केले जात आहे? मी तुम्हाला शिवाजी महाराजांची प्रतिमा दिलेली आहे. हा एक फार मोठा आत्मा होता. ज्यांच्याकडे अशी तत्त्वे होती आणि सुंदर जीवन होते. त्यांच्या भाषेमध्ये, त्यांच्या प्रवृत्तीत, त्यांच्या प्रत्येक गोष्टीमध्ये एक सुंदर जीवन भरलेले होते आणि त्या गुणांसह ते एक शूर व्यक्तिमत्त्व होते. एकदा का तुम्हाला ते गुण मिळाले तर कोणतीही गोष्ट जी फार महत्त्वाची आहे ती करतांना तुम्हाला रोखले जाणार नाही, तुम्हाला कशाचेही भय वाटणार नाही. तुम्ही गोलगोल फिरत बसणार नाही, परंतु तुम्हाला समजून येईल की एखाद्या गोष्टीचे निरसन कसे शोधावे आणि ते घटित कसे करावे? हे सर्व तुमच्याबाबत घडून येईल. त्यासाठी तुम्ही स्वत:ला जागले पाहिजे आणि धारिष्ट्याची अशी शक्ती तुमच्याजवळ असली पाहिजे. तुम्ही अविचारी व्यक्ती असणार नाही. परंतु सुज्ञता असेल. सुज्ञतेबरोबर धारिष्ट्य असेल आणि तोच तुमचा आत्मा आहे. जो तुम्हाला भरपूर सुज्ञता देईल आणि पुष्कळ धारिष्ट्य देईल. ते म्हणजे संघर्षाची प्रवृत्ती नाही किंवा दांडगाईचा स्वभाव नाही. ती चांगल्या स्वभावाची, शांतीपूर्ण, सुंदर, धारिष्ट्याची प्रवृत्ती आहे. धारिष्ट्य हे शांतीपूर्ण फार शक्तीवान असते. तुम्हाला प्रत्येकावर बॉंब टाकावयास नको, प्रत्येकाला फार मारायलाही नको. परंतु तुम्हाला धारिष्ट्यात उभं रहायचं आहे आणि दुसरा गुण जो तुम्ही व्यक्त करा तो म्हणजे नम्रता. अगदी मधुरपणे त्या धारिष्ट्याबरोबर तुम्ही उभे असणार आहात. मला माहीत आहे, तुमच्यापैकी पुष्कळजण असे आहेत, इथे संघर्ष नाही, मारामारी नाही फक्त धारिष्ट्याने उभं रहाणं आणि जे योग्य ते करणं कारण तुमचं परमेश्वराबरोबर नात जोडलं गेलं आहे. परमचैतन्याबरोबर तुमचा संयोग झालेला आहे आणि ते प्रत्येक गोष्ट घटित करणार आहे.

जेव्हा सहजयोगी अबोधिता आणि त्याच्या चैतन्याच्या जाणिवेवर पूर्ण अवलंबन स्वीकारतात जे परमेश्वराचे त्यांच्यामधून झालेल्या शक्तीचे

प्रकटीकरण दर्शवतात, त्यांचे पूर्णपणे रक्षण केले जाईल. होलिकासारख्या राक्षसी प्रवृत्तीची व्यक्तीसुद्धा त्यांना जाळू शकणार नाही आणि हा आजचा दिवस आहे, की ज्या दिवशी आपण आता सहजयोग जाणून घ्यायचा आहे. आता यापुढे सहजयोग्यांना धोका नाही. यापुढे आपण आयुष्यात धोक्याच्या जागी उभे नाहीत. आपण आता निर्भय लोक आहोत. परंतु आपण नम्र, प्रेमळ असे लोक आहोत आणि जेवढे शक्य आहे तेवढ्या लोकांना वाचवण्यासाठी आपण उत्सुक आहोत. सर्व मानवजातीला या दुसऱ्या जाणिवेत आणायचे आहे. तुमच्या उत्क्रांतीच्या पद्धतीतून ते आपल्याला प्राप्त करायचे आहे. त्यासाठी तुम्हाला कठोर परिश्रम घ्यायला हवे. जसे संत तुकाराम महाराज स्पष्टपणे म्हणाले, 'येऱ्या गबाळ्याचे काम नोहे, येथे पाहिजे जातीचे.' ते कार्य महान, वीर लोकांचे आहे. फक्त जे धारिष्ट्यवान आहेत तेच ते कार्य करू शकतात.

कधी काळी प्रत्येकाला या जगाला, अडीअडचणीला, टीकेला कसे सामोरे जायचे हे तुम्ही जाणता. लोक तुम्हाला अपमानित कसे करतात? तुम्हाला त्रास कसे देतात? त्यावेळी तुम्ही शांती सांभाळणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्येकाने ओळखलं पाहिजे, की या जगात असे पुष्कळ लोक आहेत जे मूलतः फार मोठे आत्मे आहेत. फक्त एकच गोष्ट की तुम्ही त्यांच्याशी संपर्क केला पाहिजे. त्यांना जाणलं पाहिजे, त्यांना शोधलं पाहिजे, त्यांना प्रकाशात आणले पाहिजे.

सहजयोगी दहा वर्षापूर्वी जसे अस्वस्थ होत तसे आता होत नाहीत. आता कळते, की या जगामध्ये पुष्कळ लोक आहेत ज्यांना सहजयोग समजतो, पण ते काही पुरेसे नाही. अजून पुष्कळांना, हजारो लोकांना आत्मसाक्षात्कार द्यायचा आहे. हजारो लोकांनी तो प्राप्त करायचा आहे. तुम्ही जेव्हा माझा जन्मदिवस साजरा करता तेव्हा तुम्हाला हे सिद्ध करायचे आहे, की यापुढे कलियुग नाही तर कृतयुगास प्रारंभ झालेला आहे आणि हे कृतयुग संपवायचे आहे आणि या पृथ्वीवर सत्ययुग आणायचे आहे.

## निरासक्त श्रद्धा

तुम्ही परिस्थितीशी व्यवहार करीत आहात, परंतु या सर्वत्र पसरलेल्या परमेश्वरी शक्तीच्या क्षमतेवर तुमचा पूर्ण विश्वास असलाच पाहिजे. जेव्हा तुम्ही निरासक्त होता, तुम्ही म्हणता ते श्रीमाताजी करतात. जेव्हा तुम्ही असं म्हणतात की, तुम्ही (सहजयोगी) करणार आहात तेव्हा पूर्णत: सर्व गोष्टीच बदलून जातात. त्याऐवजी जर तुम्ही तुमची जबाबदारी चैतन्यावर टाकलीत, सर्व तुमच्या समस्या या परमेश्वरी शक्तीकडे दिल्यात, की जी व्यक्ती इतकी शक्तिमान, इतकी कार्यक्षम होते, की सर्व कार्य घटित करेल.

सहजयोगामध्ये तुम्हाला सर्वप्रकारच्या समस्या आहेत. विशेषकरून तुम्हाला असे काही लोक आढळतात, की जे सहजयोगाशी तितकेसे जोडलेले नाहीत असे लोक थोडे आहेत, मग तुम्हाला त्याबद्दल फार वाईट वाटतं. परंतु तुम्ही कधी या मतावर ध्यान करण्याचा प्रयत्न केला आहे? आणि ही समस्या परमेश्वरी शक्तीपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे? तर आपण का चिंता करावी? जेव्हा आपल्या सहस्रारामधून परमेश्वरी शक्ती आपल्याकडे येते तर आपण का चिंता करावी? त्याचा आपण का विचार करावा? फक्त तुम्ही ते परमेश्वरावर सोडून द्या. जर ते शक्य असेल तर तुम्हाला ते प्राप्त होईल. हे पाहा, ते मानवजातीसाठी अत्यंत कठीण आहे कारण ते त्यांच्या अहंकारात राहत असतात. ते त्यांच्या अटीतटी बंधनाबरोबर राहत असतात, पण जेव्हा या गोष्टीबद्दलची आसक्ती निघून जाते तेव्हा तुम्ही काय करायचे तर केवळ त्या सर्व गोष्टी त्या शक्तीवर सोडून द्या.

जर ही अशीच मनोवृत्ती आपल्याकडे असेल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल, तुम्हाला किती तरी समाधान वाटेल कारण ही फार फार आनंद देणारी गोष्ट आहे की लोक अध्यात्मामध्ये प्रगती करीत आहेत. त्याबाबत फक्त बोलून किंवा फक्त वाचून ते होणार नाही. ते तुमच्यामध्ये खरोखर घडले पाहिजे व तुमच्यामध्ये सत्य स्वरूपात आले पाहिजे म्हणून ही गुणवत्ता फार मदत करणारी आणि प्रत्येक सहजयोग्याला धीर धरण्यास मदत करणारी

आहे. सुहृदय आणि नम्र बनवणारी आहे, परंतु तुम्हाला सुधारायला हवे. दुसऱ्या व्यक्तीला सुधारण्यासाठी एक मार्ग आहे. जे लोक परमेश्वरी जगामधून येत नाहीत व जे सर्वसाधारण जगातून येतात त्यांच्यासाठी त्यांना सुधारणे कठीण कार्य आहे. काही लोक इतके तापट स्वभावाचे असतात, की ते सर्व सहन करू शकत नाहीत. काही हरकत नाही. तुम्हाला त्यांना क्षमा करायची आहे, पण सर्वात चांगले, की जे लोक फार साधे आहेत, जे प्रेमळ आहेत आणि कनवाळू आहेत त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, नंतर जे अत्यंत गुंतागुंतीचे लोक आहेत ते हळूहळू सहजयोगामध्ये येतील. अशा लोकांशी व्यवहार करण्याचा तुमचा मार्ग मातेप्रमाणे असला पाहिजे. मातृत्वाचे नाते तिथे असलेच पाहिजे.

मातेची कनवाळू वृत्ती आणि प्रेम क्षमा करते आणि खात्री देत असते, की माझ्याकडे एक माता आहे. मला काहीच होणार नाही आणि हे वचन चांगल्या रीतीने काम करते आणि असेच वचन तुम्ही इतर सहजयोग्यांना द्यायचे आहे, की जे सहजयोगी तुमच्याकडून आत्मसाक्षात्कार प्राप्त करतात. त्यांना असं वाटू द्या, की तुम्ही त्यांच्यावर रागावलेले नाही. ते मूर्ख आहेत. मला माहीत आहे ते कधी काळी दांडगाई करतात. मी अशाप्रकारच्या लोकांमधून गेलेली आहे. परंतु एकच गोष्ट ज्याने कार्य केले ते म्हणजे शुद्ध प्रेम. शुद्ध प्रेमाला कसलीही अपेक्षा नसते. तुम्ही फक्त प्रेम द्या आणि त्या व्यक्तीला पूर्ण लक्ष देऊन सुधारण्याचा प्रयत्न करा. या परमेश्वरी कार्यामध्ये त्या व्यक्तीविषयी तुम्ही आसक्त होता कामा नये. कल्पना करा कोणी एक व्यक्ती जर त्या योग्यतेचा नसेल आणि त्रासदायक असेल, तुमच्यावर रागवत असेल, तुमच्यावर चिडत असेल, तुमचा अपमान करत असेल आणि इतर काही तर त्या व्यक्तीला विसरून जा. अन्य किती तरी दुसरे लोक आहेत म्हणून एकाच व्यक्तीच्या मागे धावण्याची गरज नाही आणि त्या व्यक्तीबरोबरच आसक्त असण्याची आणि त्याला ते जाणवून देण्याची गरज नाही.

जर तुम्ही सहस्राराशी एकरूप झालात तर सहस्रार स्वत:हून काम करते.

ते तुमचा लोकांशी संपर्क करून देईल आणि असे लोक तुमच्या संपर्कात येतील तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटेल, की हे चक्र कसे काम करीत आहे. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक देशामध्ये समस्या आहेत आणि असं आपण म्हणू या प्रत्येक देशाची विध्वंसक प्रतिमा आहे, परंतु काही देशामध्ये मला माहीत नाही, की ते कसे चमकते. एकदा का ते लोक सहजयोगी झाले तर समस्या नसते. कशाबद्दलही समस्या नसते. हे पहा जर ते सहजयोगी आहेत तर त्यांना काही सांगण्याची गरज नाही. ते स्वतःहून घटित करतात. ते समजतात हे काय आहे ते!

यاप्रमाणे ज्या देशात समस्या आहेत, जिथे लोक अत्यंत मोठ्या पातळीवर गेलेले नाहीत ते काही मोठे सत्यशोधक नाहीत, पण काही देशामध्ये मला वाटते जे लोक महान सत्यशोधक होते ते हरवून गेलेले आहेत. जसे इंग्लंडप्रमाणे मला वाटते, की सर्व सत्यशोधक अंमली पदार्थ, हिप्पी वृत्ती इ.निरर्थक गोष्टींमुळे गमावलेले आहेत आणि त्या सर्वांमध्ये अमेरिका अत्यंत वाईट स्थितीत आहे. ती इतकी वाईट स्थितीमध्ये आहे, की ते असत्याच्या शोधामध्ये हरवून गेले आहेत आणि हे फार कठीण आहे, की जे लोक सत्य शोधत आहे त्यांना शोधून काढणे.

हळूहळू ते सर्व कार्यान्वित होत आहे, तथापि मला सांगितले पाहिजे, की आपण एखाद्या विशिष्ट देशाचा, जिथे सहजयोगाचे कार्य विशेष स्वरूपात नाही त्याचा विचार करू नये किंवा काही ठिकाणी अधिक प्रमाणात काम करीत आहेत असाही नाही. आपण असा विचार करायला हवा, की सहजयोग साऱ्या विश्वात वाढत आहे आणि तुम्ही सहजयोगाच्या समाजाचे एक आंशीक भाग आहात आणि हा एक असा दुर्मिळ समज आहे, की तो पूर्वी कधीही नव्हता.

## सत्याचा प्रकाश

ह्या पहा लहान लहान मेणबत्त्या. त्यांच्याकडे लहान लहान प्रकाश असला तरी तो प्रकाश त्या देत असतात आणि तो प्रकाश देण्यासाठी स्वतः

जळत असतात. जर तुम्ही प्रकाश देऊ शकला नाही तर तुमच्या आत्मप्रकाशाचा उपयोग काय? आत्मप्रकाशित होणं याचा अर्थ असा नव्हे, की तो प्रकाश फक्त तुमच्यासाठीच आहे. तो प्रकाश प्रेमाचा, करुणेचा आणि परमेश्वरी आहे. जो सर्वसाधारण नाही आणि तो सामान्यही नाही. जसा तो तुम्हाला फिल्ममध्ये दिसतो. तर ते एक परमेश्वरी प्रेम आहे जे कार्यरत असते. मला भटक्या समाजाबद्दल खास भावना आहे. त्यांची काहीच चूक नसतांना ते अगदी त्रासदायक जीवन जगत आहेत पाहा. या भटक्या लोकांना आत्मसाक्षात्कार कसा मिळाला? ज्या कोणाला तो आत्मसाक्षात्कार पाहिजे असेल त्यांना तुम्ही देऊ शकता. मात्र एक गोष्ट, की तुम्ही त्यांच्यावर बळजबरी करू शकत नाही. जर त्यांच्याकडे शुद्ध इच्छा असेल तर त्यांना आत्मसाक्षात्कार मिळू शकतो.

तुम्हाला जे मिळाले आहे, ते निर्मलतत्त्व, जे शुद्ध करतं, जे तुम्हाला स्वच्छ करतं, जे तुम्हाला आनंद, सुख, सत्य देतं. आणि हेच फक्त तुम्ही मागायचे आहे. अन्यथा सर्वत्र काळोख आहे, तर तुम्ही प्रकाश पाहू शकणार नाही, मग तुम्ही ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू कोणी असा तुम्ही सत्याचा प्रकाश पाहू शकत नाही. तुम्हाला हा सत्याचा प्रकाश घ्यायचा आहे.

यानंतर तुम्हाला काय करायचे आहे? ते तत्त्व तुम्ही दुसऱ्यांना द्यायचे आहे. इतर लोकांना तुम्ही बदलवून टाकायचे आहे. तुम्ही त्यासाठी पुष्कळ परिश्रम घेतले आहेत. मला आश्चर्य वाटते, की तुम्ही लोक इतके चांगले कार्य करता आणि इतके चांगले आहात आणि ते तुम्ही सर्व कसं प्राप्त केलं ते समजत नाही. अर्थातच काही लोक असे आहेत, की ज्यांना पैशाची ओढ आहे आणि काही लोकांना सत्तेची ओढ आहे, पण या सर्व गोष्टी आनंद देऊ शकत नाहीत. आनंद काय देते तर तुमचा सत्याचा आतला प्रकाश. जो तुमच्याकडे आहे आणि तुम्हा सर्वांकडे आहे. तुम्ही हे जाणता, तुम्ही सर्व अनुभवी आहात. तो अनुभव इतरांना दिला पाहिजे. जेवढे शक्य आहे तेवढे दुसऱ्यांना द्या. पण हे किती लोक करतात? आणि किती लोक तो करून

दाखवतील? या दिवाळीच्या दिवशी तुम्ही जे करीत आहात, म्हणजे लोकांना आत्मप्रकाशित करीत आहात आणि ते सर्व त्यांच्यासाठी करीत आहात ही चांगली कल्पना आहे आणि ते केलंच पाहिजे, पण तुम्हाला माहीत नाही की तुम्ही स्वत: दिवा बनायचे आहे. आज दोन संदेश द्यायचे आहेत. पहिला संदेश सारे विश्व आत्मप्रकाशित करायचे आहे आणि सर्व इतरांना प्रकाशित करायचे आहे.

जर मी आदिशक्ती आहे असे म्हणते याचा अर्थ मला हे कळत नाही, खरोखर मी कोण आहे? पण ते मला म्हणावे लागते कारण लोक म्हणतात, 'माताजी, तुम्ही तसे जाहीर केलेले आहे.' काय जाहीर केलेले आहे? मी कोणी आहे ती मी आहे. माझ्या जाहीर केल्यामुळे मला आता असे आढळून येते, की तुम्ही लोक आता मोठ्या संख्येने उन्नती करीत आहात. म्हणून ठीक आहे. त्याच मार्गाने ते स्वीकारा. कोणी एक जाहीर करण्याची किंवा काही म्हणण्याची गरज नाही, पण ती एक स्थिती प्राप्त झाल्यानंतर तुम्हाला काम करायचे आहे. ते काम आहे सहजयोग पसरवण्याचे. तुम्हाला पुष्कळ दिवे प्रकाशित करायचे आहेत. याचा अर्थ तुम्हाला जाणवेल, की तुम्ही असा प्रकाश आहात, की तो सर्वात प्रकाशित करीत आहात आणि सूक्ष्मतेत तुम्हाला जाणवेल, की मी प्रकाश आहे. पुष्कळ सहजयोगी भरपूर काम करीत आहेत आणि ते घटित करीत आहेत. सहजयोग पसरवीत आहेत. तुम्हाला पुष्कळ दिवे प्रकाशित करायचे आहेत. याचा अर्थ तुम्हाला कळून येईल, की तुम्ही प्रकाश आहात आणि सर्व काही तुम्ही प्रकाशित करीत आहात आणि नंतर सूक्ष्म मार्गाने तुम्हाला जाणवेल की मी प्रकाश आहे. पुकळ सहजयोगी खूप काम करीत आहेत आणि त्यावर मेहनत घेत आहेत. सहजयोग पसरवणं ही एक महान गोष्ट आहे. जी आज घडून आलेली आहे. पुष्कळ देशामध्ये तो आता पसरलेला आहे. त्याने धर्माचा अंध:कार जो बाहेर होता तो आता दूर केला आहे. कित्येकांचा अंध:कार त्याने नष्ट केला आहे. वंशवाद, हा वाद, तो वाद, हे सर्व काही दूर केलेले आहे.

मला आशा आहे की तुमच्या या जीवनकाळामध्ये तुम्ही ही स्थिती प्राप्त कराल आणि दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देण्याचे तुमचे पूर्ण कार्य तुम्ही सिद्धीस नेलेले असेल. जे लोक दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देत नाहीत, जे फक्त पूजेसाठी येतात या सर्व गोष्टी अगदी मध्यम स्थितीतल्या आहेत. ते अगदी उच्च पदावर जाणार नाहीत. हे पूजेसाठी तुमचे येणे म्हणजे काय? ज्याप्रमाणे की तुम्ही पूजेबरोबर थोडे उच्च पदावर जाता आणि नंतर पुन्हा खाली येतात, परंतु जे हळूहळू वाढतात ते या स्थितीमध्ये मोठे होतील. याची मला खात्री आहे. माझ्या आयुष्याच्या काळात मी इतके लोक पाहू शकले. हे लोक असे आहेत जर ते इथे उभे राहिले तर ते शांती उत्सर्जित करत असतात. ते प्रकाश बाहेर सोडत असतात. ते प्रत्येक गोष्ट देत असतात कारण ते आता प्रकाश आहेत. त्यांना आता आत्मप्रकाशित करण्याची आवश्यकता नाही कारण ते स्वत: प्रकाश आहेत. अशी स्थिती वाढवली पाहिजे आणि तुमच्यामध्ये ती घटित केली पाहिजे.

# प्रकरण सात

# सामुदायिक प्रचार-प्रसार

''सामुदायिकता हा सहजयोगाचा स्वभाव आहे.''

## सामूहीकता

आम्ही आता आंतरराष्ट्रीय धर्माचे आहोत. आम्ही कोणत्याही देशाचे नाही. आपल्यापैकी काही कोणत्याही देशाचे आहेत तरीसुद्धा आम्ही इटालियन नाही, आम्ही भारतीय नाही, आम्ही ऑस्ट्रेलियन नाही, तर आपण कोण आहोत? आपण परमेश्वराच्या राज्यातले आहोत. म्हणून आपण परमेश्वराची माणसे आहोत. हे पूर्वी विल्यम ब्लेकने वर्णन केले आहे, म्हणजे आपण परमेश्वराची माणसे आहोत. म्हणून आम्ही या देशाचे, त्या देशाचे आहोत, या कल्पनेचे आपल्याला बंधन नाही. एकदा का तुम्हाला सामुदायिकता हा मुद्दा कळला तर तुम्ही फार मोठे व्हाल. फक्त तुम्ही मोठे व्हाल, असे नाही तर ते तुमचे मोठेपण तुमच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास देईल, की आम्ही सहजयोगाची जबाबदारी आता घेतली पाहिजे.

हे ठीक आहे, की मला सहजयोगामध्ये काय मिळाले? मी सहजयोगात काय प्राप्त केले? सहयोगात माझा काय फायदा झाला? सहजयोगात व्यक्तिगत मला काय मिळाले? मी माझी चक्रे कशी योग्य केलीत? ही झाली एकप्रकारची सिद्धी आणि दुसऱ्या बाजूला जबाबदारी घ्यायची आहे. सर्वत्र आपल्याला सहजयोग पसरवायचा आहे.

## जबाबदारी

तुमची प्रथम आणि सर्वप्रथम जबाबदारी म्हणजे सहजयोग आहे. तुम्ही जाणून घेतले पाहिजे ते काम काय आहे? ते फार मोठे काम आहे. सारे विश्व बदलून टाकण्याचे काम आहे आणि ही आहे माझी दूरदृष्टी. आणि या माझ्या वार्धक्यातसुद्धा मी तोच विचार करते आणि ही जर माझी दूरदृष्टी असेल तर तुमची वृत्ती कशी असावी? म्हणजे आपण सहजयोग पसरवण्यासाठी सर्वजण बाहेर जायला पाहिजे. ही आहे मुख्य गोष्ट. मी या पूजेसाठी तुम्हाला बोलवते ते फक्त नवीन शक्ती देण्यासाठी. मी असे म्हणेन, की तुम्ही अधिकाधिक पूजेचे केवळ आशीर्वाद घेत असाल आणि घरात बसत असाल

तर त्याचा उपयोग नाही. तुम्हाला सहजयोग पसरवावाच लागेल. सर्व सहजयोग्यांची, अगदी सर्व सहजयोग्यांची पहिली आणि सर्वप्रथम जबाबदारी ही आहे, की तुम्ही सहजयोग पसरवणे. तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे? सहजयोगाबाबत किती लोकांशी बोलता. तुम्ही लोक सहजयोगाबाबत बोलण्याबाबत फार लाजरे-बुजरे असता. सहजयोगाविषयी लोकांमध्ये बोलत नाहीत म्हणजे काही कार्यक्रम असेल, जाहीर कार्यक्रम असेल तरच बोलता (एरवी नाही). तुम्हाला सहजयोगासाठी बिलकूल वेळ नाही. तुम्ही फार व्यग्र लोक आहात.

जर तुम्हाला शिवाला अनुसरायचे असेल, सदासर्वकाळ त्यांचे आशीर्वाद मिळवायचे असतील, तुम्हाला त्यांचे संरक्षण हवे असेल तर तुम्ही अत्यंत उच्च प्रतीचे सहजयोगी असायलाच हवे. सहजयोगाचा प्रसार करण्यासाठी तुम्ही जाता तेव्हा हे दिसून येते. मी ऑस्ट्रेलियामध्ये फार आनंदी आहे. सहजयोगाचा पुष्कळच प्रसार झाला आहे. मला माहीत नाही ते कसे घडले गेले? यासारख्या फार दूरवर पसरलेल्या जागी अगदी सुरुवातीला पिछेहाट झाली होती, परंतु आता तो पसरला आहे. ऑस्ट्रियामध्येसुद्धा तो पसरला आहे आणि इटलीतसुद्धा तो पसरला आहे, परंतु अन्यत्र तो पसरत नाही तर काय कारण आहे? तर बाब अशी आहे, की नेते मंडळी कधीच बाहेर जात नाही. समजा इंग्लंडमध्ये मी उत्तरेपासून दक्षिणेकडे प्रवास केला आहे आणि पूर्वेपासून पश्चिमेकडे सर्व दिशांनी प्रवास केला आहे. तिथे अगदी थोडे, अगदी अल्प सहजयोगी आहेत. तुम्ही विद्यापीठामध्ये गेलं पाहिजे. तरूण मंडळींकडे गेलं पाहिजे. जर हिप्पी लोकांचा पंथ पसरू शकतो तर सहजयोग का नाही? तो पंथ वणव्यासारखा पसरला तर सहजयोग का नाही?

अशा या सर्व गोष्टी आहेत आणि मला तुम्हाला ताकीद द्यायची आहे की काळजीपूर्वक राहा. जर तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला असेल, तर तुमची जबाबदारी आहे, की तो दुसऱ्याला द्यायला हवा आणि सहजयोग पसरवायला हवा. जर तुम्ही ते करू शकला नाही तर तुमचे रक्षण परमेश्वर

करो. तुम्ही स्वत:चे परीक्षण करा. 'मी सहजयोगासाठी काय केले आहे? आणि मला सहजयोगापासून काय मिळाले? ही तुमची जबाबदारी आहे, की तुम्ही सहजयोग स्वत:साठी घटित केला पाहिजे आणि दुसऱ्यांसाठी प्रेमाने दिला पाहिजे. त्यासाठी श्रीमाताजींना पाहायचे आहे, की त्यांची सर्व बालके या कामासाठी बाहेर जात आहेत. मी आज पुष्कळ बोलले आहे. या विषयावर अधिक बोलणे सोपे नाही, पण तुमच्यामध्ये मला धारिष्ट्य आणि त्यासाठी वेळ निर्माण करायची आहे आणि त्यावेळी त्याबद्दल सर्वकाही तुम्हाला सांगायचे आहे कारण आता ही कार्यान्वित करायची जबाबदारी तुमची आहे. ही आता तुमची जबाबदारी आहे. अगदी तुमच्या स्वत:च्या मार्गाने, पद्धतीने त्याचा विचार करा की सहजयोगासाठी आपण काय करू शकतो? प्रत्येक गोष्टीमध्ये तुम्ही सहजयोग पाहू शकता. मग तुम्हाला कल्पना सुचतील. त्या पुढे येऊ द्या. त्यांना लिहून ठेवा. कधी तुम्ही काव्य लिहा. तुम्ही सर्वजण अशा कितीतरी गोष्टी करू शकता. यापुढे थोडासुद्धा वेळ वाया घालवू नका. हे अगदी जलद गतीचे कार्य आहे कारण विश्व आता विनाशाच्या कड्यावर उभे आहे. आपण म्हणजे फक्त आपण लोकच ते वाचवू शकतो. त्यामुळे आपल्यासाठी हे आणीबाणीचे कार्य आहे. या आणीबाणीच्या कामात प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे, की सहजाचा स्वभावधर्म प्रत्येक गोष्ट घटित करीत आहे, पण जर हे कार्य योग्यवेळी घटित झाले नाही तर आपल्यासमोर दुसरे विश्व निर्माण झालेले असेल ही एक दुसरी समस्या असेल म्हणून याबद्दल गंभीरपणे विचार केला पाहिजे आणि प्रत्येक गोष्टीचे तत्त्व समजून घेतले पाहिजे आणि स्वत:च समजून घेतले पाहिजे की ही एक अमूक गोष्ट का केली पाहिजे? एकदा का तुम्ही या पद्धतीचा प्रारंभ केला, 'हे नाही, हे नाही' (नेति, नेति) मला आश्चर्य वाटणार नाही, की तुमची उन्नती अतिशय भरपूर जलदगतीने होणार आहे. अगदी वेगाने होणार आहे. मी पाहणार आहे, की तुम्ही लोक लवकरच निर्विकल्प स्थितीत प्रस्थापित होणार आहात. मी तुम्हाला आशीर्वादित करते, की तुम्ही तुमच्या आत्मोन्नतीमध्ये पूर्णपणे परिपक्व व्हाल.

आपल्याला आता बदलायचे आहे आणि ते आपले कार्य आहे. आपल्याला त्यांना पूर्णपणे बदलायचे आहे. आपण बदललेले आहोत. आपण एका बिंदूपाशी आहोत. त्याला आपण पुनरुत्थान म्हणू शकतो. त्याप्रमाणे आपण साऱ्या विश्वाच्या पुनरुत्थानासाठी प्रयत्न केला पाहिजे आणि ते आपले कार्य आहे, म्हणून हे सर्व संघर्ष, ही सर्व भांडणे या सर्व खोट्या गोष्टी पूर्ण संपवून टाकल्या पाहिजेत.

आपल्यासाठी श्री येशू आपले नेते आहेत. ज्यांनी हे आपल्यासाठी केले. ते सर्वसाधारण मानवासारखे आले. त्यांच्याकडे सर्व शक्ती होत्या. त्या त्यांनी कधीही विध्वंसासाठी वापरल्या नाहीत. त्याप्रमाणे आपण आपल्या प्रेमाने आणि आपुलकीने, आपण आपल्या मृत्यूतूनही बाहेर येऊ शकतो. आपण आपल्या शंका आणि गैरसमजुतीतून बाहेर येऊ शकतो. आपल्या विनाशक वृत्तीतून बाहेर येऊ शकतो आणि ही विध्वंसक स्वभाववृत्ती सहजयोग्यासाठी फार धोकादायक गोष्ट आहे. फक्त एकच आशा आहे, की आपल्याकडे सहजयोगी आहेत, ज्यांचे पुनरुत्थान झालेले आहे आणि एकच गोष्ट आहे, ते मी जाणते, की आपल्याकडे पुष्कळ सहजयोगी झालेले आहेत. ते हे जग बदलतील. हे जग बदलले पाहिजे. तुमची प्रगती चालू राहिली पाहिजे. तुम्ही अधिकाधिक प्रगती केली पाहिजे. तुम्ही मागे अधोगतीला जाता कामा नये. छोट्या छोट्या गोष्टी कशाही असोत त्याची चिंता करू नका. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. सर्व मानवजातीमध्ये परिवर्तन करणे ही ती जबाबदारी आहे. ते तुमचे नशीब आहे. तुम्ही किती लोकांमध्ये हे परिवर्तन केले? आणि तुम्ही किती लोकांना बदलले? स्त्री पुरुषांसाठी हे सर्व ठीक आहे. तुम्ही लोकांना बदलायलाच हवे. ते आहे तुमचे कार्य आणि ही शक्ती तुम्हाला येशूंपासून मिळाली आहे. तुम्ही त्या लोकांना बदललेच पाहिजे. सुखाच्या आणि आनंदाच्या नव्या जगात त्यांचे परिवर्तन झाले पाहिजे. यालाच आम्ही म्हणतो सहज निर्मल धर्म. जर तो घटित झाला, जर तो खरोखरच कार्य करू लागला तर विचार करा, की हे जग आपल्यासाठी किती सुंदर बनेल. प्रत्येक सहजयोग्याचे हे

कर्तव्य आहे, की या प्रकारच्या नव्या साहसामध्ये प्रवेश केला पाहिजे. किती लोकांना तुम्ही बदलू शकता? किती लोकांना तुम्ही एकत्र आणू शकता?

मला आशा आहे की पुढच्या वेळी तुम्ही जे आज आठ देशातील लोक आज यजमान म्हणून आहेत त्याच्या दुप्पट लोक आपल्याकडे असतील. तुम्हा सर्वांना माझे पुरेपूर प्रेम. एक महान दिवस आपली वाट बघत आहे. आता फक्त आपल्याला आपली जबाबदारी समजून घ्यायची आहे. मुख्य गोष्ट ही आहे आपण किती लोकांना निर्मल धर्मात आणले आहे? आपण किती लोकांचे पुनरुत्थान केले आहे? आणि हा आहे अभिलेख (नोंद). आपण काय आणि कशा आणि किती पूजेला उपस्थित होतात. आणि हे सर्व काही फार महत्त्वाचे नाही. पूजा फक्त तुम्हाला शक्ती देण्यासाठीच असतात आणि ऊर्जा देण्यासाठी असतात, पण ते तुमचे कार्य नाही आणि ते तुमचे काम नाही. तुम्ही पूजेपासून तुमच्या कार्यासाठी आवश्यक असलेली सर्व शक्ती मिळवू शकता, पण जर ती शक्ती तुम्ही वापरली नाही तर उपयोग काय? आता ते सर्व तुमच्यावर सोडते. तुमचे पुनरुत्थान झालेले आहे आणि ते दुसऱ्यांसाठी तुम्हाला करायचे आहे आणि हे फार फार महत्त्वाचे कार्य आहे कारण हा जो काळ आहे तो क्षोभ आणि विनाशाचा आहे.

तुम्ही तुमची जबाबदारी ओळखली पाहिजे. ही पृथ्वीमाता पहा. ती कशी तिची जबाबदारी जाणते. ती फक्त माती आणि चिखलापासून बनलेली आहे, पण तिच्याकडे पहा. ती किती जागरूक आहे, व्यवस्थित आहे आणि ती हे सर्व कशाप्रकारे घटित करते. ती किती दक्ष आहे. ती किती काळजी घेणारी आहे. जर प्रत्येक गोष्टीत तुम्हाला इतके आशीर्वादित केले तर ते तुम्ही दुसऱ्यांना देण्याचा विचार करता कां? बारा शिष्यांसह, ख्रिश्चन धर्म, मला म्हणायचंय जरी ते चांगले कार्य नव्हते (धर्मांतर) तरीसुद्धा पसरला गेला. इस्लाम, हे सुद्धा फार चांगले कार्य नव्हते, तरी तो धर्म पसरला. हे सर्व वाईट काम इतके पसरले तर सहजयोगाचे चांगले कार्य का पसरत नाही? ते पसरलेच पाहिजे. ते वेगवेगळ्या ठिकाणी पोहोचले पाहिजे. प्रयत्न करा आणि शोधून काढा, कुठे गेले पाहिजे त्याबद्दल बोलले पाहिजे. इतरांचे भले

केले पाहिजे.

वेळ फार कमी आहे. जर तुम्ही विचार केलात तर मला वाटते, की वेळ आणि आपण जे प्रचारार्थ पुढे जात आहोत त्याचे प्रमाण योग्य नाही. आपल्याला अतिशय वेगवान झालेच पाहिजे. आपल्याला अधिक पुढे गेले पाहिजे. आपल्याला पुष्कळ, भरपूर सहजयोगी निर्माण केले पाहिजेत. आपल्याला सतत आणि तळमळीच्या प्रयत्नातून ते केले पाहिजे. परंतु हा दुय्यम विषय आहे. जाता जाता, सहजयोग अगदी जाता जाता केला जातो आणि हेच कारण आहे की आपण आपल्या जबाबदारीत चुकत आहोत. आपण धरतीमातेपासून शिकलं पाहिजे. कदाचित तुम्ही म्हणाल, 'श्रीमाताजी आम्ही तुमच्यासारखे कसे होऊ शकतो? सरतेशवेटी तुम्ही आदिशक्ती आहात' आणि पुष्कळसे लोक तसे म्हणतात. तुम्ही आदिशक्ती असल्यामुळे एका बोटाने तुम्ही सर्व पुढे नेऊ शकता, तर ते मी का न्यावे? मी असे का करावे? काय गरज आहे? प्रतिबिंब स्वरूपात तुम्ही माझ्यासारखेच आहात. जसे प्रतिबिंब म्हणून पृथ्वीमाता म्हणजे मी आहे. तुमच्यामधील त्या सुंदर निर्मितीमध्ये तुम्ही जगाच्या गरजेसाठी फार भावूक व्हायला हवे, तर जगाची काय गरज? आज जर तुम्ही अपयशी झालात तर सर्वच गोष्टी अपयशी ठरतील, पण काही थोडेजणच इथे असतील म्हणून सहजयोग प्रसार ही तुमच्यासाठी गरज आहे. हे प्रेम फक्त तुमच्यासाठी नाही. फक्त तुम्हीच त्याचा आनंद घेता कामा नये. या जगातील जास्तीत जास्त लोकांनी त्याचा आनंद घेतला पाहिजे, म्हणून आज तुम्हाला ठरवले पाहिजे, की आदिशक्तीची मुले म्हणून आपण सर्वत्र गेले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक कानाकोपऱ्यात आपण ओरडले पाहिजे. मोठ्याने सांगितले पाहिजे की आपण ज्या काळात रहात आहोत तो काळ काय आहे? आणि सहजयोगी म्हणून त्यांची जबाबदारी त्यांना सांगितली पाहिजे. तुम्ही इथे आहात त्याला काहीतरी कारण असले पाहिजे. जसे मला सुरुवातीला सहजयोगी विचारायचे, 'श्रीमाताजी, माझे हे मागील जीवन आहे का? गेल्या जन्मी मी शिवाजी होतो का?' मी म्हणाले, 'त्याचा उपयोग काय?

तुम्ही गेल्या जन्मी कोणीही असा, पण आज तुम्ही जे आहात ते फार उच्चस्थानी आहात, ते समजून घेतले पाहिजे.' तुम्ही समजा नेपोलियन, एखाद्या राजाप्रमाणे किंवा राणीप्रमाणे कुठेतरी असाल तर काय झालं? त्यांनी काय केले? त्यांनी कोणाची कुंडलिनी जागृत केली का? त्यांच्याकडे कोणती शक्ती होती का, जेणेकरून त्यांनी आत्मसाक्षात्कार दिला आहे? काही सुफी पंथाचे लोक होते, त्यांनी कोणालाही आत्मसाक्षात्कार दिला नाही. पुष्कळशी संत मंडळी होती त्यांनी कोणालाही आत्मसाक्षात्कार दिला नाही. मोहंमद साहेबांनी, गौतम बुद्धांनी, श्री येशूंनी कोणालाही आत्मसाक्षात्कार दिला नाही. कृष्णाने कोणाला दिला नाही, रामाने कोणाला दिला नाही. अद्याप कोणीही दिला नाही, परंतु तुम्ही ते करू शकता.

ते कार्य तुम्ही करू शकता आणि कुंडलिनीबाबत प्रत्येक गोष्ट तुम्ही जाणता आणि ती फार मोठी गोष्ट आहे कारण तुम्ही आदिशक्तीची मुलं आहात म्हणून तुम्ही इथे आलेले आहात आणि तुमची आई इथे आहे. माझ्यासाठी ही फार फार भाग्याची गोष्ट आहे, की तुम्ही इथे आहात. तुम्हा सर्वांचा मला अभिमान आहे. पुन्हा पुन्हा तुम्हाला मला सांगावेसे वाटते, की हे कार्य तुम्ही जलद गतीने करा. आपल्याला अति वेगाने पुढे जायचे आहे आणि पुष्कळ लोक सहजयोगामध्ये आणा. हे बळजबरीने म्हणायला मला फार कठीण आहे. तो काही माझा स्वभाव नाही. ते तुम्ही जाणता. मी क्रोधित होऊ शकत नाही. मी रागावू शकत नाही. मी काही एक गोष्ट तुम्हाला बळजबरीने सांगू शकत नाही. जर तुम्ही चुकलात तर एकच गोष्ट असू शकते, की तुम्ही मला निराश केले आहे. याचा अर्थ असा यापेक्षा कोणतीही गोष्ट कमी दर्जाची नाही. जर तुम्हाला ते करावेसे वाटत नसेल तर मी तुम्हा सर्वांना विनंती करते, की तुम्ही आज शपथ घ्या, की तुम्ही सहजयोगाचा प्रचार-प्रसार कराल आणि सहजयोगाबद्दल बोलाल आणि सहजयोग जाणून घ्याल.

आता एक महान गोष्ट घडली आहे. ती मला जाणवली आहे आणि त्याबद्दल मी फार आनंदी आहे, की सहजयोगी मंडळी सहजयोगाबद्दल फार

जबाबदार आहे. असेही त्यांना वाटते, की हा ज्ञान प्रकाश त्यांना जिकडे-तिकडे प्रसारित करायचा आहे. सहजयोग सर्वत्र प्रसारित करण्याची त्यांची आंतरिक इच्छा आहे. सर्वप्रथम ते असे असले पाहिजे, की त्यांनी आधी आत्मा बनले पाहिजे. यापूर्वीसुद्धा असे काही लोक होते. प्रत्यक्षात त्यांनी आत्मा शोधला नव्हता, परंतु ते सहजयोगी बनले होते. मला आश्चर्य वाटते तुमच्यापैकी काही लोकांनी, की जे फार पुढे गेले आहेत त्यांची मी कधीच अपेक्षा केली नाही, पण अचानक तुम्ही ऐकता की अमुक एक व्यक्ती ही इकडे, तिकडे गेली आणि हे कार्य केले आहे. ते काम केले आहे. म्हणजे जेव्हा तुम्ही सत्याच्या साम्राज्यात येता तेव्हा मी जाणू शकत नाही की तुम्ही कोणते तत्त्व प्रथम स्वीकारलेले आहे. तो तुमचा समजुतदारपणा आहे, पण एक गोष्ट तुम्हाला समजली आहे, की तुम्ही परमेश्वराशी निश्चित जोडले आहात. काही लोकांना खूप अनुभव आले आहेत, काहींना सौम्य. त्यांच्यापैकी बहुतेक लोकांना पाहते, की त्यांनी स्वत:वर विश्वास ठेवावयास सुरुवात केली आहे. स्वत:ला समजून घेतले आहे आणि स्वत:बद्दल आत्मविश्वास बाळगला आहे.

या पृथ्वीचे, या विश्वाचे बंधमोचन (मुक्ती) मला खात्री आहे होणारच. जर तुम्ही सर्व लोकांनी ही जबाबदारी घेतली तरच ते शक्य आहे. या जबाबदारीला काही समस्या आहेत. ज्या आपण जाणून घेतल्या पाहिजेत. जेव्हा तुम्हाला तुम्ही जबाबदार आहे असे वाटते तेव्हा त्या जाणून घेतल्या पाहिजेत. ते तुमच्या स्वाधीन नाही. ही एक गोष्ट आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे जी तुम्ही जाणून घेतली पाहिजे, की इतर पुष्कळ शक्ती कार्यरत असतात. कित्येक देवदूत, गण तुमच्यासोबत असतात, तर तुम्ही एकटे असत नाहीत. म्हणून विचार करा, तुम्ही एखादी गोष्ट करतांना कदाचित अहंकारी बनाल, जे काही तुम्ही कराल, तेव्हा असे बोलणे सर्वात चांगले की 'मी काही करत नाही. परमेश्वरी शक्ती सर्व घटित करीत आहे.'

## सामुदायिकरित्या ध्यानावस्था

समस्या ही आहे, की तुम्ही लोक समजून घेत नाहीत, की

सहजयोगासाठी तुम्हाला जबाबदार असले पाहिजे. दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देण्याबद्दल जबाबदार असले पाहिजे आणि ध्यानासाठी जे कार्यक्रम असतात त्या सर्व कार्यक्रमांना तुम्ही हजर असले पाहिजे. सामुदायिक ध्यानामुळे तुम्ही यथायोग्य होतात. जर तुम्ही सामुदायिक ध्यानासाठी नियमितपणे गेलात तर तुमचे सर्व प्रश्न सुटतील. मी तुम्हाला वचन देते.

सामुदायिकरीत्या ध्यानस्थितीमध्ये तुम्ही असले पाहिजे कारण मी सर्वांच्या सामुदायिकतेमध्ये आहे आणि जेव्हा तुम्ही सामुदायिकरीत्या ध्यान करता तेव्हा तुम्ही माझ्या अगदी जवळ असता. जर तुमच्याकडे काही कार्यक्रम इ. असेल तर त्याबरोबर तुम्ही थोडेसे ध्यान करा. कोणत्याही कार्यक्रमासाठी ध्यानाला नेहमीच प्राधान्य द्या. तुम्ही भजन गाता, जेव्हा ते संपतील तेव्हा किंवा सर्व काही पूर्ण झाले की नंतर तुम्ही ध्यान करा. जेव्हा मी तुम्हाला एखाद्या गोष्टीचा आग्रह करते तेव्हा तुम्ही जाणलेच पाहिजे, की ते सत्य असलेच पाहिजे. जे मी तुम्हाला सांगत असते, हे पूर्णपणे पायाभूत समजून जरी ते तुम्हाला काहीसे भौतिक वाटते तरी ते फार महत्त्वाचे आहे. ते प्रेम जास्त परिणामकारक असते, जेव्हा ते सामुदायिकरीत्या असते.

## तुम्ही किती देता त्याची गणती करा

सर्वात महत्त्वाचे हे आहे, की तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे आणि तेच तुमचे जीवन आहे. जर कमळ असेल तर फुलेल, परंतु त्याने सुगंध दिलाच पाहिजे. जर या कमळाला जबाबदारी आहे, तर तुम्हा लोकांबद्दल काय? मी असं म्हणत नाही की श्री येशूंसारखे फासावर जा. तुम्ही तुमचे जीवन आनंदी बनवा. आता तुमच्याकडे शांती, संतुलन, स्थिरता आहे, तर अशावेळी तुम्ही सहजयोगाचा प्रसार केला पाहिजे. तर ते आता तुमचे कार्य आहे. केवळ तुमची नोकरीच महत्त्वाची नाही, तर हे महत्त्वाचे आहे, की तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार देता? ते फार फार कठीण आहे कारण लोकांनी पूर्वीच्या सर्व अवतारांच्यावेळी गोंधळ घातला आहे. सर्व मोठे सुफी संत आणि इतर संतमंडळींबद्दल गोंधळ घातला आहे,

तर कमीत कमी तुम्ही तसे करणार नाही. म्हणून तुम्ही कोणाला आत्मसाक्षात्कार देऊ शकता. कोणाला सहजयोगाबद्दल सांगू शकता. कृपया याचा विचार करा, तुम्हाला त्याचा प्रचार-प्रसार करावयाचा आहे. मी आशा करते की पुढच्यावेळी 'पुष्कळ लोकांना सहजयोग दिला आहे' हे तुमच्याकडून ऐकेन आणि श्री येशूंच्या सुळावर चढवण्याच्या गोष्टीला (त्यांच्या महान त्यागाला) हे एक मोठे समर्थन असेल. त्यांच्या जन्मासाठी, त्यांच्या या पृथ्वीवरील अवतरणासाठी, त्यांच्या आज्ञेसाठी ते एक समर्थन असेल. जेव्हा तुम्ही आत्मसाक्षात्कार देता तेव्हा ते आज्ञा पार करतात आणि ते पलीकडे जातात तेव्हा ते सहस्रारामध्ये असतात.

सहजयोगामध्ये प्रत्येक गोष्ट तुम्ही समजू शकता. ती समजणे अगदी फार सोपी गोष्ट आहे. सहजयोग समजण्यासाठी अत्यंत साधी सोपी गोष्ट आहे. परंतु आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही आजुबाजूला गेलं पाहिजे आणि किती लोकांना आत्मसाक्षात्कार देऊ शकता ते पाहिलं पाहिजे. सर्व काही ठीक आहे. तुमचे सर्व पूजापाठ ठीक आहेत. तुम्ही पूजा करता ते पण ठीक आहे. परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे, की किती लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार दिला आहे. हे समजून घ्यायचे आहे की किती जणांनी लोकांना हे ज्ञान दिलं आहे. विशेषकरून स्त्रियांना, आत्मसाक्षात्कार देण्यासाठी स्त्रिया काहीशा कमी पडतात. त्या पुष्कळ कार्य करू शकतात. मला माहीत आहे त्या करू शकतात कारण मी सुद्धा एक स्त्री आहे, परंतु काही असो मला असे आढळून आले आहे, की सहजयोगात स्त्रिया त्या पातळीपर्यंत आलेल्या नाहीत. त्या पुष्कळ काही करू शकतात. अगदी पुष्कळ. परंतु त्यांना त्यांच्या जीवनाचं महत्त्व अजून समजत नाही. तुम्ही अत्यंत महत्त्वाचे आहात. ज्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला असे किती लोक आहेत? पुष्कळ सुफी संत होते त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला होता. त्यांनी काव्य रचले आणि ते संपले. पुष्कळ संत होऊन गेले. त्यांनी पुष्कळ कार्य केले आणि पुष्कळशा काव्यरचना लिहिल्या. भारतामध्ये पुष्कळ संत आहेत त्यांनी ते लिहिले. लोक त्यांचे काव्य वाचतील पण काही

होणार नाही. तुमच्याजवळ आत्मसाक्षात्कार देण्याची कला आहे. तुम्ही कुंडलिनी जागरण जाणता. तिच्याबद्दल आपण सर्व काही जाणता. आता पुढे व्हा आणि लोकांशी बोला.

जेव्हा मी सहजयोग प्रारंभ केला तेव्हा मी एकटी होते आणि मी एक स्त्री आहे. मी एक स्त्री आहे. तुमच्याबद्दल काय? तुम्हा सर्वांना आता एक आव्हान आहे. तुम्ही किती लोकांना सहजयोगी बनवलेत? तुमच्या कुटुंबातील सभासदसुद्धा अद्याप सहजयोगी नाहीत. तुमची कन्या नाही, तुमचा पुत्रही नाही, तर येशूंच्या वैभवाची गाणी गाण्याचा उपयोग काय? जर तुम्ही त्यांच्या वैभवाचे गान (कवने) गात असाल तर तुम्ही लोकांची आज्ञा पार केलीच पाहिजे. ते आपल्यामध्ये इतक्या उच्च पदावर आहे. परंतु तुम्ही त्यांना कधीही मान दिला नाही. तुम्ही पार झालेले, उच्च पदावर असलेले असे व्यक्तिमत्त्व आहे. तर इतर का नकोत?

आता आजच्या पूजेपासून तुमच्याकडे कितपत निश्चय आहे ते पाहू या. तुम्ही ते जाणून घेतलेच पाहिजे की देवी, तुमच्या आदेशानुसार तुमच्याकडे येत नाही तर ती स्वतःहून येते. तिची स्वतःची अशी वेळ असते. जर तुम्ही लोक बहुसंख्येने खरोखरचे संत बनलात आणि इतरांना संतत्व दिले तर मी तुमच्यासाठी आहे. मी तुम्हाला उपलब्धसुद्धा आहे. तुम्हाला माझं चैतन्य आहे. तुम्ही माझी पूजा करू शकाल. या सर्व गोष्टींना मी उपलब्ध आहे, परंतु त्यासाठी तुम्ही पात्र आहात आणि त्यासाठी तुम्हाला मी अधिकार दिला आहे. त्यासाठी तुम्हाला सहजयोग केला पाहिजे. जर तुम्ही सहजयोग प्रसार करीत असाल जर तो तुम्ही दुसऱ्यांना देत असाल, तेव्हाच फक्त देवीचे परम चैतन्य स्वीकारण्यासाठी तुम्ही खरोखरच पात्र असाल.

काही देशांमध्ये हे कार्य इतकं शक्तिशाली आहे, तर ते तुमच्या देशात, तुमच्या नात्यागोत्यात, मित्रांमध्ये, तुमच्या आजूबाजूला का होत नाही? ते शक्य आहे, म्हणून आज रात्री तुम्ही निश्चित ठरविले पाहिजे, की हे ज्ञान दुसऱ्यांना देण्यासाठी तुम्ही तुमचे जीवन समर्पित करणार आहात. ते फार आनंद देणारं आहे आणि सहजयोगाबद्दल बोलणे हे आनंददायी आहे.

तुम्ही इतक्या लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे. असं मला कोणी लिहीत नाही. सहजयोगाचा प्रसार सिद्धीस नेण्यास ते कसे समर्थ आहेत. त्याबद्दलही ते लिहीत नाहीत. कोणीही लिहीत नाही आणि ते फार आश्चर्यकारक आहे. ते तुम्ही मला सांगायला पाहिजे.

## टीकाकार

जेव्हा मला आढळतं एक सहजयोगी इतर सहजयोग्यांवर टीका करीत असतो, मला आश्चर्य वाटते तुम्ही एकाच विराटाचे सारसर्वस्व असता, तर तुम्ही टीका कशी करू शकता? एक डोळा दुसऱ्या डोळ्यावर टीका करतो. मी समजूच शकत नाही. मी टीका करू शकते बरोबर! पण तुम्ही का करता? तुम्ही एकमेकांवर टीका का करता? तुम्ही एकमेकांवर प्रेम करायला हवे. श्री येशू हे तीन वेळा म्हणाले. हे यापूर्वी १०८ वेळा म्हणाले असेन, की तुम्ही एकमेकांवर प्रेम केले पाहिजे आणि तो एकमेव करुणा व्यक्त करण्याचा मार्ग आहे. ज्यामुळे तुम्ही करुणा व्यक्त करता. जर मी तुम्हाला कधी प्रेम दिलं असेल तर इतरांबरोबर तुम्हाला सबुरी ठेवली पाहिजे आणि दुसऱ्यांबरोबर तुम्ही प्रेम करा. कधी कधी मी लोकांना लाडीगोडीने सांगते आणि मला आढळून येते तेच लोक ताबडतोब इतरांबद्दल कसल्यातरी प्रकारची, दुसऱ्यावर केलेली टीका किंवा त्या प्रकारचं काही तरी घेऊन येतात. मूळ गोष्ट अशी आहे आपली करुणा जर ती आपल्यातून वाहत असेल तरच आपल्या श्रीमाताजींकडून आपण करुणा प्राप्त करू शकतो.

इतरांवर टीका करणे फार सोपे आहे. 'इतर चुकीचे आहेत' हे बोलणे अगदी सोपे आहे, पण आपल्यामध्ये काय चुकीचे आहे ते पाहणे अधिक सोपे आहे. तुम्ही दुसऱ्यांना सुधारू शकत नाही, पण तुम्ही फक्त तुम्हालाच सुधारू शकता. ते याप्रमाणे सोपे आहे. जसे एका कन्येने एका व्यक्तीशी विवाह केला आणि आता कल्पना करा त्या दोघांमध्ये काही समस्या निर्माण झाली, तर तुम्ही तुमच्या कन्येला सांगणे हे दुसऱ्या व्यक्तीला सांगण्यापेक्षा सोपे आहे कारण ती तुमची स्वतःची मुलगी आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला

स्वत:ला सुधारणे हे इतर लोकांना सुधारण्यापेक्षा सोपे आहे. जर तुम्ही तुमच्या अहंकाराकडे पाहू शकलात, की जो हे सर्व थांबवतो तर कोणाचा फायदा आहे? कोण अशी व्यक्ती आहे ज्यांना कल्याण प्राप्त होते आणि सहजयोगाचे आशीर्वाद प्राप्त होतात. तुम्ही जाणले पाहिजे, की तुम्ही एकमेकांशी भांडून सहजयोगाची शक्ती कमी करीत आहात. एकमेकांवर रागावून तुम्ही सहजयोगाची शक्ती कमी करता आहात. कल्पना करा जर शक्तीप्रवाह (नाड्या) एकमेकांशी भांडू लागले तर तुम्ही तुमची ऊर्जा कशी प्रवाहित कराल? म्हणून प्रथम तुम्ही तुमचे शक्तीप्रवाह (नाड्या) यथायोग्य करा आणि समजून घ्या. आपण सर्व शक्तीप्रवाह एकत्र केले तर कार्य अधिक चांगले होणार आहे. म्हणून आपण सर्वांनी एकत्रित असले पाहिजे. ती एकत्रितपणाची जाणीव तुम्हाला समजली पाहिजे. जेव्हा सामुदायिकतेला त्रास होतो तेव्हा तुमचे कोणते चक्र पकडते? तुम्ही सांगू शकाल? विशुद्धी आणि सहस्रार, कारण मी सर्व देवतांची (सामुदायिकता) विराट आहे. सर्व चक्र मेंदूमध्ये (सहस्रारात) आहेत आणि तिसरे म्हणजे जेव्हा हे काही पात्रतेच्या पलीकडे जाते, तेव्हा तुमच्या हृदयावर पकड येते आणि विशुद्धी, सहस्रार आणि हृदय यांच्या एकीकरणास सुरुवात होते. जर डावी किंवा उजवी आज्ञा यापैकी कोणतीही एक यांच्यात सामील होते तेव्हा तुमच्यात एकादश रुद्रांची वाढ होते. (एकादश रुद्राचे आज्ञा चक्रावरील स्थान पकडते)

## पसरवणारे हात

सार्‍या विश्वाची अमेरिका ही विशुद्धी आहे. म्हणून हे फार महत्त्वाचे आहे की जे लोक इथे पदाधिकारी आहेत. त्यांनी विशुद्धीच्या सर्व शक्ती जाणून घेतल्या पाहिजेत. शिवाय त्या शक्तीचे कसे रक्षण केले पाहिजे आणि त्या शक्ती सर्व जगभर कशा विस्तारीत केल्या पाहिजेत ते जाणून घेतले पाहिजे. तुमच्या या दोन्ही हातावरसुद्धा विशुद्धी चक्र आहे. त्यांच्या सहाय्याने तुम्हाला सहजयोग पसरवायचा आहे. तुम्ही वेगवेगळ्या भागात गेलं पाहिजे. देशात गेले पाहिजे आणि लहान लहान खेडेगावात गेले पाहिजे

आणि सहजयोग पसरवला पाहिजे. त्या हातामध्ये तुम्ही सर्वप्रथम थंड चैतन्याच्या लहरी पाहायच्या याचा अर्थ तुम्हाला विश्वाची परमेश्वरी शक्ती तुमच्या जीवनामध्ये जाणवत आहे. हेच ते सामुदायिक, वैश्विक प्रेम जे तुमच्या हातामध्ये जाणवते आणि तुम्हाला शिकविते.

## संभाषण

आता तुम्ही जे करत आहात ते तुमच्याकरता हितकारक नाही. तथाकथीत जे तुमचे म्हणता. प्रथम तुम्ही लहान बालक होतात. अगदी छोटीशी बाब आता मात्र तुम्ही सामुदायिक मधले एक आहात, म्हणून तुमच्याकरता आता तुम्ही काही करायचे नाही, तर त्या सर्व सामुदायिक शक्तीसाठी. तुम्ही एका जाणिवेतून मोठे होत आहात. ती जाणीव म्हणजे तुम्ही आता विराट बनणार आहात. तुमची नोकरी, तुमचे धन-मालमत्ता, तुमची पत्नी, तुमचे पती, मुले-बाळे, आई-वडील ही सर्व नातीगोती असले विचार संपलेले आहे. तुम्ही सहजयोगाचा विचार केला पाहिजे. तुमच्यापैकी प्रत्येकजण अगदी कार्यक्षम आहे. आणि त्याकरता तुम्हाला मोठे केलेले आहे. कोणत्याही मार्गाने, तुम्हाला जो आवडतो, तुमच्या कार्यक्षमतेप्रमाणे ते करत रहा. अगदी पूर्ण समर्पणामुळे ते तुम्हाला प्राप्त होईल. समर्पण एक गोष्ट आहे. पूर्ण समर्पणामुळे, केवळ त्या मार्गानेच तुम्ही पुढे मोठे होणार आहात. सर्व राष्ट्रांना, सर्व लोकांना सर्वत्र हा महान संदेश सांगा की पुनरुत्थानाची वेळ आता आली आहे. आता या क्षणी तुम्ही ते सर्वजण ते करण्यासाठी पात्र आहात.

सहजयोगाविषयी बोलत रहा. परंतु सहजयोगी मंडळी थोडी लाजाळू आहेत. एकदा मी विमानाने जात होते आणि एक महिला अतिशय उष्ण प्रकृतीची होती, म्हणून मी तिला विचारले की 'तुम्ही कोणत्या गुरुकडे जाता?' तिने मला नाव सांगितले. मला आश्चर्य वाटले. अध्यात्माबद्दल तिला काहीच माहिती नव्हती. या लोकांकडे घरे, मंदिर आणि सर्व काही असते. ती मला तिच्या गुरुबद्दल स्तुती ऐकवत होती. मी विचार केला, 'ही

महिला अगदीच निर्लज्ज आहे.' तिच्यामध्ये असं काहीच आध्यात्मिक नव्हतं. ती इतकी उष्ण प्रवृत्तीची होती आणि अध्यात्माबद्दल ती बोलत होती, परंतु सहजयोगी असे करत नाहीत. मला आश्चर्य वाटते अध्यात्माबद्दल सहजयोगी का बोलत नाहीत?

परंतु एके दिवशी मी कोणाबरोबर तरी मंडईत गेले होते. माझ्याबरोबर एक सहजयोगी होता. मला आश्चर्य वाटलं, त्यांनी माझ्याबद्दल लोकांना सांगायला सुरुवात केली. त्याने सर्वांना आत्मसाक्षात्कार देण्यास सुरुवात केली आणि त्याबद्दल त्याला आनंद वाटला. प्रत्येक ठिकाणी, जिथे जिथे तुम्ही जाल तिथे शेजारी, मंडईत जा, कोणत्याही ठिकाणी तुम्ही जायला पाहिजे आणि त्याबद्दल सांगायला पाहिजे. ज्याप्रमाणे ख्रिस्ती लोक श्री येशूंची भक्तीगीते गातात. त्याप्रमाणे आपल्याकडेसुद्धा लोक इतर लोकांना सांगण्यासाठी भजने वगैरे गोष्टी आहेत, ती त्यांना आपण ऐकवली पाहिजे. तर तुम्ही इतके लाजाळू का? हा लाजरा स्वभाव सहजयोगाला मदत करू शकत नाही म्हणून कृपया तुम्ही इतरांना आत्मसाक्षात्कार देण्याचा प्रयत्न करा. तुमच्याकडे शक्ती आहे. तुमच्यात श्रद्धा आहे. मला वाटतं तुमच्यामध्ये श्रद्धेची कमी आहे. ते काही असो अगदी थोडे लोक आहेत जे बाहेर पडतात आणि कार्य करतात. इटलीत मी पाहिल आहे. ऑस्ट्रियामध्ये आणि ऑस्ट्रेलियातसुद्धा सहजयोग पुष्कळच पसरला आहे कारण त्यांची श्रद्धा अशी आहे, की आम्ही ते इतरांना दिलं पाहिजे. जे आमच्याकडे आहे ते लोकांमध्ये वाटले पाहिजे.

आज समस्या फार गुंतागुंतीची आहे. तुमची पायाभूत रचना ही फसव्या लोकांमुळे किंवा इतर गोष्टी ज्या आपण स्वीकारल्या आहेत त्यामुळे बिघडली आहे. समाज, कौटुंबिक जीवन, व्यसने, वाईट सवयी अशा कित्येक गोष्टी आपल्यामध्ये पसरल्या आहेत आणि असं काही जाळं गुंफलं आहे त्यातून बाहेर येणं शक्य नाही. तिथून बाहेर येण्याचा एकच मार्ग आहे.

एकदा लहान असतांना पक्ष्यांबद्दल एक गोष्ट मी वाचली होती. एक जाळे पसरवून टाकले असते आणि त्या जाळ्यामध्ये पुष्कळसे पक्षी पकडले

गेले आणि त्यांना कळून चुकले की आपण चुकलो आहोत. आपल्याला चुकीचे मार्गदर्शन झाले आहे. त्यांनी थोडं धान्य पाहिलं, त्यामुळे त्यांची दिशाभूल झाली. आता त्यांना त्या जाळ्याच्या बाहेर जाणे अगदी अशक्य होते. एकही व्यक्ती बाहेर पडू शकत नाही. जर एका व्यक्तीने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर इतर लोक त्यामध्ये अधिक अडकतील आणि त्या एकाची परिस्थिती अधिक बिकट होते. तर काय करावे? तर सर्वजण एकोप्याने म्हणाले, 'आपण सर्वजण जाळ्यासकट का उडून जाऊ नये? आणि नंतर आपल्या चोचीने हे जाळे तोडून टाकू, मग सर्वजण मुक्त होऊ. परंतु प्रथम मात्र इथून बाहेर गेलच पाहिजे. आपण सर्वजण आपली शक्ती एकत्रितपणे लावू या आणि सर्वांनी बाहेर उडू या.' आणि त्यांनी सर्वांनी त्यांचे पंख एकत्रितपणे पसरवले आणि उड्डाण केले. ते तिथून गेले आणि सर्व मुक्त झाले. आज सहजयोग ही याच प्रकारची युक्ती आहे. एक व्यक्ती ते घटित करू शकत नाही. ते अगदी अशक्य कोटीतले असते. जर एकाच व्यक्तीला ते करायचे असेल तर ती अशक्यच गोष्ट आहे. एकट्याला जावं लागेल आणि गुहेमध्ये कायम स्वरूपात रहावे लागेल. कोणी एक व्यक्ती श्री येशूंप्रमाणे सर्व शक्तीनिशी या पृथ्वीवर आली तर त्याला फासावर चढवले जाईल आणि सर्व संपून जाईल. तीन वर्षांनी त्यांना क्रुसावर चढवण्यात आले. कोणी त्यांना समजू शकले नाही. त्यांना कोणीच समजून घेतले नाही. आपण ढोंगी लोकांच्या प्रयत्नातून आणि आपल्या मूर्खपणामुळे आपण म्हणू शकतो की आपण चुकीच्या गोष्टी केल्यामुळे, चुकीच्या मार्गदर्शनामुळे ज्या सर्व प्रकारच्या उत्क्रांतीच्या विरोधात असलेल्या सर्व समस्यांमुळे निर्माण झालेले, जाळ्याच्या बाहेर पडण्यासाठी आपल्याला पुष्कळ लोक हवे आहेत. अशी एक परिपूर्ण चांगली संघटित शक्ती बनली पाहिजे, की ज्यामुळे समाज उच्चस्तरावर उचलला जाईल म्हणजे तुम्ही खरोखरच या बंधनाच्या वेढ्यातून मुक्त व्हाल.

काही लोकांना वाटतं, की ते लोक सहजयोगामध्ये फार उच्च पातळीवर आहेत, पण ते तसे नसते, पण तसे असू शकत नाही. तुम्ही काय आहात?

याचा विचार केलात तर तुम्ही हरवून बसाल. तुम्हाला जे करायचे आहे?
याचा विचार केलात तर तुम्ही हरवून बसाल. तुम्हाला जे करायचे आहे, मी काय केले आहे? ते तुम्ही समजून घेतले पाहिजे. तुम्ही किती लोकांना आत्मसाक्षात्कार दिला आहे? त्याबद्दल किती लोकांशी बोललात? सहजयोगाबद्दल बोलण्यासाठीसुद्धा लोक लाजतात. कोणालाही सहजयोग काय आहे ते सांगणार नाहीत. त्यांना त्यांची लाज वाटते. त्यांना शेकडो मित्र असतील, ते शेकडो मित्रांना भेटतील तरी त्यांना सहजयोग काय ते कधीच सांगणार नाहीत. ते त्यांना सांगण्याची लाज वाटते. त्यांना मेजवानीला जाण्यासाठी काही हरकत नसते. इतर मद्यपान करत असतील तेव्हा ते म्हणतात, 'ठीक आहे, मी मद्यपान करत नाही.' परंतु ते असं म्हणणार नाही 'मी सहजयोगी आहे. मी मद्यपान करू शकत नाही.' आणि मूळ स्वभाव म्हणून पीत नाही. ते असं बोलणार नाहीत हा तिसरा मुद्दा आहे. प्रत्येकाने घोषणाच केली पाहिजे. तुम्हाला तुमच्यावर विश्वास असला पाहिजे आणि घोषणा केलीच पाहिजे. सर्व संतांनी घोषणा केली म्हणून त्यांना मारण्यात आले. तुम्हाला माहीत आहे. सॉक्रेटीसला कसे विष दिले गेले? काही हरकत नाही. तुम्हाला आता कोणीही ठार मारू शकणार नाही. मी म्हणते म्हणून ते स्वीकारा. परंतु तुम्ही घोषणा केलीच पाहिजे, पण ती घोषणा सहजयोगाबद्दलच्या पूर्ण श्रद्धेने आणि समजुतदारपणामुळे केलेली असली पाहिजे. सारे विश्व बदलून टाकणे हा उद्देश आहे. तुमच्या आंतरिक बदलामुळे सारे विश्व बदलून जाईल अन्यथा ती गुंतागुंतीची गोष्ट आहे. सहजयोग वेगळं कार्य करतो त्यामुळे सहजयोग अत्यंत गुंतागुंतीचा आहे.

माझ्या प्रवचनासाठी हजारो लोक येतात परंतु जेव्हा तुम्ही लोक भेटण्यासाठी येता तेव्हा फक्त चार ते पाच लोकच असतात कारण हे असे आहे की तुम्ही लोक एकमेकांना कळवण्यामध्ये कमी पडतात. एक सभ्य गृहस्थ मला भेटण्यासाठी आले आणि ते मला म्हणाले, 'माताजी, मी तुमच्या प्रवचनासाठी एकदा आलो होतो (फ्रांस किंवा इतर कोठेतरी) तुम्ही आमच्याशी बोललात त्यामुळे मी पूर्णत: मोहित झालो होतो. इतक्या मोहक

आणि मधुरतेने आमच्या मेंदूमध्ये तुम्ही सर्व कल्पना भरल्यात आणि तुम्ही इतक्या प्रेमळ आणि शांत होतात पण जेव्हा आम्ही सहजयोगामधील नेत्यांना भेटतो ते अगदी बुलडोझरसारखे असतात. त्यांना सामोरे गेलो तर ते लोक आमच्यावर बुलडोझरप्रमाणे येतात त्यामुळे नवीन लोकांसाठी सहजयोगात येणे हे अगदी अशक्य.' जर काही शक्ती असेल तर ती आहे परमेश्वरी शक्ती. जी तुमच्यामधून कार्य करत असते. तुम्ही फक्त त्या शक्तीचे साधन आहात आणि ते तुमच्यामधून कार्य करीत आहे. तेव्हा त्या शक्तीला कार्य करण्यासाठी तुमची साधने द्या. परंतु जर ते अहंकाराचे कार्य असेल आणि जे तुमच्याकडे येतात त्यांचे योग्य असे आगमन नसेल तरीसुद्धा तुम्ही अतिशय माधुर्यपूर्ण आणि प्रेमळपणे त्यांच्याशी असले पाहिजे. मला एकदा सांगण्यात आले, की सभागृहातसुद्धा त्या लोकांबरोबर काही जण अतिशय उद्धट होते आणि ते लोक माझ्या कार्यक्रमासाठी आलेले होते. यावरून असे दिसते, की अद्याप तुम्ही त्या पातळीवर आलेले नाहीत आणि ही आहे सहजयोग विरोधात असलेली वागणूक. तुम्ही प्रत्येकाबरोबर अतिशय प्रेमळ, फार फार माधुर्यपूर्ण आणि पुष्कळ सुज्ञ असलेच पाहिजे. प्रत्येकाला सहजयोगात येऊ द्या. सहजयोगात प्रत्येकाला बसू द्या. मी त्याची व्यवस्था करीन. मी त्यांची काळजी घेईन. ही एक गोष्ट आहे, की जी तुमच्यावर प्रतिक्रिया करते. तुमच्या सहजयोगाच्या स्वभावधर्मावर प्रतिक्रिया करते. जेव्हा तुम्ही दुसऱ्यावर रागावू लागता किंवा त्यांची खरडपट्टी काढता, ओरडता, वितंडवाद करता तेव्हा मला वाटतं तुम्ही कमी बोलणं फार चांगलं. त्यामुळे कमीत कमी जो तुमचा स्वभाव आहे त्याचे या पद्धतीने प्रकटीकरण होणार नाही. जरी तुमचा तसा स्वभाव असला आणि तुम्ही त्या स्वभावाला दाबले तर ते एका दबलेल्या बीजाप्रमाणे प्रतिक्रिया करते आणि तुम्ही ज्वालामुखीप्रमाणे बनू शकता. या साधनेमध्ये तुम्हाला एक गोष्ट शिकलीच पाहिजे की तुमच्या आतमध्ये जितकी शांतता तितके ते शक्तिमान. शांती ही अत्यंत शक्तिशाली गोष्ट आहे, जी आपल्याला प्राप्त झाली आहे. जर कोणी वादविवाद केला आणि कोणी बाहेरील व्यक्ती आली तर त्याबद्दल

तुम्ही शांत राहणे हेच चांगले. जर तुमच्याकडे सबुरी असेल तर तुम्ही त्याला हाताळू शकाल.

## सामुदायिक पुनरुत्थान

श्री येशूंचे पुनरुत्थान हे आता सामुदायिक पुनरुत्थान झाले पाहिजे. यालाच महायोग म्हणता येईल. सामुदायिक पुनरुत्थान झालेच पाहिजे आणि या सामुदायिक पुनरुत्थानासाठी सर्वप्रथम सर्व सहजयोगी मंडळींनी सामुदायिक राहिले पाहिजे. कुंडलिनी जागृतीच्या माध्यमातून तुम्ही पार होता. नि:संशय तुम्ही पार होता. तुम्ही सामुदायिकतेच्या क्षेत्रात जाता आणि तुम्ही तुमच्यामध्ये सामुदायिकतेला चोहीकडे पसरू दिली नाहीत तर तुम्ही खाली येता. कल्पना करा तुम्ही जेव्हा पंचमहाभूताच्या पलीकडील स्थितीमध्ये जाता तेव्हा तुम्ही सामुदायिक स्थितीमध्ये जाता. तेव्हा तुम्हाला जाणीव होते, की तुम्ही पूर्णत्वाचे आंशीक भाग आहात. जेव्हा त्या स्थितीवर तुम्ही जाता तेव्हा तुम्हाला समजते, की जेवढ्या इतर पेशी महत्त्वाच्या आहेत तेवढाच मी महत्त्वाचा आहे आणि इतर पेशींना माझ्यामुळे मदत होते आणि त्यांनी माझीसुद्धा धारणा केली पाहिजे. तिथे पूर्ण असे ऐक्य असले पाहिजे. तुमच्या आत्मसाक्षात्कारानंतर ही जाणीव येते जर तुम्ही ही जाणीव समजू शकला नाही की सामुदायिकतेची जाणीव फक्त एकमेव मार्ग आहे, की तुम्ही या क्षेत्रात राहू शकता अन्यथा तुम्ही बाहेर पडता. जर तुम्ही लहानशा विहिरीमध्ये राहण्यास सुरुवात केली तर त्यात तुम्ही तुमचे पतन कराल आणि तुम्ही तुम्हाला अधिकाधिक विशाल बनवण्यास सुरुवात केली तर तुम्ही उच्च पदावर जाल आणि परत तुमच्या बाधांबरोबर किंवा असं काही तरी त्याबरोबर राहाल. जेव्हा तुम्ही विचार कराल की मी या पूर्णत्वासाठी जगते तर त्या पूर्णत्वासाठी मी जबाबदार आहे. पेशींमध्ये केंद्रबिंदू निर्माण करण्यासाठी मी जबाबदार आहे. मी पूर्णत्वाची काळजी घेईन आणि जर मी पडलो तर इतरांनासुद्धा त्रास होईल म्हणून माझे पतन होणे हे माझे कार्य नाही कारण त्या बिंदूपर्यंत माझे पुनरुत्थान झालेले आहे. मी सामुदायिकतेच्या स्थितीमध्ये प्रवेश केला आहे. जिथे माझे अस्तित्व आत्मा

आहे. जो आता सामुदायिक झाला आहे आणि म्हणून तिथे मी असले पाहिजे. मी खाली पडता कामा नये आणि आत्मसाक्षात्कारानंतरसुद्धा मी पाहिले आहे, की लोक त्यांच्या कवचामधून बाहेर पडू शकत नाही. ते त्या कवचामध्येच राहतात. ते त्यांचे पंख पसरवत नाही आणि गाणी गातात, पण त्यांच्या कवचातून बाहेर येत नाहीत आणि उड्डाण करत नाही. ते तसे करू शकत नाहीत. ते त्यांच्या अतिशय लहान जीवनपद्धतीला चिकटून राहतात आणि प्रत्येक दिवशी ते अतिशय क्षुद्र मार्ग स्वीकारतात. तुम्ही सुटीच्या दिवशी जाता कारण तुम्हाला वेगळा असा सुटीचा दिवस हवासा वाटतो. का? हा आहे सुटीच्या दिवसाची वेळ पवित्र दिवस. जेव्हा तुम्ही इतर सहजयोग्यांबरोबर असता तेव्हा तुम्ही खरोखरच सुटीचा दिवस आनंदात घालवत असता. अन्यथा तुम्ही सुटीचा दिवस कसा आनंदात घालवणार? दुसरा कोणता मार्ग आहे? तुम्ही सहजयोग्यांबरोबर असणं हाच खरा सुटीचा दिवस आहे. म्हणून प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे, की तुमची सामुदायिकता अधिकाधिक वाढवली पाहिजे. जर तुम्ही तुमची सामुदायिकता वाढवली नाही तर तुम्ही केवळ टाकाऊ वस्तू आहात. सहजयोगासाठी तुम्ही एक हानीकारक निर्मिती आहात. मला सांगावयास खेद होत आहे, की तुम्ही तुमचे पतन कराल. असे लोक अगदी सुरुवातीला देखावा करतात आणि हळूहळू ते अधिकाधिक चांगले होऊ लागतात आणि एकदा का तुम्ही पूर्ण स्थितीत आलात भीती सोडून आणि एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेण्यास सुरुवात केलीत. त्यांच्याबद्दल कोणतीही आसक्ती न ठेवता, त्यांच्याबद्दल अपेक्षा न ठेवता फक्त आनंद घेऊ लागता आणि याप्रमाणे आपल्या शरीरातील सर्व पेशी काम करतात. जर ते कार्य करू शकतात तर आपण का नाही? आपल्याकडे बरीचशी अक्कल आहे. कमीत कमी आपल्याला असे वाटते, की तेवढा त्या पेशींकडे नसेल त्यापेक्षा अधिक शहाणपणा आपल्याकडे आहे. कमीत कमी हे अपेक्षित आहे कारण एका छोट्या पेशीपासून या स्थितीपर्यंत आपण इतकी उत्क्रांती केली आहे म्हणून तुम्ही आता परमेश्वराच्या निर्मितीचा दीपस्तंभ आहात. आता तुम्ही

सर्वोत्कृष्ट लोक आहात, तर आता का नाही होत? जेव्हा तुम्ही तुमचे पुनरुत्थान जी पहिली गोष्ट तुमच्याबाबतीत घडली ती समजून घेतली पाहिजे. आता तुम्ही व्यक्ती म्हणून नाही तर तुम्ही सामुदायिकतेचे अस्तित्व आहात. आता तुम्ही व्यक्ती म्हणून असणार नाही. या सर्व गोष्टी ज्या तुम्हाला वैयक्तिकरीत्या, धार्मिकरीत्या पवित्र बनवतात. त्या सर्व टाकून द्या कारण आता तुम्ही यापुढे व्यक्ती म्हणून नाही आहात. सर्व समस्या ज्या तुमच्याकडे येतात, ज्या तुमच्याकडे व्यक्तीगत म्हणून येतात त्या पूर्णत: निरुपयोगी, खोट्या, टाकाऊ आहेत. तुम्ही फक्त सामुदायिक समस्यांचा विचार करा आणि अशा लोकांचा मी आनंद घेते.

तुम्ही आता परमेश्वराच्या राज्यात प्रवेश केला आहे. तो तुमची काळजी घेणार आहे कारण तुम्ही तुमच्यामध्ये जी स्थिती प्रस्थापित केली आहे. ती तुम्ही सामुदायिक व्यक्ती आहात. त्यामुळे सर्व इतर गोष्टी आपोआप गळून पडतील. हळूहळू प्रत्येकजण याप्रमाणे आकार घेईल अगदी कठीण पद्धतीचे लोकसुद्धा सुधारलेले मी पाहिले आहे, परंतु तुमच्याबद्दल काय? प्रत्येकजण सुधारत आहे, तर तुमच्याविषयी काय? तुम्ही कुठपर्यंत आलेले आहात? तुमचा विश्वास इथपर्यंत आहे की तुम्ही आता ओळखू लागले आहात की मी परमेश्वराच्या राज्यात आहे. माझ्या प्रत्येक कृतीची तो काळजी घेत आहे. त्याच्या शक्तीने मला मार्गदर्शन मिळत आहे आणि त्याची मला जाणीव आहे. माझी जाणीव आहे, की मी परमेश्वराच्या राज्यात प्रवेश केला आहे. ते माझ्या सामुदायिकतेमधून व्यक्त होत आहे म्हणून सामुदायिकता हा सहजयोगाचा स्वभाव आहे आणि हेच त्यांनी समजून घेतले पाहिजे.

## विवेकबुद्धी

तुम्ही असे लोक आहात ज्यांनी कोणत्याही समाजाला घाबरता कामा नये. तुम्ही बाहेर आले पाहिजे. त्यांना शिकवलं पाहिजे. जे काही चांगलं आपण करणार आहोत ते तुम्हाला आवडो, की न आवडो ते संतांचे लक्षण आहे. जर तुम्ही कोणताही संत पाहिला तर ते जे काही चांगलं आहे ते, जे

काही चांगल करायचं आहे ते सांगण्यासाठी सर्वत्र गेले. हे संतांचे लक्षण आहे अन्यथा तुमचा संत कधी समाजात विरघळून जातो, कधी सहजयोगात तर कधी कोठेतरी अशा संतांचा उपयोग काय? मला एखादा संत सांगा की जो तुम्ही जाणता, ज्याने समाजाशी संघर्ष केला नाही. ज्यांनी समाजातील चुका अत्यंत उघड पद्धतीने आणि कोणतीही भीती न ठेवता दाखविल्या नाहीत.

सहजयोगासाठी हे फार महत्त्वाचे आहे की तुमच्यामध्ये धारिष्ट्य असायला हवे. जेव्हा तुम्ही तुमची विवेकबुद्धी विकसित करता तेव्हा ते घटित होते. अहंकाराच्या बाजूवर कोणत्या पद्धतीचा विवेक तुम्ही वाढवता? आणि तो कसा? तुमच्या उजव्या बाजूला सर्व देव लोक आहेत आणि तुमच्याभोवती सर्व देवदेवता आहे. तुम्ही समजून घेतले पाहिजे, तुम्ही जाणून घेतले पाहिजे, की ते काय करणार आहेत? कल्पना करा तुम्ही तुमचा मार्ग चुकलेला आहात, म्हणून इतर लोक जसे करतात तसे तुम्ही करता कामा नये. 'अरे! मी मार्ग चुकलेलो आहे, तर तिथे मी कसा जाऊ शकेन? मी काय करू शकेन?' आणि सरतेशेवटी तुम्ही काही मूर्खपणाचं काम करणार. हरकत नाही. तुम्ही याचा विचार केलाच पाहिजे. हनुमानांनी मला इथे काही तरी उद्देशाने का आणले असावे? तर आपण त्याचे अवलोकन करू या. ते स्वीकारा. जेव्हा तुम्ही त्या स्थितीचा स्वीकार करता तेव्हा देवता तुम्हाला सहकार्य करतात आणि मार्गदर्शन करतात. तुमच्या देवता घटित करतात ते स्वीकारा आणि ही स्वीकृती तुम्हाला तुमच्या अहंकारावर आश्चर्यकारक विवेकबुद्धी देईल. जे काही चुकीचे होते ते सर्व काही ठीक आहे, ते सुद्धा स्वीकारा. सरतेशेवटी परम चैतन्याचा भाग, जो आपण पाहिला पाहिजे. जर तुम्ही काही केलंत आणि परम चैतन्य कमी कमी झालं तर अर्थातच 'मी सहजयोगी आहे, मला माझे परम चैतन्य आणि माझी आत्मोन्नती फार महत्त्वाची गोष्ट आहे.' म्हणून उजव्या बाजूवर विवेकबुद्धी विकसित करण्यासाठी तुम्ही तुमचं ध्येय, तुमचं गंतव्यस्थान जाणून घेतलं पाहिजे. तुम्ही हे ही जाणलं पाहिजे तुम्ही कोणत्या मार्गावर उभे आहात.

तुम्हाला कुठे आणले आहे. आज तुम्ही कुठे आहात. आपण इतर लोकांसारखे नाही.

सहजयोग हा अत्यंत मौल्यवान हिरा आहे. तो तुम्ही प्रत्येक व्यक्तीला देऊ शकता. मी विमानतळावर अशा लोकांना पाहिलं आहे, की जे प्रत्येक व्यक्तीची कुंडलिनी जागृत करतात. नाही, त्याचा अर्थ असा नाही, त्या लोकांनी सहजयोगाकडे आलं पाहिजे आणि ते आपल्याकडे मागितलं पाहिजे. त्यांनी त्यासाठी विनंती केली पाहिजे आणि त्याचवेळी तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकता. मला संख्याबळ नको आहे. मला सहजयोगाची गुणवत्ता पाहिजे. सत्यशोधकांची गुणवत्ता पाहिजे, पण आम्हाला असं वाटू लागतंय की श्री माताजींना मतांचं अधिक्य हवे आहे. मला असं म्हणायचे आहे, मी कोणत्याही निवडणूकीला उभी नाही. तुम्ही मला निवडा किंवा निवडू नका. मी अगोदरच निवडले गेले आहे. ते कार्य तुम्हाला करायची गरज नाही. मला यासाठी पुष्कळ लोकांची गरज नाही. जर तुम्ही या विवेकबुद्धीला चुकाल तर, तुमच्याकडे समस्या वाढीला लागतील.

# प्रकरण आठ

# निर्विचार जागृतीमध्ये प्रचार–प्रसार

‘‘सहजयोग घटित करायचा असतो,
त्याचा विचार करायचा नसतो. विचार करणे
हा आळशी माणसाचा बुरखा आहे,
जो काम टाळण्यासाठी वापरला जातो.’’

## मेंदूचे काम

सहजयोग हा मेंदूच्या हालचालीने करायचा नसतो. तो आध्यात्मिक पातळीवर कार्य करतो. आध्यात्मिक पातळी ही मानसिक पातळीपेक्षा अत्यंत उच्च पातळी आहे. तुम्ही हे समजून घेतले पाहिजे, की सहजयोग हा घटित करायचा असतो आणि त्याचा विचार करायचा नसतो. त्याचा तुम्ही विचार करू शकत नाही. तुम्ही तुमच्या विचाराद्वारे जे काही करण्याचा प्रयत्न कराल तर सहजयोगात तुम्ही कोणताही परिणाम प्राप्त करू शकणार नाही.

मेंदू अत्यंत साधा आहे. तो सरळमार्गी आहे. त्यामध्ये प्रेम अभिप्रेत आहे. मी जे काही सरळपणे बोलत आहे. त्यामुळे तो समजू शकेल. हा गुंतागुंतीचा मेंदू प्रथम सरळ केला पाहिजे आणि सर्वोत्तम मार्ग म्हणजे विचार करणे बंद केले पाहिजे. फक्त विचार करणे बंद करा आणि तेच तुम्हाला करायचे आहे. जेव्हा तुम्ही विचार करणे थांबवाल तुम्हाला वाटेल काहीही करायचे नसते. फक्त विचार करून तुम्ही काही करू नका. उदा.म्हणजे मला तुमच्यासाठी एक प्रवचन द्यायचे आहे, परंतु मी त्याबद्दल विचार करत बसले तर तुम्ही काय ऐकणार आहात? तुम्ही विचार करून ऐकणार आहात का? तुम्ही असं म्हटलं पाहिजे 'हे दिवे प्रकाशित करा आणि मग त्याबद्दल विचार करा.' 'मला प्रकाशित करायचे आहे तर ते काय प्रकाशित होईल?' हे समजून घेतले पाहिजे, की फक्त विचार करण्याने तुम्ही काही करू शकत नाही. विचार करीत बसणे हा आळशी माणसाचा वेष आहे आणि तो काम टाळण्यासाठी वापरला जातो.

जेव्हा सत्य स्वत: करुणा म्हणून प्रगट होते तेव्हा तुम्ही त्यासाठी काही करीत नाही. उदा.जेव्हा मी तुमची कुंडलिनी जागृत करते. तेव्हा जरी ती मी करीत असले तरी त्याबद्दल मी काही जाणत नाही कारण तुम्ही सर्वजण तयार असता आणि तुम्ही सर्व मेणबत्तीसारखे असता. मी एक मेणबत्ती आहे, जी प्रज्ज्वलित आहे आणि जेव्हा मी मेणबत्ती प्रज्ज्वलित करते, मला वाटत नाही की मी फार मोठ कार्य केलं. जर मी प्रज्ज्वलित आहे, तुमची तयारी आहे आणि जर मी तुमची मेणबत्ती प्रज्ज्वलित केली तर ते सहजच घडून जाते.

यालाच सत्य म्हणतात. त्याकरिता कोणत्याही प्रकारची लीनता असावी हा प्रश्नच संभवत नाही, परंतु ही एक सत्य घटना आहे. त्याविषयी काही करायचा प्रश्नच नाही, परंतु ती एक सत्य घटना आहे. खरोखरच मी काही करीत नाही. तुम्हाला या हेतूसाठी पूर्ण तयारीने बनवले गेले आहे. याप्रमाणे परमेश्वराने तुम्हाला सर्वांना तयार केले आहे आणि तुम्ही फक्त ते स्वतःहून स्वीकारायचे आहे. साध्या, सरळ, सोप्या मार्गाने ते घटित होते आणि तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळतो. सत्य आणि तुमचा विचार यामधला फरक हाच आहे. आपल्या विचाराने (कल्पनेने) आपल्या अहंकराची वाढ होते किंवा आणखी एक पद्धत आपण वर्धित करतो, की ज्यामुळे आपल्याला काही एक करावे लागते, परंतु सत्यामुळे तुम्ही केवळ ते करता, ते केवळ घटित होते. तुम्ही तृतीय पुरुष (व्याकरण पद्धतीने), तुम्ही बोलायला सुरुवात करता जसे तुम्ही म्हणता, 'ते घटित होत नाही.' 'ते घटित होते.' तर ते काय आहे, की जे घटित होत असते? नंतर तुम्हाला कळून चुकते, की तुम्ही परमेश्वराच्या त्या महान शक्तीसाठी काम करीत आहात. ती शक्ती म्हणजे त्याचे परमेश्वरी प्रेम. जे सर्वत्र पसरलले आहे. जे सर्व जिवंत क्रिया करीत आहे आणि त्या शक्तीचा तुम्हाला आंशिक भाग बनायचे आहे.

हा आत्मा मंगलदायक कार्य घटित करीत असतो आणि कल्पना करा, जर तुम्ही याप्रमाणे विचार केलात तर किती तरी ताण निघून जातो. प्रथम तुम्हाला सर्वांना तुमच्या घड्याळाचे गुलाम व्हायला लागते. दुसरे म्हणजे तुमच्या पुस्तकाचे गुलाम व्हायला लागते, नंतर तुम्हाला बाजाराचे, जागेचे गुलाम व्हावे लागते की जी तुम्हाला भाड्याने घ्यावी लागते. कल्पना करा, तुम्ही तुमच्या आत्म्याला सर्व काही घटित करण्याची अनुज्ञा द्या, तर प्रत्येक गोष्ट घटित होईल आणि जेव्हा तुम्ही या बिंदूपर्यंत पोहचाल तर ते फार मंगलदायक असेल म्हणजे आता तुम्ही ते कसे स्वीकाराल? तर केवळ स्वीकारण्याने तुम्ही तुमची सत्ता सोडायची. तुमचे स्वतःचे (कपोलकल्पित) राज्य आणि त्यांच्या आत्म्याच्या राज्यात तुम्हाला शिरायचे आहे. तुम्ही

तुमच्या कपोलकल्पित राज्याचा त्याग करा म्हणजे तुमच्या अहंकाराच्या राज्याचा किंवा जे राज्य तुमच्या अहंकाराचे किंवा प्रती अहंकाराचे असेल त्याचाही त्याग करा आणि सर्व घटना पाहण्याचा प्रयत्न करा की ते कसे घटित होत आहे? आता तुमच्या परीक्षेचा क्षण काय आहे? तर ते घटित होऊ द्या. तुम्ही तुमचे चित्त त्यामध्ये घालू नका. चित्त हा दुसरा भाग आहे म्हणजे एक तणाव म्हणून बघण्याचा प्रयत्न करू नका. 'आज का नाही? ते आज घडायला हवे होते. आम्ही ते घडण्याची अपेक्षा केली होती, तर या क्षणी का नाही?' हा झाला तुमचा अहंकार. 'तुमच्या कृपेत ते होईल.' म्हणजे सदासर्वकाळ तुमच्या मनामध्ये जे विचार फिरतात त्यामुळे तणाव निर्माण होतो. तो विचार आत्म्याचा नसतो, तर तुम्ही काय म्हटले पाहिजे? 'हा विचार नाही. ही कल्पना नाही (नेति, नेति) हा विचार नाही, हा विचार नाही.' असे म्हणा आणि पहा आता तुम्हाला किती हलके वाटते आणि आता तुम्ही पूर्ण शैथिल्यात गेलेले आहात. हा विचार नाही. हा विचार नको. तुम्ही फक्त विचार प्रक्रियेला नाकारत रहा, तर तुम्ही निर्विचारितेच्या स्थितीमध्ये जाल. या स्थितीमध्ये तुम्हाला आत्मा जाणवेल. त्याग तुमच्यामध्ये परत येईल आणि तुमच्यातील परमेश्वरी तत्त्वाकडे बघाल. एकदा का तुमच्यामध्ये परमेश्वरी व्यक्तिमत्त्व आले तर भक्तीची समस्या राहत नाही. तुम्ही त्या तत्त्वाशी एकरूप होऊन जाता आणि तुम्ही त्याचा आनंद घेण्यास सुरुवात करता, परंतु बुद्धीप्रामाण्यता ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. ती तुमच्याजवळ युक्त्याप्रयुक्त्या करत राहते. त्यामुळे तुमचा समजुतदारपणा तुमच्यापासून दूर जातो आणि ती समजदारी म्हणजे जे काही तुम्ही उद्यापर्यंत जगलात ते अगदी भौतिक आणि स्थूल स्वरूपाचे जीवन आहे. आता तुम्ही त्याबाहेर आलेले आहात. त्या बाहेर आता तुम्ही मोठे झालेले आहात. तुम्ही आता वर आले पाहिजे. भरभराटीच्या, मोहोरलेल्या काळामध्ये तुम्ही सुगंध बनले पाहिजे आणि तुम्ही बुद्धीप्रामाण्यतेला सोडले पाहिजे. हे तुम्हाला बंधनकारक आहे. बुद्धी प्रमाण्यता (तर्क) ही टाळलीच पाहिजे. वादविवाद, वितंडवाद टाळण्याचा प्रयत्न करा आणि सबबी

सांगण्याचे टाळले पाहिजे.

## चिंता

आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. हे कसं होणार? काय होणार? कधी होणार? यामुळे बाधा घटित होतात. तुम्ही तर आता सैनिक आहात. तुम्ही केवळ (त्यांच्याशी) संघर्ष करायचा आहे. आता कसलाही अडथळा असता कामा नये. फक्त तुम्ही पुढेच चला.

मला आता असे वाटते आता वातावरण काय आहे? याची चिंता बंद करणे चांगले होईल. आता कोणत्या प्रकारचे लोक इथे आले आहेत. याची चिंता न करणे हे अधिक चांगले. तर चला आता सुरुवात करू या. प्रथम ब्रह्मरंध्राचे छेदन भारतात झाले. त्या स्थितीमुळे सहजयोगाला सुरुवात झाली. मी समजते, की आदिशक्तीच्या जेवढ्या शक्ती आहेत त्या तुम्हाला असलेल्या समस्येपेक्षा मोठ्या आहेत कारण त्यांच्या त्या शक्ती कुंडलिनीचे जागरण करतात.

तुम्ही तुमची मूल्य, किंमत (मोल) समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. तुम्ही सर्वजण किती भाग्यवान आहात कारण या योग्य काळात तुम्ही जन्म घेतलेला आहे. तुम्ही आत्मसाक्षात्कार घेतलेला आहे, पण तो कशासाठी? तर साऱ्या जगाची मुक्ती करण्यासाठी. मानवजातीला पूर्णतः बदलून टाकण्यासाठी आणि सर्व जग परमेश्वराच्या राज्यात नेण्यासाठी तुम्ही आलेले आहात. म्हणून मी अपेक्षा करते, की तुम्ही सर्वांनी सहस्रारामध्ये प्रगती केली पाहिजे. होय, तुमच्या सहस्रारात आणि प्रत्येकाच्या सहस्रारात आपण साऱ्या विश्वाचा विचार केला पाहिजे. आपण फक्त सहजयोग्यांचा विचार करता कामा नये. सत्यशोधकांचासुद्धा विचार करता कामा नये. सत्यशोधक आहेतच, ठीक आहे, पण इतर लोकांचे काय? त्यांना पुष्कळशा समस्या आहेत आणि पुष्कळशा गोष्टी अजून करायच्या आहेत. उदा.भारतात गरिबीची समस्या आहे म्हणून त्यांच्यासाठी काही तरी करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तुमच्या देशामध्ये तुम्हाला समस्या आहे.

त्या काय समस्या आहेत त्या शोधा. त्यांच्यासाठी कसलीतरी चळवळ सुरु करा. जेवढी शक्य आहे तेवढी त्यांना मदत करा. धर्मप्रचारार्थ असलेल्या संस्थेसारखे नाही. म्हणजे काही एक बक्षीस मिळविण्यासाठी, नाव घेण्यासाठी, कोणाचे तरी तुम्ही धर्मांतर करता तसे नव्हे. तर हे कार्य तुमच्या आनंदासाठी तुम्हाला करायचे आहे. तुमच्या समाधानासाठी ते करायचे आहे. त्यासाठी तुम्ही समाजाकडे जावे. तुम्ही बिलकूल घाबरू नका, की तुम्हाला या कारणासाठी पकडले जाईल.

## सूक्ष्मता

जेव्हा तुम्ही गुणवत्तेने वाढीला लागाल. तेव्हा पुष्कळ अधिकाधिक लोक येऊ लागतील कारण मी जाणते नेहमीच तुम्ही इतके सामुदायिक आहात, की 'तुमच्या लक्षात येतं श्रीमाताजी, काका अद्याप सहजयोगात नाहीत, हे पहा माझी आई, माझा भाऊ अजून सहजयोगात नाही.' मला समजतंय तुमचे पिताश्री अजून सहजयोगात नाहीत पण त्यांना तुम्ही विसरून जा, पण जे सत्याच्या शोधात आहेत त्यांच्याशी संपर्क साधा. ते तुमचे खरे नातेवाईक आहेत. त्यानंतर ते सर्व लोक सहभागी होतील, मग तुमचे पिताश्री, तुमची आई, भाऊ, बहिण, मुले हे सर्वजण यामध्ये उडी घेतील. जे अशा प्रकारचे लोक असतात ते प्रथम वाट पाहतात, प्रतीक्षा करतात ते सत्यशोधक असू शकत नाहीत, पण जे काही सत्यशोधक आहेत त्यांना तुम्ही शोधून काढा. जिथे कुठे असतील तिथून त्यांना शोधून काढलं पाहिजे. माझं चित्त अगदी प्रत्येकवेळी तुमच्यासोबत आहे. तुम्ही माझा विचार करा. तुमच्या सेवेसाठी मी तिथे हजर असेन. जो काही मार्ग शक्य असेल त्या मार्गाने तुम्हाला मदत करण्यासाठी मी तिथे असेन. काही जर तुम्हाला फार कठीण जाणवलं ते तसं कठीण नसतं कारण ते तुम्ही तुमच्या खांद्यावर घेता, म्हणून ते कठिण असते, पण जर तुम्ही ते चराचरात पसरलेल्या परमेश्वरी प्रेमाच्या शक्तीकडे, आदिशक्तीच्या परम चैतन्याकडे ते सोडून दिलं तर ते काहीही कठीण नाही. तुम्ही त्याचं व्यवस्थापन करू शकणार नाही किंवा ते तुम्ही करू शकणार नाही, इतके ते वाईट असणार नाही. जे लोक शक्तिमान

आहेत अशांसाठी विनयशीलता उपयुक्त आहे कारण त्यांना प्रतिक्रियेची गरज नसते आणि त्यांना कसल्याही प्रकारच्या रक्षणाची गरज नसते. त्यांची नम्रता त्यांचे पुष्कळच रक्षण करीत असते. जेव्हा तुम्ही विचार करू लागता किंवा तसे तुम्हाला वाटू लागते, इथे विचार करीत असणे हा काहीसा गमतीदार शब्द आहे, पण वाटणे, की तुम्ही अत्यंत लहानसा मातीचा कण आहात आणि त्यावेळी तुम्हाला असे जाणवते, की तुम्ही एक भले मोठे आकाश आहात. असा लवचिक स्वभाव तुमच्यामध्ये वाढीला लागतो. त्यामुळे तुम्ही अतिशय सूक्ष्म बनता, अगदी सूक्ष्म, की ज्यामुळे तुम्ही कशातही, कोणत्याही विषयात, कोणत्याही व्यक्तिमत्त्वात, पुस्तकात, समजुतदारपणात आणि कोणत्याही साहसामध्ये शिरकाव करता, अगदी सूक्ष्म पद्धतीने आणि मग ताबडतोब तुम्ही हे बघता, आता काय करायचे आहे? कारण तुम्ही अत्यंत सूक्ष्म झालेले असता. जेव्हा तुम्ही फार मोठे होता तेव्हा तुम्ही विचार करायला सुरुवात करता म्हणून मी असे म्हणेन की अशी भावना ज्यामुळे तुम्ही पुष्कळ लोकांना मदत करू शकता हे महान कार्य करू शकता तर ते करावे हेच बरे.

आता दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही काय करणार आहात हे निश्चित ठरवू नका. मला काय करायचे आहे? जर मी ते निश्चित ठरवले तर ते मी करतेच. तुम्ही जे काही निश्चित ठरवले आहे ते ठीक आहे. परंतु जर ते साकार झाले नाही तर चिंता करण्याचे कारण नाही. ते अगोदरच व्यवस्थित रचलेले आहे. नियोजित केलेले आहे आणि सुंदरपणे तुमच्यासाठी तयार करून ठेवलेले आहे. तुम्ही निश्चित करा, 'ठीक आहे. जर तुमचा निर्णय ते करण्यासाठी असेल तर ते घटित होईल.' आणि ते घटित होणार नाही. जर ते घटित होऊ नये असे असेल तर!

# प्रकरण नऊ

# नवीन
# आयाम

''आध्यात्मिक जगाचे सहजयोग हे
एक महान कार्य आहे. जिथे सर्व विश्व,
सर्व देव-देवता, सर्व देवदूत आणि अवतार,
प्रेषित हे सर्व जण ते घटित करण्यासाठी
तुमच्यामध्ये आणि तुमच्या बाहेर कार्यरत आहेत.''

## कार्य

सहजयोगामध्ये एका जीवनकालावधीमध्ये तुम्हाला तुमचा आत्मसाक्षात्कार प्राप्त झालेला आहे आणि या जीवनकालावधीमध्ये तुम्ही तुमची आत्मोन्नती करायची आहे आणि याच जीवनामध्ये तुम्ही उच्च असं प्राप्त करायचं आहे, पण वेळ अगदीच कमी झालेला आहे. शिवाय पार्श्वभूमी अतिशय अंध:काराची आहे. तुमच्याभोवती असे लोक आहेत, की जे सकाळपासून संध्याकाळपर्यंत विध्वंसक विचार तुमच्याकडे सोडत आहेत. आता तुम्ही असे लोक आहात की तुम्हाला वेगाने, गतीमान होऊन पुढे यायचे आहे. परंतु सर्व प्रकारचा आळस सोडला पाहिजे. तुम्ही सर्वांनी अतिशय जोमाने बाहेर आले पाहिजे, पण एक प्रकारची सुस्ती, जी तुम्ही समजता, तुमची जागरूकता ह्यापासून खूप वेगळी आहे. परंतु एक प्रकारची सुस्ती जी तुम्हाला समजत असते. तुमची जाणीव ही त्या सुस्तीपासून वेगळी आहे. तरीसुद्धा ही सुस्ती ही आपल्या जाणीवेने सहजयोग स्वीकारावा याला मान्यता देत नाही. तुमच्यापैकी प्रत्येकाने रोज असा विचार केला पाहिजे, की मी सहजयोगासाठी आज काय केले? परंतु तुम्ही सर्वजण अद्याप तुमच्या नोकरी धंद्यामध्ये व्यस्त आहात, पैसे जमा करण्यामध्ये, नातीगोती सांभाळण्यामध्ये व्यस्त आहात. अशा लोकांना सहजयोगाबाबत काही चिंता नसते. आपल्यालाच त्या टप्प्यापर्यंत उन्नती करण्यासाठी सर्व प्रयत्न करायचे आहेत, जे काही आपण जाणतो, आपण त्यावर विश्वास ठेवतो, आपण त्यावर मेहनत करतो आणि त्याच्याशी एकरूप होतो. सामान्यपणे स्वातंत्र्यासाठी आपण काहीही करतो पण या सूक्ष्म स्वातंत्र्यासाठी सहजयोग्यांनी जेवढं शक्य आहे, तेवढ्या गोष्टी केल्या पाहिजेत.

पहिली गोष्ट म्हणजे समजून घेतले पाहिजे, जागरूक असले पाहिजे आणि जागृत मनात नेहमीच तुम्ही सहजयोगी आहात हे लक्षात ठेवले पाहिजे. तुम्ही असे काही आहात की जे बाकी लोकांपेक्षा अधिकाधिक उच्चस्थानी आहात. साऱ्या मानव जातीची मुक्ती तुमच्यावर अवलंबून आहे. या निर्मितीचा हेतू तुमच्याकडून सफल होणार आहे. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या

जाणिवेच्या चेतनेत असले पाहिजे की तुम्ही खूप महत्त्वाचे आहात आणि म्हणूनच तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला गेला आहे. तुम्ही तुमच्या विशिष्ट बंधनात आणि तुमच्या अहंकारात कसे काय राहू शकणार? आता तुम्ही जागरूक आहात, तुम्ही तुमच्या चक्रांबाबत जागरूक आहात, त्या चक्रांना तुम्ही स्वच्छ ठेवत नाही. जेव्हा ती चक्रे खराब होतात, तेव्हा देखील तुम्हाला लाज वाटत नाही. काही काळानंतर त्या चक्रांची जाणीव तुम्ही घालवून बसाल, म्हणजे तुम्ही सूक्ष्म बनलेले आहात. परंतु तुमच्या जाणिवेत तुमच्या चेतनेत तुम्ही अद्याप सूक्ष्म नाही. ज्या लोकांनी आत्मसाक्षात्कार घेतला नाही त्यांच्यापेक्षा पुष्कळशा गोष्टी तुम्ही जाणता. हे एकमेव सत्य आहे. उदा.आपण आपल्या परम चैतन्याची जेव्हा गरज असते तेव्हा उपयोग करीत नाही. आपण त्याचा उपयोग करीत नाही किंवा कधी तरी अत्यंत यांत्रिकपणे करतो, अगदी यंत्राप्रमाणे तुम्ही बंधने घ्यायला सुरुवात करता, अगदी यंत्राप्रमाणे. तुम्ही अद्याप तुमच्या चक्रांसंबधी बेसावध आहात. जाणीव, जी मी माझ्या हृदयापासून देते आहे, ती तुम्ही प्राप्त करावी असे मला वाटते. जसे काही लोक ज्याप्रमाणे सहजयोगासाठी फार परिश्रम घेतात आणि इतर मात्र सहजयोग हा गृहीत धरतात. त्यांना मदत कराविशी वाटत नाही. त्यांना प्रत्येक गोष्ट अगदी तयार केलेली हवी असते. हे असे दर्शविते, की ते स्वत:च्या आनंद देणाऱ्या शक्तीविषयी अद्याप जागरूक नाहीत. ते जर त्यांनी त्यांच्या हृदयापासून केले तर त्यासाठी केलेल्या मेहनतीची जाणीवसुद्धा त्यांना वाटणार नाही. उलट त्यांना फक्त असेच जाणवेल, की ते कशाप्रकारे आशीर्वादित झालेले आहेत किंवा त्यांनी काय मिळवले आहे. ही पूर्णत्वाची आणि समाधानाची जाणीव तुमच्या सर्व समस्यांना विशेषकरून तुमच्या डाव्या विशुद्धीच्या समस्यांवर मात करेल.

## आध्यात्मिक कार्य

मला इतके कठोर परिश्रम करायचे आहेत. सर्वप्रकारच्या समस्या, सर्वप्रकारची अस्वस्थता, सर्व प्रकारचा ताणतणाव, हे काय आहे? तर हे असं आहे. पाहा, तुम्हा सर्वांना निर्माण केले गेले आणि तुम्ही सर्वजण माझे

हात आहात. तुम्हाला काम केले पाहिजे. प्रत्येक बोटाने काम केले पाहिजे आणि हेच मी तुम्हाला सांगत आलेले आहे. आता ही तुमची जबाबदारी आहे, आपण परिवर्तित झालेलो आहोत. फक्त सहजयोगीच नव्हे तर एक बहरलेला काळ (जणू वसंत ऋतू), असे पुष्कळ अगणित सहजयोगी आपल्याकडे असले पाहिजेत.

हे आदिशक्तीचे कार्य आहे हे समजण्याचा प्रयत्न करा. हे कार्य कोण्या एका संताचे नाही, हे कोण्या एका अवताराचे नाही. हे कार्य राजकीय नेत्याचे नाही. हे कार्य मोठ्या पुढाऱ्याचे नाही, हे कार्य आदिशक्तीचे आहे. जे कार्य इतक्या पारदर्शकपणे त्याचे परिणाम तुमच्यामध्ये दाखवत आहे.

आता तुम्हाला हे पहायचे आहे. मला प्रसन्न ठेवणे, ही तुमची ज्वलंत इच्छा आहे हे मी जाणते आणि मी पाहतेसुद्धा तुम्ही माझ्यावर किती प्रेम करता आणि माझ्यासाठी तुम्हाला काय करावे लागते. पण माझ्यासाठी एक महान गोष्ट तुम्ही करू शकता ती म्हणजे सहजयोगाचा प्रसार करणे. त्या गोष्टीचे अतिशय खास, विशेष, अत्यंत दुर्मिळ आशीर्वाद तुम्हाला मिळालेले आहेत. तुम्हाला कोणतेही प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. ते तुम्हाला सहजपणे प्राप्त झालेले आहे. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की ते मिळविणे हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे असं काही तरी. हे आदिशक्तीचे कार्य आहे आणि आदिशक्तीचे कार्य तुमच्या जीवनामध्ये दिसलेच पाहिजे. कोणत्याही फलप्राप्तीशिवाय; ती एक करुणा आहे.

गरीब लोकांना दया, करुणा दाखवून त्यांचा धर्म वाढविण्यासाठी लोकांनी प्रयत्न केलेले आहेत. गरीब लोकांची काळजी घेऊन, अपंग लोकांची काळजी घेऊन त्यांनी धर्मप्रचार केला आहे. तसं सहजयोग्यांनी वास्तविक करण्याची काही गरज नाही. त्यांनी काय करायचे? इतर लोकांमध्ये परमेश्वरी बदल करायचा आहे. त्यासाठी मार्ग आणि पद्धती शोधा, जेणेकरून तुम्ही तो परमेश्वरी बदल करू शकाल, आदिशक्तीचा संदेश पसरवू शकाल. त्यासाठी तुम्ही तुमचे मन लावा आणि तुम्हाला कळून येईल, की तुम्ही त्याचे व्यवस्थापन कसे करायचे.

तुम्ही आध्यात्मिक कार्यकर्ते आहात. तुम्ही सामाजिक कार्यकर्ते नाहीत अर्थातच जास्तीत जास्त तुम्ही सामाजिक कार्य करू शकता. काही हरकत नाही. पण मुख्य गोष्ट अशी आहे की तुम्ही मानवजातीला परिवर्तित करायचे आहे. त्याबरोबर मोठा रोग आहे, जो क्षुद्र वृत्तीचा, क्रूरतेचा, दुसऱ्यांना त्रास देण्याचा, क्रोधाचा. हे सर्व रोग बरे होऊ शकतात कारण ते सर्व आंतरिक नाही आणि आज ते बरे करण्याची गरज आहे. प्रत्येक देश लढाई करीत आहे, छळत आहे आणि सदासर्वदा नाश होण्याच्या संकटात आहे. फक्त एकच मार्ग, जो तुम्ही करू शकता, तो आहे त्यांना आत्मसाक्षात्कार देणे. अगदी स्पष्टपणे जेव्हा तुम्ही एखाद्याला आत्मसाक्षात्कार देता तो त्याचे मोल ठरवतो. त्यामध्ये त्याची उन्नती होते. हे जे घडते ते आपण अगदी स्वच्छपणे पाहू शकतो. यावेळी तुमचे पूर्ण रक्षण होते. तुम्ही संपूर्णपणे रक्षित होता.

तुमचे रक्षण कोण करतं? तुम्ही कदाचित म्हणाल 'श्री आदिशक्ती'. ठीक आहे. परंतु या जगामध्ये सर्वत्र विध्वंसक शक्ती काम करीत आहेत. बाधांच्या नव्हे, पण शिवाच्या सकारात्मक विध्वंसक शक्ती काम करीत आहेत. जर शिवाने पाहिले की आदिशक्तीचे कार्य चांगल्याप्रकारे चालले आहे तर ते आनंदी होतील. ते इथे बसलेले आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला, सहजयोगाच्या प्रत्येक कार्याला न्याहाळत आहेत. जर त्यांना आढळलं की काही तरी पुष्कळ चुकीचे घडत आहे, तर त्याला मी आवरू शकत नाही. ते त्याचा नाश करतात. मी त्या टप्प्यापर्यंत जाऊ शकत नाही. ते त्याचा समूळ नाश करतात. ते फक्त नाशच करीत नाही तर हजारो पटीने ते नाश करू शकतात.

## प्रेमाचे सैनिक

माझी खात्री आहे आणि माझी मनापासूनची आणि खरोखरच एक इच्छा आहे, की तुम्ही प्रेमाचे आणि शांतीचे सैनिक बनले पाहिजे कारण त्यासाठीच तुम्ही इथे आलेले आहात. त्या कारणास्तव तुम्ही पृथ्वी तत्त्वावर जन्म घेतला आहे. म्हणून तुम्ही आनंदी रहा. तुम्ही अतिशय सभ्य असे प्रेमाचे सैनिक आहात आणि यास्तव तुम्ही दुसऱ्यांशी बोललं पाहिजे आणि सहजयोग पसरवला पाहिजे. तुमच्याजवळ असलेला आनंद त्या लोकांना

दिला पाहिजे. जर तो तुम्हाला प्राप्त झालेला असेल तर तेवढ्यापुरते तुम्ही समाधानी राहू नका किंवा तुमच्यापैकी थोड्याशा लोकांजवळ तो आनंद आहे. अगदी त्वरेने तुम्ही तो पसरवला पाहिजे आणि ते तुम्ही करू शकता. त्यासाठी पैशाची गरज नसते. त्यासाठी कोणताही डामडौल करण्याची गरज नसते. ते तत्त्व केवळ आत असते आणि ते कार्य करीत असते. ते पूर्वीपासून तिथे असते. आणि ते त्याचे अस्तित्व असते. ते प्रत्येकाजवळ असते. हे सर्व मी जाणते. अर्थातच ते मला माहीत आहे. आता ते तुम्ही पण जाणता. म्हणून तुम्ही ते घटित केले पाहिजे. तुम्ही अशा पद्धतीने घटित करा माझी खात्री आहे. एक दिवस हे जग पूर्णपणे बदलेले असेल.

## दूरदृष्टी

मला हे बघायचे आहे, की तुम्ही सर्व तुमच्या देशामध्ये सहजयोगाचे कार्य करीत आहात. तुम्ही कदाचित म्हणाल, माझ्या देशातील लोक अगदी निराशाजनक वाईट आहेत. काही असो, मी काही नाही म्हणत नाही. तरीसुद्धा थोडी फार जागा आहे आणि काही असे कप्पे आहेत जिथे तुम्ही जाऊ शकता. त्यांच्याशी बोलू शकता, त्यांना हे सांगा, विशेषकरून प्रसार माध्यमे तुम्ही हाताळली पाहिजे. अशा विशेष गोष्टी तुम्ही करायच्या आहेत आणि तुम्ही ते शोधून काढा. ते कार्य तुम्ही का करू शकत नाही? जसं माझ्याप्रमाणे, मला कोणाचाही आधार नव्हता. कोणाकडूनही मला मदत झाली नाही. सहस्राराचं भेदन मीच युक्तीने साध्य केलं. तसं तुम्हीसुद्धा इतरांच्या सहस्राराचं भेदन करू शकता. ते फार कठीण नाही कारण माझी दुरदृष्टी आहे की या जगात किमान ४०% लोक आत्मसाक्षात्कारी आत्मे असायला हवेत की जे सहजयोगाचा अभ्यास करतील आणि ते दुसऱ्या लोकांना आत्मसाक्षात्कार देतील आणि लोकांना बदलण्याचा प्रयत्न करतील. तुमच्यापैकी कोणीही कोणाकडे जाऊ शकतो आणि सांगू शकतो. त्यासाठी तारतम्य पाळायची गरज नाही. मला असं म्हणायचं आहे की लोक कधीकधी त्यांच्या शिक्षणाची मूळ प्रत घेऊन बसतात किंवा तसं काही तरी करतात. त्याची गरज नाही. तो कोणीही असो. मी तुम्हाला असे सांगत नाही

ते कुत्र्यांना किंवा प्राण्यांना द्या. परंतु ते मानवजातीला द्या. (श्रीमाताजी हसतात) ते कोणीही असू शकतील. ते कदाचित इंग्लिश असतील किंवा ते जर्मनही असू शकतील किंवा ते इटालियन असतील.

## वेळेची मर्यादा

हे अवतरण येणारच होते. तशी वेळ पण आली होती. निश्चित वेळ आणि सहज समय यामध्ये फरक आहे. निश्चित वेळ अशी असते की तुम्ही असं म्हणू शकता की ही ट्रेन या वेळेला सुटते आणि या वेळेला पोहोचते, परंतु जिवंत गोष्टी ज्या स्वयंस्फूर्त असतात, ज्या सहज असतात त्याची वेळ तुम्ही सांगू शकत नाही. हे अवतरण अशा समयी आले, की ती वेळ निर्णयात्मक होती, की कोणत्या वेळी त्या अवतरणाने यावे.

ती वेळ अत्यंत विशिष्ट होती. ऋतंभरा शक्तीची ती अत्यंत चांगली वेळ होती. ज्या स्थितीत तुम्हाला मोठे व्हायचे आहे हा एक मुद्दा आहे. हे असे पर्व आहे, की या पर्वामध्ये जर तुम्ही मोठे झाला नाहीत तर तुमची कधी वाढ होणार नाही. तुम्ही आता याचा संपूर्ण फायदा घेतला पाहिजे. अगदी पूर्ण तळमळीने तुम्ही सहजयोग केला पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही तुमचे नोकरी धंदे सोडावे किंवा असं काही तरी. जर सहजयोगामध्ये तुम्ही तीव्र असाल तर तुम्ही प्रत्येक गोष्टीमध्ये तीव्र रहाल.

कृतयुग याचा अर्थ अशी वेळ जेव्हा तुम्ही काही तरी केलं पाहिजे. कृत म्हणजे जेव्हा ते केले जाते म्हणून अशा पद्धतीने तुम्ही या गोष्टीचे प्रवाह आहात की जे परमेश्वराचे कार्य करीत आहेत. तुम्ही त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे प्रवाह आहात आणि त्याची शक्ती आहात.

आपण आपल्या आतमध्ये आपला आनंद घ्यायचा आहे. ते फार महत्त्वाचे आहे. कदाचित तुम्हाला हे माहीत नसेल, की तुमच्याजवळ आनंद आहे हे सर्वांना माहीत नाही. कित्येक लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. यापूर्वी कधीही साऱ्या इतिहासात असे घडले नव्हते, की आदिशक्ती स्वत: या पृथ्वीतलावर येतील आणि तुमच्या समस्या सोडवतील. यापूर्वी

कधीही असे नव्हते. लोकांच्या साध्यासुध्या प्रयत्नाने लहानसहान मार्गाने आणि थोड्याशा समजूतदारपणामुळे आत्मसाक्षात्कार दिला गेला आहे. ते याप्रमाणे. कधी काळी तुम्ही बघा एखादा दगड अचानकपणे हिरा बनतो. तुम्ही हिरा कापण्यासाठी ते काम हिऱ्याकडूनच करून घेता तर ती अत्यंत आनंददायी स्थिती आहे. त्यामध्ये तुम्ही आहात. प्रचंड शांती आलेली आहे आणि ती अधिक परिणामकारक आहे. मी स्वत: हे जाणू शकत नाही, की मी त्यांना कधी एकदा बघेन? मी खरोखरच आश्चर्यात आहे, की हे सारे कसे घडते आहे? हा आनंद फक्त कृतज्ञतेतूनच येतो. फक्त कृतज्ञतेने तुमचे हृदय विशाल होते. कृतज्ञतेचे बक्षीस म्हणजे आनंद. कृतज्ञता केवळ भौतिक नाही, केवळ वरपांगी केलेली सेवा नाही, तर ती हृदयापासून असते. ते अंत:करणापासून असावं, ती हृदयाची कृतज्ञता असावी आणि हे आनंदी लोक इतरांचा कधीही हेवा करीत नाहीत कारण या आनंदापेक्षा कोणती गोष्ट मोठी आहे? या आनंदाला पुष्कळ आयाम आहेत. म्हणजे तुम्ही कारण आणि परिणामाच्या विषयाच्या या प्रदेशाच्या पलीकडे जाता आणि सर्व देवदूत आणि सर्व गण तिथे तुम्हाला मदत करतात हे तुम्ही जाणता. ते घटित होते. या मार्गाने ते घटित होते. अशा पद्धतीने तरी सुद्धा ते तुम्ही गृहीत धरता. तुमच्यामध्ये त्या आनंदाचा परिणाम नसतो. तुम्ही मात्र जाणता की काम झालेले आहे. ते सर्व घटित झालेले आहे. किती हा आनंद!

आता वेळ आलेली आहे, तुम्ही असे लोक आहात, तुमच्या चांगल्या वर्तणुकीने परमेश्वराचे मन बदलून टाकणार आहात. अत्यंत क्रोधी परमेश्वर. त्याला तुम्ही संतुष्ट करणार आहात. या पाश्चिमात्त्य जगात कोण यासाठी पात्र आहे. हे तुम्ही मला आज सांगा. यासाठी तुम्हाला निवडलेले आहे. विशेषकरून यासाठी तयार केलेले आहे. अशी भूमी निर्माण करण्यासाठी तुम्हाला निवडले आहे, की ज्यामुळे करुणेची देवता इतर लोकांसाठी जागृत केली जाईल.

आपल्या जाणिवेमध्ये आपण हे जाणायचं आहे, की आपल्याला सचेतन बनायचे आहे, की कुठपर्यंत आपण आपल्या एकमेकांच्या

नातेसंबंधाबद्दल सचेतनता प्राप्त केली आहे? म्हणजे विराटाची सामुदायिक जाणीव, मेंदूची म्हणजे सहस्राराची जाणीव आपण प्राप्त केली आहे. सहस्राराचे तत्त्व हे विष्णू तत्त्व आहे. परंतु सहस्राराची देवता श्री माताजी निर्मलादेवी आहेत. आता तुम्ही पाहू शकाल किती सुंदरपणे हे ऐक्य घडले आहे. श्री विष्णूंच्या सर्व शक्तींना त्या देवतेप्रमाणे कर्म करायचे आहे, अगदी त्या देवतेच्या चरणकमलावर समर्पित होऊन, म्हणजे श्री विष्णूंची चेतना ही त्या देवतेच्या पूर्णपणे हातात आहे. या महाप्रचंड देवतेबद्दल मला काही बोलायचे नाही. ते फार अधिक होईल. त्याचा तुम्हाला कदाचित दरारा वाटेल. म्हणून जे काही घडत आहे ते तसेच कार्यरत असू द्या. असं म्हणतात, तुमचे सहस्रार या देवतेपुढे समर्पित करा आणि जर ते तसं असेल तर ते तसेच घटित होऊ द्या. असं म्हणतात, तुम्ही या देवतेपुढे तुमचे सहस्रार विनयाने समर्पित करा आणि जर ते तसं असेल तर ते फार सोपं आहे कारण तुमच्यापुढे ती देवता आहे, स्वत:चे सहस्रार आहे आणि तुम्हीच फक्त असे लोक जे सहजयोगी आहेत. त्यांनी आज आधुनिक काळात ही देवता पाहिली आहे.

आता तुमच्यासाठी अशी वेळ आली आहे, की तुम्ही सत्य जाणले पाहिजे. परंतु ते सत्य जे कोरडे नाही, तर सत्य असे की ज्याच्याजवळ करुणा आहे आणि सत्य असे, की जे प्रत्येकाला समाविष्ट करते आणि सत्य, जे आपले अस्तित्व पूर्ण दृष्टीपथ आपल्यापर्यंत जाणते. या पृथ्वीवर आपण इथे कशाला आलेलो आहे? आपल्या येण्याचा उद्देश काय आहे? आपण काय करायचे आहे? प्रेमाची आणि करुणेची, आदिशक्तींची शक्ती तुम्हाला तुमच्या आत्म्याला समजावून देते.

प्रेम तुमच्यासाठी फार फार मर्यादित आहे. तुमच्यामध्ये याची जाणीव नाही. तरी फक्त कल्पना करा की तुमच्यासाठी कोणते महान कार्य करायचे आहे? तुम्ही तुमच्या आत्म्याबद्दल किती गांभीर्याने जागृत व्हायचे आहे?

हे फार महत्त्वाचे आहे. प्रथम तुम्ही तुमच्या आत्म्याबद्दल जागृत असायला हवे. तुमच्याजवळ आता तुमच्या आत्म्याचा प्रकाश आहे. त्या

आत्म्याच्या प्रकाशात तुम्ही किती दूरपर्यंत गेलेले आहात आणि किती चुकीच्या गोष्टी तुम्ही करीत आहात, तुम्ही स्वत:चे किती नुकसान करीत आहात आणि ती हानी निवारण करण्याची, ती सुधारण्याची आणि तुमच्या जाणीवेत आणण्याची शक्ती तुमच्यामध्ये आहे. ही अत्यंत महत्त्वाची वेळ आहे. ही अशी वेळ तुम्हाला पुन्हा कधीच मिळणार नाही आणि इतिहासात ही अशी वेळ नव्हती आणि भविष्यातसुद्धा ही वेळ येणार नाही.

ही अशी वेळ आहे ज्यामध्ये तुम्ही प्राप्त केले आहे. फक्त जाणीव नव्हे, फक्त आत्मज्ञान नव्हे तर ते कसे करावे हे सुद्धा तुम्ही जाणता. उलटपक्षी संतांच्या बाबतीत किंवा अशा लोकांबाबत जसे ताओ आणि झेन यांनी आत्मज्ञान असलेली व्यक्ती कशी असते याचे वर्णन केलेले आहे. तो कसा इतरांपेक्षा वेगळा वागतो, त्याची जीवनशैली कशी असते? याचे वर्णन केलेले आहे, पण त्यांच्यापैकी कोणीही तुम्ही कसे बनाल याबद्दल सांगितले नाही आणि त्याबद्दल कोणी सांगू शकत नाही आणि कोणीही तसे करू शकत नाही कारण त्यांच्यापैकी पुष्कळ लोक कुंडलिनीबद्दल काही जाणत नाहीत आणि ज्यांना ज्ञान आहे ते लोकांना सांगत नाहीत.

आदिशक्तीचे सर्वात महान कार्य म्हणजे तुमच्या पवित्र हाडामध्ये (माकड हाडात) कुंडलिनी शक्तीची रचना करणे. ही कुंडलिनी म्हणजे आदिशक्ती नाही. आदिशक्ती ही फार महान गोष्ट आहे. अत्यंत विशाल गोष्ट, अत्यंत गहन, अत्यंत शक्तिमान आणि अधिक शक्तिशाली गोष्ट आहे. तर कुंडलिनी हे त्या आदिशक्तीच्या शक्तीचं प्रतिबिंब आहे आणि जेव्हा उत्थापन होतं तेव्हा तुमच्यामध्ये काय घडतं हे तुम्ही जाणता. तुम्हाला आत्मसाक्षात्कार होतो, परंतु तुम्ही फार दक्ष असलं पाहिजे. खरोखरच तुम्ही दयाळू व्यक्ती आहात का? जर तुम्ही दयाळू असाल तर पहिली गोष्ट घटित होते ती या दयाळू व्यक्तीमधेच, करुणामयी व्यक्तीमध्येच. मला वाटतं दयाशील व्यक्ती इतरांना मदत करणारी असेल, इतरांना मुक्त करणारी असेल तर ती व्यक्ती स्वत:च्या सिद्धीबाबत कधीही तृप्त असू शकत नाही आणि स्वत:च्या आत्मसाक्षात्काराच्या स्थितीबद्दल तो तृप्त नसतो. ते घडू शकत

नाही. आदिशक्तींना हे सर्व करणे आणि ते करण्यासाठी कठोर परिश्रम घेणे याची काय गरज होती? तुम्हाला माहीत आहे, की मी फार फार कठोर परिश्रम घेतले आहे. अगदी माझ्या लहानपणापासून पुष्कळ परिश्रम घेतले. मी अत्यंत कठीण काळातून गेले आहे. अत्यंत वाईट काळ मी पाहिलेला आहे. मी असे लोक पाहिलेले आहेत ज्यांना मी आत्साक्षात्कार दिला आहे. जे आत्मसाक्षात्कारी झालेले असून त्यांना इतरांबद्दल कसलीही जबाबदारी जाणवत नाही आणि जर ती जबाबदारी त्यांना जाणवत असेल तर ती अत्यंत अल्प प्रमाणात. त्यांच्याजवळ करुणा नाही किंवा प्रेम ही नाही की आज सारे विश्व आपल्याला वाचवायचे आहे. मानव जातीला वाचवायचे आहे. ते आहे आपले फक्त आपले मुख्य कार्य नव्हे तर तेच फक्त कार्य आहे. जे आपल्याला करायचे आहे. सर्व इतर ज्या गोष्टी त्या तुम्हाला काहीही प्राप्त करून देणार नाहीत. फक्त तुमचे स्वत:चे प्रयत्न आणि व्यक्तीगत प्रयत्न ज्यामुळे तुम्ही दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देता आणि ज्ञान देता. या गोष्टी सोडल्या तर इतर कोणत्याही गोष्टी तुम्हाला काहीही प्राप्त करून देणार नाही.

मी याबाबत अगदी स्पष्ट आहे. मला आता फार कमी वेळ आहे. आपले साधन अगदी व्यवस्थित असले पाहिजे. योग्य दिशेने तुम्हाला तुमच्या साधनाची उन्नती अतिशय जलदगतीने करायची असेल, की ज्यामुळे ईश्वराचे प्रेम तुमच्यामधून वाहत राहील आणि त्या प्रेमाच्या देवतेला त्याबद्दल आनंद वाटेल. त्यासाठी आपल्याला अशी सुंदर फुले निर्माण करायची आहेत, की ज्यामुळे परमेश्वर प्रशंसा करेल व त्या फुलांचा तो नाश करणार नाही आणि या खेळाचा द्रष्टा समाधानी राहील, की ज्यामुळे तो त्याच्या विध्वंसाची क्रिया पुढे ढकलेल. त्यामुळेच मी म्हणाले, की वेळ फार कमी आहे, वेळ फार अल्प आहे. जर आपल्याला असे वाटत असेल, की आपली मुलेबाळे परमेश्वराच्या राज्यात वाढावी की जे फार संत आहेत, ज्यांनी जन्म घेतला आहे. त्यांना त्यांच्या आनंदाची संधी द्यायची असेल तर आपण सर्वप्रथम उत्तम आई-वडील बनले पाहिजे आणि आपण असे लोक नको की जे केवळ मोहमायेमध्ये जगत आहेत. प्रत्येक गोष्टीचे सहजयोगात स्पष्टीकरण देता येणार नाही. मी ते स्पष्टीकरण करू शकत नाही. खरच मी

करू शकत नाही कारण ते समजण्याच्या शक्ती अद्याप तुमच्याकडे नाहीत.

ते घटित करण्यासाठी संपूर्ण निसर्ग उत्सुक आहे, परंतु तुम्ही तुमच्या आत्म्याबरोबर सहकार्य करण्यास शिकले पाहिजे. जे अधिकाधिक आहे, त्याला सहकार्य म्हणता येणार नाही. ते आहे आत्मा बनणे. पूर्णतः आत्मा बनणे आणि ते फार महत्त्वाचे आहे आणि ते कोणीही थांबवू शकणार नाही.

मला आशा आहे की आजची घोषणा आपल्याबद्दलच्या आणि विश्व निर्मात्याबद्दलच्या आपल्या जबाबदारींचा समजूतदारपणा आपल्यामध्ये असण्यासाठी मदत करेल. माझ्या प्रेमासाठी माझी स्तुती करणे हे चांगले आहे. जे काही घडलं त्याबद्दल माझी स्तुती करणे हे ही चांगले आहे, पण अगदी स्पष्ट बोलणं म्हणजे तुम्ही माझी जी स्तुती करता ती मला कळत नाही. ती मला जाणवत नाही कारण मी स्वतः आता माझी अशी राहिलेली नाही. मी स्वतःला वेगळी झालेली पाहते आणि नंतर स्वतःला सांगते, 'हे बघ, तू अद्याप त्यांना पूर्ण न्यायनिवाडा दिलेला नाही. ते प्रत्येक गोष्ट इतकी सहज आणि लौकिक घेतात.' म्हणून उद्या तुम्हाला तुमच्या हृदयामध्ये एक शपथ घ्यायची आहे. त्याचे शब्द काय आहेत ते महत्त्वाचे नाही तर ती तुमच्या आत्मशक्तीबरोबरच राहण्याची जिवंत क्रिया आहे आणि ते तुम्ही सिद्ध करायचे आहे. त्यामुळे तुमची खात्री पटेल, की आपण पूर्ण समर्पित आहोत आणि त्याचा परिणाम असा असेल तो तुमच्या आत्मशक्तीत जाणवेल, स्वतःच्या प्रकटीकरणात जाणवेल.

स्वातंत्र्याबद्दलच्या आपल्या सर्व कल्पना मर्यादेने बांधलेल्या आहेत. जर स्वातंत्र्याला मर्यादा नसती तर स्वातंत्र्य म्हणजे विरक्ती होईल. ते निरर्थक आहे. त्याने काही मदत होणार नाही. आपल्याला सहजयोग मंडळींमधून मोठे राजकीय नेते बनवायचे आहेत. अशी भविष्यवाणी केलेली आहे. (संदर्भ नाडीग्रंथ) जर सहजयोग पसरला नाही, तर तिसरे युद्ध अटळ आहे आणि या तिसऱ्या महायुद्धामुळे पुष्कळशा प्रमाणात लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागतील, ते टाळणे शक्य आहे, जर लोकांनी मोठ्या संख्येने सहजयोग स्वीकारला तर! परंतु जर त्यांनी तो स्वीकारला नाही तर तिसरे

महायुद्ध होईल आणि त्याचे परिणाम लोकांच्या हानीमध्ये होईल. सरतेशेवटी सहजयोगी लोकांना परिषदेसाठी बोलावले जाईल आणि राजकीय मुत्सद्यांना बोलावले जाणार नाही. सहजयोग्यांचा सल्ला घेतला जाईल आणि ते जगासाठी काय करायला हवे ते ठरवतील आणि ते उद्याच्या जगाचे कार्यकर्ते बनतील म्हणून श्रीरामासारखे राज्यकर्ते कसे असावेत याची पूर्ण कल्पना आपल्याला असली पाहिजे. आपण आपल्या आत्मशक्तीसह फार पुढे गेलं पाहिजे. स्वत:ला प्रशिक्षण दिले पाहिजे. जास्तीत जास्त शिक्षित बनले पाहिजे आणि आपल्या अहंकारापासून मुक्ती घेऊन समंजसपणाने आपण मोठे झाले पाहिजे. हे फार मोठे काम आहे. हे महान काम आहे आणि कदाचित तुम्ही असा विचार कराल, की 'श्रीमाताजी हे आम्ही करावे अशी अपेक्षा कशी करतात?' परंतु मला वाटते त्यासाठी तुम्हाला निवडलेले आहे. ते तुम्ही प्राप्त केले पाहिजे. जेणेकरून आपण प्रथम आपल्यावर अधिसत्ता ठेवली पाहिजे आणि मग इतरांचे राज्यकर्ते झाले पाहिजे.

लोकांना माहीत नाही, की आता वेळ आलेली आहे. ही अगदी शेवटची संधी आहे. यापुढे तुम्हाला अधिक संधी उपलब्ध होणार नाही. बायबलमध्ये अंतिम निवाडा म्हणून याचे वर्णन केलेले आहे. तुमचा अंतिम निवाडा हा सहजयोगामध्ये आहे आणि तो कसा करायचा याचा तुम्हीच निर्णय घ्यायचा आहे. जेव्हा तुमच्यामध्ये प्रकाश येईल आणि तुम्ही स्वत:चा निवाडा कराल. पहा, माझे अमुक एक चक्र पकडले गेले आहे. नंतर तुम्ही म्हणाल, 'श्रीमाताजी या चक्रावर पकड आहे.' तुम्ही जाणता की तुमच्यासाठी मेहनत घेण्यासाठी मी तयार आहे. तुम्हीसुद्धा एकमेकांवर मेहनत घेऊ शकता. त्यामुळे तुम्ही पूर्णत: तुमच्या चुका, समस्या आणि पापे इ. स्वच्छ करू शकता, तर ते तुम्ही ओझे का वाहत आहात? ते फेकून देण्याऐवजी लोक सहजयोगापासूनच दूर पळत आहे, ही आहे माणसाची बुद्धी, की तो विचार करतो आणि चिंतातुर होतो. तुम्ही कशाचेही भय ठेवता कामा नये. जर तुम्ही अल्पप्रमाणात स्थिर झालात तर तुम्हाला कळेल ही शक्ती केवढी प्रचंड आहे, की जी शक्ती तुम्हाला अपराधामध्ये आणत नाही, तर तो दोष दूर करते आणि पूर्णत: काढून टाकते.

सर्वप्रथम तुम्ही हे जाणलेच पाहिजे, की कुंडलिनी शक्ती ही अत्यंत पवित्र आणि शुद्ध आहे. ही शुद्धता आपल्याला स्वच्छ आणि पवित्र बनवते. सहजयोगामध्ये ती तुम्हाला अतिशय आत्मसाक्षात्कार देण्यासाठी संतुष्ट असते. त्यानंतर तिथे फक्त दोन शक्यता असतात, त्यापैकी एक, तुम्ही तुमच्या आत्मसाक्षात्काराला ओळखता आणि त्याच्या महानतेच्या स्थितीपर्यंत उन्नत होता आणि त्याच्या गहनतेत जाता किंवा एकूण एक सर्व गोष्टी सोडून जाता. याशिवाय तिसरा पर्याय नसतो.

जेव्हा जेव्हा अवतरण पृथ्वीतलावर येते, तेव्हा महान आणि पवित्र असे कार्य होते. परंतु आता अशी वेळ आलेली आहे, की या काळात जे कार्य केले जाईल, की ते कार्य पूर्वी केलेल्या कार्यापेक्षा अत्यंत पवित्र असेल आणि तुम्ही सुद्धा त्या पवित्रतेचे कर्ते असाल आणि तुम्हाला समजून येईल तुमच्यामध्ये आत्मा रहात आहे. हे सहजयोगाचे आणि अवतरणाचे अभूतपूर्व महान कार्य असेल. ते कार्य पूर्ण समाजाला स्फूर्ति देईल. या महान, अनंत जीवनामध्ये जेव्हा कलियुगाची सावली साऱ्या विश्वाला हळूहळू ग्रासू लागते, तेव्हा तुमच्या मशाली (ज्योती) मोठ्या प्रमाणात जळल्या पाहिजेत आणि त्या प्रकाशात तुम्ही ती पवित्रता, आनंद आणि वैभव प्राप्त कराल. यासाठी आवश्यक आहे, की तुम्ही तुमचा दिवा स्वच्छ ठेवला पाहिजे. तुम्ही तुमची पापे आणि भूतकाळातील कृत्ये धुतली पाहिजेत. तुमच्या अहंकाराबरोबरच तुमची गतकर्माची कर्मे धुतली गेली पाहिजेत.

हा आहे अंतिम निवाडा. आता पाहू या काय घडते ते? जे काही लोक येतात ते माझ्याकरता. ते ठीक आहे. जरी ते आले नाहीत तरीसुद्धा ठीक आहे. लक्षात ठेवा, तुमच्यापुढे परमेश्वर वाकणार नाही. तुम्ही तुमच्या स्वतःच्या स्वातंत्र्यात त्याला प्राप्त केलं पाहिजे. जर तुम्ही त्यास प्राप्त केले नाही तर ती त्याची चूक नाही किंवा सहजयोगाची, माझी, तुमच्या आत्म्याची चूक नाही. तुम्ही लोकांनी अहंकार सांभाळून ठेवल्यामुळे तुम्हालाच दोष दिला पाहिजे. ती तुमची संपत्ती आहे किंवा तुमची मालमत्ता

आहे आणि ती तुम्हाला दिलेली आहे. केवळ तुम्ही ते स्वीकारलेली आहे, जाणलेली आहे आणि त्याचा आनंद घेतलेला आहे.

आता ही तुमची जबाबदारी आहे, की ते घटित केले पाहिजे. ती केवळ तुमचीच जबाबदारी आहे. तुम्ही तुमच्या मार्गाने त्यावर विचार करा, की आम्ही सहजयोगासाठी काय काम केले आहे? प्रत्येक गोष्टीमध्ये तुम्ही सहज पाहू शकता. तेव्हा तुम्हाला कल्पना सुचतील त्या सर्व सोडून द्या. त्या लिहून ठेवा. तुम्ही तुमचे काव्य लिहा. तुम्हा सर्वांना किती तरी गोष्टी करता येतील. यापुढे एक क्षणही फुकट घालवता कामा नये कारण हे अगदी त्वरित करण्याचे कार्य आहे कारण हे विश्व आता विध्वंसाच्या किनाऱ्यावर उभे आहे आणि आपणच फक्त असे लोक आहोत ज्यांना ते वाचवायचे आहे. त्यामुळे ही गोष्ट आपल्यासाठी तातडीची आहे. या निकडीच्या काळात प्रत्येकाने जाणले पाहिजे, की सहजचा सृष्टिक्रम काय आहे. प्रत्येक गोष्ट कशी घटित होत आहे. जर योग्यवेळी ते कार्य केले नाही तर आपल्याला आणखी एक जग स्वीकारावे लागेल. ही आणखी एक समस्या आहे. म्हणून आपल्याला गंभीरपणे याबाबत विचार केला पाहिजे आणि प्रत्येक गोष्टीचे सार तत्त्व समजून घेतले पाहिजे आणि स्वतःच समजून घ्या, की अमूक एक गोष्ट का करता?

## पसरवण्याचा आनंद

तुम्ही फार महान लोक आहात. तुम्ही हे संपूर्ण जग वाचवू शकता. मला हे सांगितलेच पाहिजे की हे सर्व माझ्या जीवनकाळात घडून येईल अशी मी अपेक्षा केली नव्हती आणि तसे ते घडून आलेले आहे. मी तुम्हाला फार मोठे अगदी महान लोक म्हणून बघते. विशेषकरून स्त्रियांनी ते अधिक प्रमाणात घटित केले पाहिजे कारण मी एक स्त्री आहे. स्त्रियांकडे एक विशेष प्रेम करण्याची क्षमता असते आणि सहन करण्याचीसुद्धा. माझी अपेक्षा आहे, तुम्ही सर्व सुंदर सहजयोगी बनाल आणि या जगाची कोणीही खात्री पटवू शकणार नाही. परंतु तुमचे काय? तुमची समर्थता आणि तुमच्या प्रेमाची शक्ती यामुळे त्यांची खात्री पटेल. मी पुष्कळ गोष्टी पाहिल्या आहेत. लोकांच्या बाबतीत अनुभवले आहे, नंतर मी त्यांच्याविषयी विचार करते

त्यावेळी मला आनंद वाटतो. मी असे लोक पाहिले आहे की ज्यांनी पुष्कळ गोष्टींचे व्यवस्थापन केले आहे आणि काळजी घेतली आहे. वास्तविक ते कठिण असते, परंतु ते घटित केले आहे.

आता आपण या नवीन जगाकरिता आलो आहोत आणि या नवीन जगात सहजयोग्यांच्या नवीन वंशाला त्याचे फलित दाखवायचे आहे. त्यांना त्यांची शक्ती, त्यांचे धारिष्ट्य आणि त्यांचा समंजसपणा दाखवायचा आहे. ते तसे गंभीर नाही, ते तसे क्षुल्लक ही नाही, परंतु ते आनंद देणारे आहे. तो केवळ आनंद आहे, की जो तुम्हाला तुमच्याबद्दल जाणवेल. हे सर्व मी तुम्हाला तुमच्याबद्दल सांगते आहे. हे सर्व तुमच्यात आहे. तुमच्या शक्तीत आहे आणि सदासर्वदा तुमच्यातच आहे आणि त्याला तुम्ही सामोरे गेलेले आहात.

हा महान आनंद तुम्हाला मिळेल जेव्हा तुम्ही लोकांना आत्मसाक्षात्कार द्याल. तुम्ही त्यांचे जीवन बदलून टाकाल असा आनंद तुम्हाला कधीच वाटणार नाही. समजा जर तुम्हाला मोठी लॉटरी लागली तर ही एक मोठी गोष्ट असेल, तुमचं नाव मोठ झालं असेल, तुम्हाला मोठं बक्षीस मिळालं असेल तरी सुद्धा तसा आनंद जाणवणार नाही.

सहजयोग निर्माण करण्याचा आनंद याला मर्यादा नाही आणि ती आनंद देणारी गोष्ट आहे. तुम्ही असे काही बंधुत्व, दृढ ऐक्य असा एकरूपपणा, असा प्रेमाचा आनंद, करुणेचा आनंद आणि वेगवेगळ्या पातळीवरील मौजमजा वाढीला लावता, हे सर्वसाधारण आनंदाप्रमाणे नाही.

मला हे सांगितलेच पाहिजे, की हे शेवटचे पर्व नाही. पुष्कळशा उत्साहाने आपल्याला जलदगतीने आणि आनंदाने आपल्याला हे कार्य करायचे आहे. तुम्हाला माहीत नाही जेव्हा तुम्ही दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देता तेव्हा तुम्हाला काय प्राप्त होते तर दुसऱ्याला जेव्हा आत्मसाक्षात्कार देतो तो एक आनंद देणारा क्षण असतो. एकदा तुम्ही फक्त प्रयत्न करा. तुम्हाला त्याचा आनंद वाटेल आणि मग ते तुम्हाला अधिकाधिक प्रमाणात करावेसे वाटेल.

# प्रकरण दहा

# प्रश्न आणि उत्तरे

‘‘आत्मसाक्षात्कार घेतल्यानंतर
लोक परत का येत नाहीत.’’

सहजयोगामध्ये लोकांना आत्मसाक्षात्कार मिळतो त्यानंतर ताबडतोब त्या माणसाला त्याच्या स्वत:च्या चुका दिसू लागतात आणि मानवाच्या स्वभावानुसार तो सहजयोगापासून दूर जायला सुरुवात करतो. प्रारंभी त्याला भीती वाटते कारण त्याच क्षणी त्याला त्याच्या स्वत:च्या चुका, अपराध दिसू लागतात. त्याच्यामध्ये इतक्या चुका समाविष्ट आहेत यावर त्याचा विश्वास बसत नाही. त्यामुळे तो भयभीत होतो, मग त्याला शंका येऊ लागते. तुम्ही पाहिलंत हजारो लोक येतात, आत्मसाक्षात्कार प्राप्त करतात आणि पुन्हा ते सहजयोगासाठी येत नाहीत. त्याचे काय कारण असेल? जर शेकडो लोकांनी आत्मसाक्षात्कार घेतला असेल तर फक्त १०% लोक पुन्हा येतात. हे असे नेहमीच घडते. या कारणास्तव सहजयोग काहीसा हळूहळू वाढत असतो. काही हरकत नाही. हे एकच कारण आहे, की माणूस स्वत:वरूनच इतका ओळखला जातो, की त्याला त्याच्या चुका जाणून घ्याव्याशा वाटत नाहीत आणि जेव्हा तो त्या चुकांना जाणतो, तेव्हा तो पळून जातो. तुम्ही चुका जाणणे आणि त्यांना सुधारणे हे आयुष्यभर त्या चुकांचे ओझे वाहण्यापेक्षा अधिक चांगले आहे.

जेव्हा तुम्ही आत्मसाक्षात्कार घेता तेव्हा मी म्हणते की, ‘आता तुम्ही नवीन जन्मलेली व्यक्ती आहात. जेव्हा तुम्ही तुमच्या चित्ताचा आदर करू लागता तेव्हा तुम्ही हळूहळू सहजयोगासाठी गहनता विकसित करता. पुष्कळसे लोक जेव्हा आत्मसाक्षात्कार प्राप्त करतात ते क्वचितच दुसऱ्या वेळेला त्यासाठी येतात आणि जरी ते पुन्हा आले तरी चैतन्याची जाणीव ते वाढवत नाहीत. ते त्यांच्या रोजच्या कामामध्येच गर्क राहतात आणि पुष्कळशा गोष्टींवर त्यांचे चित्त खर्च करतात की ज्या वस्तू त्यांना सूक्ष्म जाणीवसुद्धा देत नाहीत. त्यामुळे सूक्ष्मता, सहजकलेतील गहनता त्यांच्यामध्ये वाढीला लागत नाही. उदा. ज्या व्यक्तीचे अतिवाचन झालेले आहे, त्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त होताच त्याने जे काही वाचलं आहे त्याच्याशी तो तुलना करू लागतो. त्यामुळे त्याचे चित्त पुन्हा व्यर्थ जाते. त्याचे चित्त त्या सर्व रूढीबद्ध कल्पनेवर जोडले गेले आहे. त्यापैकी काही

जण योग्य आहेत आणि काही जण चुकीचे आहेत. त्यांच्यापैकी काही जण पूर्णत: ढोंगी आहेत. काही लोक निरुपयोगी आहेत. काही लोक इथे येतात कारण त्यांना सहजयोगातून पैसा मिळवायचा आहे आणि त्यामुळे त्यांना काही निकृष्ट गोष्टी प्रसिद्ध कराव्या लागतात. तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त होताच तुम्ही तुमच्या स्वत:च्या स्थूल जाणिवेकडे पुन्हा जाता आणि त्या स्थूलाबरोबर या सूक्ष्म शक्तीची तुलना करू लागता आणि त्यामुळे तुम्ही परमचैतन्य गमावून बसता. आत्मसाक्षात्कार प्राप्त केल्यानंतर मी पाहिले आहे, की लहान लहान मुले अगदी पुष्कळ तास झोपी जातात. काही काळ ते अल्पसे निष्क्रिय होतात, पण वयस्कर लोक तो प्राप्त झाल्यावर ताबडतोब पुस्तकाच्या दुकानात जातात आणि कुंडलिनीवरचे एखादे पुस्तक घेऊन त्याबद्दल वाचू लागतात.

शारीरिकदृष्ट्या अपंग असलेले किंवा शारीरिक त्रास असलेले किंवा अशाप्रकारे काही तरी असलेले लोक आजारी आहेत म्हणून स्वत: उपस्थित राहतात. त्यांना कधी कधी ज्यांना काही रोग नाही त्यांच्यापेक्षा अधिक बरे वाटू लागते. त्यामुळे निश्चितच एक आनंदाचा भाग म्हणून त्यांना आराम मिळेल. जेव्हा त्यांना तसा आराम मिळतो, तेव्हा तिथे थोडी आनंदाची छाया पसरते आणि तशी ती जाणवते. तेव्हा ते समजतात की याचा आनंद आपण घेतला पाहिजे, परंतु मी असे म्हणेन तेसुद्धा त्यांना आराम प्राप्त झाल्यावर दिसेनासे होते, पण ते असे समजत नाहीत, की सहजयोग महान आहे. त्याचा अनुभव घेतला पाहिजे, आणि आनंद घेतला पाहिजे. सहजयोगामध्ये शारीरिक आनंद इतका पुरेसा मिळतो, की त्यामुळे चित्त सूक्ष्म होते. तुम्ही तुमचे चित्त स्थिर करण्याची गरज नसते तर तुम्ही चित्तामध्ये अधिकाधिक सूक्ष्म आणि सूक्ष्मतर बनायचे असते. तुमचे चित्त एकाच ठिकाणी स्थिर करणे हे तुम्ही जाणता, की फार चुकीची पद्धत आहे. ही अशी पद्धत काही सहजयोगी करतात अणि त्याचे परिणाम म्हणून त्यांची चक्रे भंग पावतात आणि सर्व संपून जाते. जेव्हा ते त्यांचे आज्ञा चक्र कशावर तरी स्थिर करतात तेव्हा तुम्ही पाहिलेलेच आहे आज्ञा चक्र बिघडून जाते. तुम्ही तुमचे चित्त

सूक्ष्म आणि अधिक सूक्ष्मतर बनवा.

**प्रश्न : जे लोक चांगले आहेत, पण सत्यशोधक नाहीत त्यांनी आत्मसाक्षात्कार घेतला आहे, परंतु ते सहजयोगाचे महत्त्व बघत नाहीत, त्या लोकांबद्दल काय?**

**श्रीमाताजी :** असे लोक अभिसरणाच्या बाहेर जातात. ते सहजयोग स्वीकारण्यापेक्षा अधिक प्रमाणात नाकारतात कारण आता निवाडा चालू आहे. असे लोक आत्मसाक्षात्काराच्या बाहेर फेकले जातात. तेव्हा तुम्ही त्यांच्याजवळ आत्मसाक्षात्काराबद्दल बोलू शकता. त्यांना बंधनं देऊ शकता कारण हे लोक ज्यांच्याबद्दल तुम्हाला आस्था आहे, अन्यथा ते पण हरवून बसतील. उदा.दह्याला घुसळल्यानंतर लोणी तयार होते. थोडेसे लोणी बाहेर येते आणि ताक उरते आणि लोण्याचा गोळा वेगळा करण्यासाठी तो ताकामध्ये ठेवला जातो आणि पुन्हा घुसळल्यावर उरलेसुरले लोणी त्या लोण्याजवळ जमा होते आणि मग लोण्याचा गोळा मोठा होतो. परंतु काही लोण्याचे कण मागेच असतात, जर ते त्या मोठ्या लोण्याच्या गोळ्याला चिकटले नाहीत तर ते ताकाबरोबर बाहेर फेकले जातात. म्हणून जे लोक सहजयोगात येत नाहीत आणि त्यांच्या गुणवत्तेने उत्कृष्ट ठरत नाहीत ते बाहेर फेकले जातात. ही सत्य स्थिती आहे. तुमच्याकडे निरपेक्षता असली पाहिजे आणि अशा लोकांबद्दल तुम्हाला आसक्ती असता कामा नये.

## वैफल्य

मला समजले आहे, की जेव्हा परमेश्वराच्या दृष्टिकोनातून जे काही फार महत्त्वाचे आहे, तेव्हा सर्व नकारात्मक शक्ती त्यांच्या योजना घटित करतात, की ज्यामुळे चांगल्या गोष्टीला विलंब करणे, मार्ग पदच्युत करणे आणि अडथळे निर्माण करणे असे घडते. तो करुणा आहे, तो कृपा आहे, तो सर्व काही आहे. परंतु हे सर्व त्याच्या कृपेतच असते. तो हे जग नष्ट करणार आहे. त्याच्या विरोधात अधिक पाप करणे याला तो मान्यता देणार नाही. अन्यथा तो नाश करतच असतो. कर्करोग हा काय आहे? तुमच्या

शरीरामध्ये येणारे हे सर्व काय आहे? ते काही नसून फक्त आपल्या स्वत:च्या विध्वंसक शक्ती आहेत, की ज्या आपण आपल्यामध्ये दृढ केल्या. आपल्या बाहेर किंवा आतून कोणतीही भीती नाही, की ज्यांची आपण जाणीव ठेवली पाहिजे. स्वतंत्रतेच्या नावाखाली आपण आपल्यामध्ये विनाशाचे जंतू एकत्र केलेले आहेत. ती इतकी अंतर्भूत पद्धती आहे, की हे हल्ले जे येत आहेत, त्यांची आपल्याला जाणीव नसते तरीसुद्धा ते आहेतच. आपण मात्र आपल्याबद्दल, आपल्या कृत्रिम जीवनाबद्दल, कृत्रिम शिष्टाचाराबद्दल आणि वरपांगी चालीरीतीने समाधानी आहोत.

सर्वात सोपी गोष्ट करायची झाली तर बसून रहायचे आणि प्रश्न विचारायचे, परंतु सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही तुमचा आत्मसाक्षात्कार मिळवायचा. आज ती सर्वात अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. अर्थातच या परिस्थितीत मानव जात म्हणून की ते अतिशय जलद रीतीने घटित होणार नाही. मला त्याबद्दल खात्री आहे. मी स्वत: शर्थीने प्रयत्न केलेले आहेत. अगदी पर्वताप्रमाणे. तुम्ही कुंडलिनी उठवायची आहे. ते खरोखरच पर्वत उचलल्याप्रमाणे आहे. तुम्हाला अगदी दमल्यासारखे आणि थकून गेल्यासारखे वाटेल. नंतर त्याबद्दल प्रशंसासुद्धा करावीशी वाटत नाही, तरी तुम्ही निराश होऊ नका. त्याबद्दल दु:ख करू नका. हळूहळू, मंदगतीने मला खात्री आहे, तुमच्या स्वत:च्या डोळ्यांनी तुमचे जीवन आनंद, निरानंद आणि समजुतदारपणामध्ये कसे बदलून गेले आहे ते लोक बघतील. ते हे ही बघतील, की तुम्ही किती प्रेमळ आणि आनंदी बनलेले आहात. नंतर ते विश्वास ठेवतील, की तुमचे जीवन अतिशय चांगले झालेले आहे. काही लोक अशा वाईट स्थितीमध्ये आहेत, की ते प्रत्येक गोष्टीमध्ये अंध:काराचे चित्र पाहतात. ते इतके नाराज आहेत की त्यांनी सर्व परित्याग केला आहे. सर्व काही सोडून दिले आहे. ते असे म्हणतात की आता तुम्ही पूर्णपणे संपून गेलेले आहात. आम्ही प्रत्येक गोष्ट केली आहे. 'आता आम्हाला काही करायची इच्छा नाही.'

मी फ्रांसमध्ये बघितले आहे, ते लोक या जगाच्या अध:पतन आणि

येऊन ठेपलेल्या विनाशाची चर्चा करीत होते. त्यांची चर्चा अशी होती, 'आताच आपण आपल्याला संपवून टाकू या. झाले तेवढे फार झाले. आता मात्र अंतिम विनाश घडलाच पाहिजे, मग तो अणूबाँब असो, की इतर काही. चला आपण आपल्याला संपवून टाकू या.'

हे इतके अविचारीपणाचे आहे. मी समजू शकते त्या लोकांचं वैफल्य, की ज्या विषयी ते विचार करीत आहेत आणि त्याविषयी ते काळजी करीत आहेत त्याबद्दल मी दखल घेत आहे. मला शंका नाही, की एखाद्याला याबद्दल अतिशय वाईट वाटू शकते. कधीकाळी सहजयोगीसुद्धा फार अस्वस्थ होतात आणि अतिशय नाराज होतात. कधीकाळी सहजयोगी पुष्कळच दुःखी होतात आणि अत्यंत आवेशाने म्हणतात, 'श्रीमाताजी आम्ही हे सर्व सोडतो यामुळे आम्ही संपून गेलेलो आहोत. आता काही राहिलेले नाही. परंतु मला समजत नाही आत्म्यापासून माझे चित्त दूर कसे करावे?' तुम्ही प्रयत्न करू शकता ते तिथून दूर करण्याचा. तुम्ही पराकोटीचा प्रयत्न करा, तरी ते तुम्ही करू शकणार नाही. म्हणून ते काही असो जेवढे शक्य आहे तेवढ्यांना वाचवण्यासाठी लढा. सर्व सहजयोगी जे काही काळानंतर वैफल्यग्रस्त होतात त्यांना मला सांगायचे आहे, तुम्ही वैफल्यग्रस्त होता कामा नये. तुम्ही तुमचं धारिष्ट्य राखून ठेवलं पाहिजे आणि समंजसपणासुद्धा. जर तुम्हाला इतरांबद्दल काही भावना असतील आणि त्यांच्याबद्दल काही जवळीक दाखवत असाल तर ते तुम्हाला समजून घेतील आणि तुम्हाला वाचवण्यासाठी, मुक्ती प्रदान करण्यासाठी अधिकाधिक लोक तुम्हाला मिळू शकतील. ते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करतील जसे तुम्ही आनंद घेता तसे ते पण घेतील.

यामध्ये एकच खोच आहे, की तुम्ही अजून पुष्कळ हरवून बसलेले आहात हे जाणवत राहील, तरी काही हरकत नाही. आपल्याला कठोर परिश्रम करायचे आहेत. आपण हे समजून घेतले पाहिजे, की नकारात्मक शक्ती त्यांना ओढत आहे. ते अज्ञानी आहेत. त्यांना माहीत नाही, की या भौतिक संघर्षापलीकडे एक जीवन आहे. ते जीवन सौंदर्य आणि वैभव यांचे

अनंत जीवन आहे. परंतु हळूहळू मला खात्री आहे, की ते सुद्धा घटित होणार आहे. विशेषकरून या सभेसाठी पुष्कळसे चढ-उतार असणार आहेत आणि पूर्णतः ते धैर्य खचवणारे आहे. पण प्रत्येकाने समजून घेतलेच पाहिजे, की परमेश्वराचे कार्य परमेश्वराकडून आशीर्वादित असते. तो सर्व त्याचे आशीर्वाद आपल्याला देईल आणि त्यामुळे तुम्ही तुमचे इच्छित कर्तव्य करीत रहाल. वेळ पुष्कळच जात आहे आणि वेळ थोडा आहे, तो ही संपत आहे आणि त्यामुळे ते वाढत्या प्रमाणात निराशेची परिस्थिती आहे. या पृथ्वीवर निराशाजनक परिस्थितीमुळे सहजयोगास प्रारंभ झाला आहे. तुम्हाला या अडथळ्याविरूद्ध अधिकाधिक सबळ होऊन सामना केला पाहिजे. तुमच्या अवतीभोवती हे अडथळे जाणवतील, तरीसुद्धा या निर्मितीचे अंतिम लक्ष्य घटित करा.

**प्रश्न : अध्यात्मामध्ये अगदी पूर्ण वाढ झाल्यानंतर आपल्यामध्ये काय घडते ?**

**श्रीमाताजी :** प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे, की आपण जीवनाच्या काही सामायिक तत्त्वाने बांधलेले आहोत म्हणजे श्री आदिशक्तींनी आपणा सर्वांना बांधलेले आहे म्हणजे आपल्या सर्वांजवळ कुंडलिनी शक्ती आहे. ती प्राण्यांमध्येसुद्धा आहे, पण तिची प्रगती झाली नाही. अद्याप ज्याला तुम्ही म्हणू शकाल कुंडलिनी पूर्ण स्वरूपात नाही, की ज्यामुळे तिचे उत्थापन केलं जाईल परंतु फक्त मानवजातीमध्ये तिची उत्क्रांती झाली आहे, की ज्यामुळे योग घडून येऊ शकतो. आपल्यामधील परमेश्वरी शक्ती म्हणजे कुंडलिनी आहे, की जे आदिशक्तीचे प्रतिबिंब आहे आणि ते कलियुगात अगदी सहजपणे जागृत करता येते. हेच आपल्यामध्ये सामायिक तत्त्व आहे, म्हणून आपण सर्व लोकांना मान दिला पाहिजे. मानव म्हणून ते कोणत्याही देशातील असोत, कोणत्याही राष्ट्राचे असोत, त्यांचा कोणताही रंग असो, त्या सर्वांना त्यांची कुंडलिनी शक्ती असते. असे काही लोक आहेत जसे तुम्ही पण आहात, ज्यांची जागृती झालेली आहे. जे प्रकाशित लोक आहेत आणि ज्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे. जेव्हा तुम्ही समजू लागाल

की आदिमांचे चित्त असल्यामुळे हा आनंद मिळत आहे. हा आहे केवळ एक खेळ आणि आनंद आहे आणि जेव्हा तुम्ही तुमची अध्यात्माची पूर्ण वाढ पूर्ण कराल तेव्हा तुम्हाला काय आढळून येईल? आपल्याला काय जाणवेल? आणि त्यानंतर आपले अस्तित्व काय असेल? हा प्रश्न तुम्ही पुष्कळवेळा विचारला आहे. जेव्हा तुम्ही हा प्रश्न मला विचारता त्यावरून हे दिसते अद्याप तुम्ही तिथपर्यंत गेला नाहीत. एकदा का तुम्ही त्या स्थितीपर्यंत गेलात तर तुम्ही तो प्रश्न विचारणार नाही. दुसरे म्हणजे तुमच्यामध्ये काय घडते? ते म्हणजे तुम्ही फक्त अस्तित्व बनता, अगदी फक्त अस्तित्व, तर तुम्ही सत्य अस्तित्व बनता आणि त्यामुळे तुम्ही परमेश्वरांचा स्वभाव तुमच्यामध्ये प्रतिबिंबित होतो.

**प्रश्न : आपली प्रगती का होत नाही?**

**श्रीमाताजी :** आपली प्रगती का होत नाही हे आपण समजून घेतले पाहिजे. ज्या लोकांजवळ आत्मविश्वासाची उणीव असते त्यांच्याकडे वास्तवात उद्धटपणा येतो. ज्या लोकांमध्ये आत्मा अविष्कारित होत नाही त्यांचा आत्मविश्वास पूर्णतः नाश पावलेला असतो. म्हणून तुमच्या आत्म्याचे प्रकटीकरण होऊ द्या. जोपर्यंत आत्मा अविष्कारित होत नाही तोपर्यंत तुम्हाला सर्वप्रकारच्या समस्या येतात आणि मग तुम्ही तक्रार करू लागता, खरोखरच सर्व समस्या तुमच्यातच असतात. मग परमेश्वरालासुद्धा तक्रारी कराव्या लागतात. त्याचा विचार करा. ज्यांनी हे विश्व निर्माण केले आणि तुम्हाला प्रेम आणि करुणा यासह निर्माण केले आहे आणि ज्यांनी सूर्याखालील प्रत्येक गोष्ट दिलेली आहे, ज्याने तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला आहे, जे जे शक्य आहे, ते ते दिले आहे आणि तुम्ही परमेश्वराबद्दल तक्रार करता तसं करता कामा नये. तुम्ही स्वतःबद्दल तक्रार करा की, 'मी यथायोग्य नाही मला ठीक व्हायचं आहे आणि तुम्ही तुम्हालाच सामोरे जा.'

लोकांना इतरच गोष्टीत रस असतो. इतर गोष्टींना प्राधान्य दिले जाते आणि इतरच गोष्टी महत्त्वाच्या वाटतात आणि नेहमीच त्यांचा वेळ त्यासाठी खर्च करीत असतात आणि मग ते म्हणतात, 'श्रीमाताजी, सहजयोगात

आमची प्रगती होत नाही. जर तुम्ही ठामपणे ठरवलत, की प्रथम आम्ही सहजयोग केला पाहिजे आणि इतर गोष्टी दुय्यम आहेत, तर तुमच्यात खरोखरच सहजयोग प्रस्थापित होईल.

आणखी एक सूक्ष्म मुद्दा सहजयोगात असा आहे, की ज्यामध्ये मला असं वाटतं की मी तुम्हाला एक प्रश्न विचारावा? तुमच्यामध्ये सहजयोग का वाढत नाही? कोणती अत्यंत गरजेची आणि आवश्यक अशी अट आहे? कोण उत्तर देऊ शकेल? तुम्ही तर आता निर्विचारितेत आहात. ती एक मोठी समस्या आहे, तर आपण आता पाहू या, की काय आवश्यक आहे ते? आणि ते फार महत्त्वाचे आहे. ते पूर्वी कोणत्याही अवतरणासाठी, कोणत्याही प्रेषितासाठी किंवा कोणत्याही गुरूसाठी किंवा कोणासाठीही नव्हते?

उत्तर : हे प्रत्यक्ष ब्रह्मशक्तीचे एकीकरण आहे आणि यापूर्वी कधीही ब्रह्मशक्ती स्वत: अवतरीत झाली नव्हती.

श्रीमाताजी : ते योग्य आहे, पण सक्ती काय आहे?

उत्तर (लोकांमधून) : ती बंधने आहेत.

श्रीमाताजी : नाही नाही, तुमच्यासाठी कोणती अट आहे? सहजयोगासाठी एकच आवश्यक गोष्ट आहे.

उत्तर (लोकांमधून) : आमच्याकडे आदर्श वर्तणूक नाही.

श्रीमाताजी : नाही नाही, तुमच्यामध्ये पुष्कळसे लोक आदर्श वर्तणुकीचे आहेत.

उत्तर (लोकांमधून) : आम्ही अतिशय विचार करतो.

श्रीमाताजी : नाही, नाही, ते सुद्धा नाही. मी काय सांगते, की तो सुद्धा मुद्दा नाही. मला काय म्हणायचं आहे, की सहजयोगामध्ये ही एक आवश्यक गोष्ट आहे.

उत्तर : समर्पण

श्रीमाताजी : होय. तुम्ही थोडे जवळ आलात, पण अद्याप नाही.

उत्तर (लोकांमधून) : आज्ञाधारकपणा

श्रीमाताजी : आज्ञाधारकपणा हा प्रत्येकाकडे असू शकतो.

उत्तर (लोकांमधून) : आनंदाची स्थिती

श्रीमाताजी : आनंदाची स्थिती हे फलित आहे, परंतु आवश्यक काय? तुम्हाला काय द्यावे लागते?

उत्तर (लोकांमधून) : भक्ती, प्रेम, समर्पण

श्रीमाताजी : प्रेम, तर प्रत्येकासाठी तुमच्याकडे आहे. त्यात मोठं असं काय? तरीसुद्धा तुम्ही अगदी जवळ आलेले आहात.

लोक : मान्यता, खुले हृदय.

श्रीमाताजी : कोणती गोष्ट आवश्यक आहे? कोणते शुल्क तुम्हाला भरावे लागते? कोणत्या स्थितीत तुम्हाला यावे लागते? गरज काय आहे? (त्या काय म्हणताहेत?)

लोक : तुम्ही परमपूज्य श्रीमाताजींना समर्पित झाले पाहिजे.

श्रीमाताजी : अगदी बरोबर. अगदी हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. जोपर्यंत तुही मला ओळखत नाही आध्यात्मिक प्रगती शक्य नाही आणि जेव्हा तुम्ही प्रगती करता तेव्हा ती मान्यता वाढीला लागते आणि ते सर्व बरोबरीने जाऊ लागते आणि हे फार कठीण आहे, कारण या काळातील ती मोठी समस्या आहे. अगदी कठीण, कारण आपण जोपर्यंत त्याला निवडून देत नाही किंवा त्यांना एका पदावर ठेवत नाही किंवा कसलातरी छाप बसत नाही, तोपर्यंत ते फार कठीण आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या हृदयापासून मान्यता देता तेव्हा अत्यंत सचेतन, आध्यात्मिक सिद्धी प्राप्त होईल, पण ही केवळ ही मानसिक मान्यता नको, तर मी संपूर्ण मान्यता हवी. काही लोक त्यांच्या हृदयापासून मला मान्यता देतील, परंतु ते त्यांच्या बुद्धीतून देणार नाहीत. तर ते संघर्ष करत राहतील. ते मला प्रत्यक्ष स्वीकारणार नाहीत. त्यामुळे प्रत्येकाने काही

गोष्टी प्रत्यक्ष केल्या पाहिजेत, परंतु ही मान्यता स्वतःहून आनंद देणारी आहे, म्हणून केवळ विचार करा आणि जर मला विचार करायचा असेल तर मी आदिशक्तीसमोर बसलेलो आहे तर मी इतका आनंदी होईन आणि मी माझ्या आत्म्याला आशीर्वादित करीन तर 'हे प्रभू, हे सर्व माझ्यात घटित झालेले आहे. मी इतकं कोणतं महान कार्य केलं आहे?' म्हणून जेव्हा ही मान्यता आतमध्ये येते तेव्हा सहजयोगामध्ये तुम्हाला शिस्त लागते. अगदी पूर्ण शिस्त. समजा, तुम्ही एखाद्याला ओळखता, अगदी इंग्लंडच्या राणीला, ती आहे मानसिक मान्यता, नंतर ताबडतोब तुम्ही काही शिष्टाचार पाळायला सुरुवात करता, पण सहजयोगात शिस्त आतून येते. आत्म्यातून येते, समजा तुम्ही मला विचारलं 'अंड प्रथम की कोंबडी' तर ती अशा प्रकारची पद्धती असते. जर कोंबडी प्रथम असेल किंवा अंड प्रथम असेल, यापद्धतीने तुम्ही मला विचारू शकता. प्रथम आपल्याला आध्यात्मिक प्रगती पाहिजे का? तुम्हाला आम्ही मान्यता दिली पाहिजे? तर परत एक प्रश्न राहतो, मी म्हणते जर मेणबत्ती वरवर नेली तर प्रकाश अधिक पसरतो. अशाच या एकावेळी होणाऱ्या दोन गोष्टी आहेत. म्हणून तुम्ही सुरुवात करु शकता आणि त्यावेळी प्रश्न विचारू शकता, तर प्रकाश कसा ठेवावा आणि प्रकाश कसा वाढवावा, तर आता मी पुन्हा विचारते आपण काय केले पाहिजे?

लोक : ध्यान आणि ध्यानच!

श्रीमाताजी : ती एक गोष्ट, पण ती गोष्ट अत्यंत यांत्रिकपणे करतात.

लोक : योग्य अशी शुद्ध इच्छा ठेवल्यामुळे.

श्रीमाताजी : नाही, पण सर्वात चांगली गोष्ट आहे तुमची मनोवृत्ती. अगदी सुरुवातीला नेहमीप्रमाणे प्रत्येक गोष्ट साक्षीभावाने बघा, जणू काही परमपूज्य श्रीमाताजी ते सर्व करीत आहेत आणि तुम्हाला आढळेल पुष्कळसे चमत्कार घडत आहेत. तेव्हा तुम्हाला मानसिक पातळीवर समजू लागेल, की आमच्या माताजींमध्ये विशेष असे काही तरी आहे, नंतर तुम्ही तुमच्या हृदयामध्ये मला ठेवायचे आहे. तुम्ही मला तुमच्या हृदयात ठेवा. अगदी

नेहमी. तेव्हा तुमच्या भावना पाहिल्यात, तर त्या तुम्हाला कितीतरी सुंदर भावना जाणवतील आणि वेगवेगळ्या प्रकारचे स्फुरण असलेल्या सुंदर आनंददायी हृदयात लाटा-लहरी जाणवतील. अशाप्रमाणे समजा, की तुम्ही समुद्रात गेलेले आहात, तुम्ही समुद्रावर प्रेम करीत नाही. कधी करता का? तरी समुद्र तुमच्यावर प्रेम करतो आणि त्या समुद्राच्या लाटा तुम्हाला स्वतःहून एक स्फुरण देतात आणि त्यावेळी फक्त एक प्रार्थना करा. या प्रेमाच्या समुद्रामध्ये आम्ही खोलवर गेलो तर तुम्हाला तुमच्या हृदयातून, निर्झराप्रमाणे तुमच्या हृदयातून या लहरी जाणवतील आणि आनंद वाहू लागेल. जेव्हा लोक तुमच्या चेहऱ्याकडे बघतील तेव्हा विचारतील, 'तुझ्या आतमध्ये काय घडतं आहे की ज्यामुळे तुमचे डोळे चमकत आहेत आणि चेहरा चकाकतो आहे.' आपण त्यावर विश्वास ठेवू शकत नाही, पण ते घडते. जर तुम्ही तुमच्यातला आनंद साक्षीभावाने पाहू लागलात तर तुम्हाला असा आनंद मिळेल की ते वर्णन करायला शब्द असणार नाही. त्याला सहस्रारामध्ये निरानंद म्हणतात, तो तुम्ही प्राप्त करता. निरानंद म्हणजे फक्त आनंद, केवळ आनंद, अद्वितीय.

**सर्वाधिकार सुरक्षित**

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.

तुमच्या जगण्याचा अर्थ तुम्हाला अजून समजलेला नाही अन्यथा तुम्ही तुम्हीच निर्मिलेल्या शक्तीशी जोडले गेला असता.



सूक्ष्म तंत्र

परम पूज्य श्रीमाताजी निर्मला देवी
संस्थापिका, सहजयोग